# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय- जयंत पाटील
शांती व प्रेमासाठी सामाजिक
एकोपा जपूया

**5**
प्रबंध संपादकीय- दिलीप वळसे पाटील
पक्ष व अध्यक्षांचे तत्त्वज्ञान समजून घ्या

**6**
संपादकीय- डॉ. सुधीर भोंगळे
पक्ष विस्ताराची पंचसूत्री

**10**
शरद पवार यांची पत्रकार परिषद
केंद्र सरकार लोकांचं लक्ष
धार्मिक विषयांकडे वळवतंय

**18**
महागाई : तळमळे अवघी प्रजा...
उत्सवी मग्न राजा...
- अनंत बागाईतकर

**26**
भाजपचा मुकाबला आता प्रादेशिक पक्षांशी
- व्यंकटेश केसरी

**30**
लोकसंघर्ष मोर्चा, जळगाव, भाषणे
१) शरद पवार-३०
२) प्रतिभाताई शिंदे-३३

**36**
इतिहास उकरुन वर्तमान व भविष्य
गाडण्याचा उद्योग!
- कबीर दास

**46**
राजर्षी शाहू महाराज आणि राष्ट्रीय एकात्मता
डॉ. जयसिंगराव पवार

**56**
भारत-'क्वाड' आणि अन्य विभागीय राष्ट्रगट!
- बिशंभर नाथ

**62**
जाता... जाता... - गहिनीनाथ

**68**
घंटाकर्ण- कानोकानी (राजकीय किस्से)

**75**
संस्कृती अभ्यासक आणि इतिहासकार -डी.डी. कोसंबी
- प्रा.डॉ. गणेश राऊत


**80**
अभंग वारसा- उंच निंच कांही नेणे भगवंत
- सचिन परब

**83**
राष्ट्रवादीच्या मंत्र्यांनी केलेली कामगिरी
१) छगन भुजबळ-८३ २) धनंजय मुंडे-८९

**94**
भाजप व मोदींनीच महागाई वाढविली
- विद्याताई चव्हाण

**98**
सरकारी धोरणांबाबत चार्टर्ड अकौन्टंटनी
व्यक्त व्हायलाच हवे.. - डॉ. अजित जोशी

**102**
शेवटचे पान-
वाढती विषवल्ली आक्रमकतेने ठेचून काढावी
-हेमन्त टकले


**संचालक**
हेमन्त टकले
**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर-**
**वार्षिक रु. ५००/-**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने ओम साई मिलन एंटरप्रायझेस
रूम नं. १०९, हाऊस नं. ३२३,
सिद्धीविनायक महिमा सेक्टर १९/बी,
कोपर्कखैरणे, नवी मुंबई-४००७०९
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला,
वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२०
येथून अंक प्रकाशित केले.

अध्यक्षीय



# शांती व प्रेमासाठी सामाजिक एकोपा जपूया

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा लोकशाही, सर्वधर्मसमभाव, समानता आणि बंधुता यांची जाणीवपूर्वक कास धरून या मूल्यांची जोपासना करणारा पक्ष आहे. त्यामुळेच येत्या १० जूनला तो २२ वर्षे पूर्ण करून २३ व्या वर्षात पदापर्ण करीत आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरदचंद्र पवार साहेब यांची स्वतःची काही विचारधारा व तत्त्वे आणि मूल्य आहेत. त्याआधारे ५० वर्षांपासून देश प्रगतीपथावर नेण्याच्या दृष्टीने सतत चिंतन, मनन करून निर्णायक दिशेने त्यांनी पाऊले टाकली आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या व शेतकरी कष्टकऱ्यांच्या मनात त्यांच्याबद्दल प्रचंड आदर व विश्वास आहे. जाती-धर्माच्या आधारावर समाजा-समाजात फूट पाडून विद्वेष निर्माण करण्याचे काम मागील आठ वर्षात केंद्रात सत्तेवर आलेल्या मोदी सरकारकडून आणि भारतीय जनता पक्षामार्फत सातत्याने केले जात आहे. यामुळे देशाची राष्ट्रीय एकात्मता पुन्हा एकदा धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी थोर विचारवंत प्रा. नरहर कुरूंदकर यांनी असे लिहिले आहे की, ''सर्वसामान्य जनतेमध्ये आज राष्ट्रवादीचे प्रमाण कमी आढळते ते वाढले पाहिजे आणि दुसरीकडे भेदाच्या जाणीवा, अन्यायाच्या जाणीवा चमत्कारिक रीतीने वाढलेले दिसतात त्या कमी झाल्या पाहिजेत, या दोन्हीही प्रक्रिया धर्मातीत लोकशाहीवरच्या मुलभूत निष्ठेला बलवान करीत वाढल्या पहिजेत, अशी वाढ म्हणजे भारताची राष्ट्रीय एकात्मता. पण आज केंद्रातील सत्ताधाऱ्यांची पाऊले व विचार ज्या दिशेने चालले आहेत ते पाहता राष्ट्रीय एकात्मतेला मजबूत करण्याचे काम चालू आहे असे कोणीही म्हणणार नाही. उलट अल्पसंख्यांक समाजामध्ये भितीचे वातावरण निर्माण करून, हिंदुत्वाची दहशत पसरवून जातीधर्माच्या आधारावर संघर्ष वाढविण्याचा जो प्रयत्न हिंदुत्ववादी शक्तींनी चालविलेला आहे तो वेळीच रोखण्याचा प्रयत्न केला नाही तर देशाची एकता व अखंडता टिकविणे हे खूप अवघड होऊन बसणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापनदिन साजरा करीत असताना आपल्या सर्व कार्यकर्त्यांनी या गोष्टीकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन अल्पसंख्यांक समाजाला मदतीचा हात देऊन भयमुक्त केले पाहिजे. या कामात आपला प्रत्येक कार्यकर्ता सहभागी झाला पाहिजे.


उरुण-इस्लामपूर शहरातील ईदगाह व शादीखाना कामाचा शुभारंभ सोहळा नुकताच पार पडला. अतिशय देखणी आणि उपयुक्त वास्तू उभारण्याचे काम येत्या काळात तिथे होणार आहे. या भागातील बांधवांनी मला खुप मदत केली आहे. प्रत्येक निवडणुकीत मला साथ दिली आहे. त्याची ही छोटीशी उतराई.

महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर अल्पसंख्याक विभागामार्फत हे काम मंजूर करून घेतले होते. अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांची मोठी साथ लाभली होती. खरंतर ते या कार्यक्रमाला पाहिजे होते मात्र सूडबुद्धीने त्यांच्यावर कारवाई करून जेलमध्ये टाकण्याचे काम अस्वस्थ मंडळींनी केले आहे. मुस्लिम बांधवांनी प्रगती करावी यासाठी आमचा सर्वांचाच कायम प्रयत्न राहीला आहे. या समाजातील लोक शैक्षणिक क्षेत्रातही पुढे जावे यासाठी आम्ही काम करत आहोत. म्हणून येत्या काळात या भागातील उर्दु माध्यमिक शाळेचाही विकास आम्ही करणार आहोत. आज भारतात आणि राज्यात एक विचित्र परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. अल्पसंख्याक बांधवांच्या हक्कावर कोण गदा आणू पाहत आहेत याची कल्पना आपल्याला आहे. मात्र महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारांना आम्ही कोणताही धक्का लागू देणार नाही, त्यासाठी पडेल ती किंमत मोजायला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तयार आहे.

कोल्हापूरच्या पक्षाच्या मेळाव्यात आम्ही सर्वांनी महाराष्ट्राचा पुरोगामी विचार राखण्याची शपथ घेतली आहे. कारण अलिकडे काही लोक समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. लोक भोंग्यांवर बोलत आहेत, कोणाच्या तरी घरी हनुमान चालीसा म्हणण्याचा हट्ट करत आहे.

ज्यावेळी एखाद्या राज्यकर्त्याचा आत्मविश्वास कमी होतो, त्यावेळी आपण पुन्हा निवडून येणार नाही अशी भीती असते. आणि तेव्हाच असे वातावरण तयार केले जाते. धर्मा-धर्मात तेढ निर्माण केला जातो. महाविकास सरकार पडावे यासाठी सर्व प्रयत्न झाले. मात्र सरकार आजही मजबूत आहे. म्हणून राज्यात दंगली व्हाव्यात, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण व्हावा यासाठी काही लोकं प्रयत्न करत आहे.

मित्रांनो यांच्या डावात आपल्याला फसायचे नाही. आपल्या राज्यात शांती, प्रेम प्रस्थापित राहो यासाठी आपण सर्वच प्रयत्न करूयात आणि आपला सामाजिक एकोपा जपूयात.




प्रबंध संपादकीय



# पक्ष व अध्यक्षांचे तत्त्वज्ञान समजून घ्या

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष १० जूनला आपला २३ वा वर्धापनदिन साजरा करीत आहे. आपले भाग्य असे आहे की, मा. शरद पवारसाहेब यांच्यासारखे मार्गदर्शक राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पक्षाला लाभलेले आहे. आपल्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांची स्वतःची एक विचारांची पक्की बैठक आहे. ती ५५ वर्षांच्या अनुभव, अभ्यास, स्वाभिमान व कामातून तयार झालेली आहे. या विचारांचा एक वेगळा महिमा व शक्ती आहे आणि विचाराच्या सामर्थ्याशी तुलना करणारी अशी दुसरी कोणतीच शक्ती या जगात नाही. त्यामुळे आपण कार्यकर्ते कोणतेही काम करताना कशा पद्धतीने व कोणत्या दिशेने विचार करतो याला फार महत्त्व आहे. अणुबॉम्बमध्ये सुद्धा जी शक्ती आली आहे ती विचारानेच आली आहे. शस्त्रे तयार करणाऱ्यांनी विचाराचाच आधार घेतला. या अण्वस्त्राची कल्पना घोळविणाऱ्याच्या मनांतही प्रथम विचारच उत्पन्न झाला आणि या अस्त्राचा उपयोग करणाराही एक विचारशील मनुष्यच असणार आहे. तेव्हा या अस्त्राचा आदि, मध्य व अंत या तिन्हीं अवस्थांत विचारच आहे. विचाराचे बाह्य रूप अणुबॉम्ब हे जसे होऊ शकते, त्याप्रमाणे सद्कर्म व सद्वर्तनही होऊ शकते. सद्कर्म म्हणजे कशालाही 'हो' म्हणणे नव्हे व अणुबॉम्ब म्हणजे नुसता ज्वालाग्राही मसाला नव्हे. दोघांच्याही मागे विचारांचीच प्रेरणा आहे. विचारांमध्ये केवढे प्रचंड सामर्थ्य आहे, हे अणुबॉम्बमधील शक्ती दाखविते तद्वत् सद्विचारांचे सामर्थ्यही काळ दाखवितो. कारण जो सद्विचार असतो तोच टिकतो. पण जो असद्विचार असतो तो एक क्षणभर दर्शन देतो आणि दुसऱ्या क्षणी लय पावतो. एक शाश्वत विचार आहे, तर दुसरा अशाश्वत. पण कोणता विचार शाश्वत आणि कोणता अशाश्वत या गोष्टीचा, तसेच सत्य असत्याचा निर्णय कार्यकर्त्यांना नेहमी योग्य प्रकारे करताच येतो असे नाही. काही वेळा भावनेच्या प्रवाहात वाहून जाण्याचा वा अंधानुकरण होण्याचाही धोका असतो. त्यामुळे कोणताही एक विचार तो चटकन् ग्रहण करून टाकतो. पण जेव्हा तो असद्विचार ग्रहण करतो तेव्हा त्याच्या नादाने तो नाना कर्मे करू लागतो. नाना यंत्र, तंत्र, मंत्र, अनेकविध योजना व कल्पना तो त्याच्यामागे उभ्या करतो. त्यातूनच त्याच्या हातून समाजविघातक, विध्वंसक स्वरुपाचे काम होते. उभी केलेली सारी रचना तो मोडून टाकतो. पण असद्विचाराची जाणीव झाली की ती टाकून देण्यात तो क्षणाचाही विलंब लावीत नाही. अर्थात यासाठी विचारांचे योग्य दर्शन व सम्यक ज्ञान होणे आवश्यक आहे. तसे वेळेवर घडले तर मनुष्य-समाज चुकीच्या मार्गावर जाऊ शकत नाही. म्हणून कार्यकर्त्यांनी आपल्या विचारांची सतत तपासणी आत्मपरिक्षणाने व आत्मचिंतनाने करीत राहिले पाहिजे. याला मी 'प्रयोग'च म्हणतो. ज्याप्रमाणे विज्ञानाचे प्रयोग चालतात त्याचप्रमाणे समाजशास्त्राचेही प्रयोग अनादिकालापासून चाललेलेच आहेत. सृष्टीची निर्मिती झाली, तेव्हापासून हे प्रयोग चाललेले आहेत. एकेक विचार असद्विचार आहे हे जसजसे सिद्ध होऊ लागतो, तसतसे तो टाकून देऊन नवा विचार मनुष्य ग्रहण करू लागतो. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अध्यात्मशास्त्र, नीतीशास्त्र या सर्वांमध्ये हे असेच होत आले आहे. जीवनाच्या इतरही अंगोपांगात असेच घडत आले आहे. एक नवीन विचार येतो व पहिल्या विचाराला घालवून देऊन हा दुसरा तेथे सत्ता गाजवितो. पण त्यातही दोष दिसू लागले की, तिसरा अति परिशुद्ध असा विचार त्यात संशोधन करण्यासाठी येतो. तो जेव्हा जुन्या विचाराला पदच्युत करतो तेव्हा त्याचीच सत्ता चालू लागते. आजवर जगात विचारांचेच राज्य चालत आले आहे. एकेक विचार येत गेला व नाहीसा होत गेला. पण सत्ता चालली ती विचारांचीच. मनुष्याचा जेथे संबंध आहे तेथे विचाराकडूनच नेहमी प्रेरणा मिळत आली आहे.

ज्या काळात जो विचार योग्य वाटतो त्याला अनुसरूनच आपल्या पक्षाचे कार्य चालू राहते. विचार बदलत राहतात. पण पक्ष चालत राहतो विचारांच्याच आधारावर. मग कोणताही विचार स्थिर न होवो किंवा विचारांमध्ये विरोध नित्य चालत राहो. समाजशास्त्रात या विरोधाला 'संघर्ष' म्हणतात व अध्यात्मशास्त्रात त्याला 'विचार मंथन' किंवा 'विचार शोधन' म्हणतात. नाव कोणतेही दिले तरी त्याचे मूळ हे विचारांतच असते. म्हणून जगाचा आधार व मूलस्त्रोत ज्यांनी जाणला आहे, ते विचारवंत लोक विचारावरील आपली सत्ता कधी सोडत नाहीत. ते विचारांचा अखंड प्रचार करीत राहतात. एकदा समजावून विचार समजला नाही, तर धीर ठेऊन पुन्हा दुसऱ्यांदा तो विचार समजावून देतात. एका प्रकाराने विचार समजला नाही, तर दुसऱ्या प्रकाराने समजाविण्याचा प्रयत्न करतात. समाजाला जेव्हा विचार पूर्णपणे समजतो, तेव्हा समाज आपणहूनच आपली जीवनरीत बदलतो याचा अनुभव आपण कार्यकर्त्यांनी व पक्षानेही यापूर्वी अनेकदा घेतलेला आहे. यासाठी आपले अध्यक्ष कार्यकर्त्यांना पक्षाचे तत्त्वज्ञान समजून घेऊन विचारावर श्रद्धा ठेवण्यास सतत सांगत असतात. पण आमच्या कार्यात सातत्याचीही उणीव आहे. त्यामुळे कार्यकर्ते आळसावतात आणि थोडे काम करून स्वस्थ बसतात. पण असे न करता श्रद्धायुक्त अंतःकरणाने निरंतर पक्ष प्रचाराचे व पक्षवाढीचे काम करीत राहिले पाहिजे. हाच संकल्प वर्धापनदिनाच्या निमित्ताने आपण केला पाहिजे.



संपादकीय



# पक्ष विस्ताराची पंचसूत्री

१० जूनला आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २३ वा वर्धापनदिन म्हणजे वाढदिवस आहे. प्रत्येक माणसाला आपला वाढदिवस प्रिय असतो, आवडीचा असतो. वाढदिवसाच्या दिवशी आपण दिवसभर अगदी ताजेतवाने राहून जोमाने काम करतो, नवनवे संकल्प करतो, पुढच्या वर्षभराच्या कार्यक्रमांची आखणी करतो व विकासाच्या दिशेने गरूड भरारी घेण्याचे स्वप्न पाहून त्या दिशेने पाऊले टाकण्यास प्रारंभ करतो. व्यक्तीच्या जीवनात वाढदिवसाचे जे महत्व व स्थान असते त्यापेक्षा अधिक मोठे स्थान सार्वजनिक जीवनात कार्यरत असणाऱ्या व्यक्ती, संस्था, संघटना, राजकीय पक्ष यांना असते. कारण त्यांच्यामुळे खूप मोठ्या लोकसंख्येवर, समाजाच्या जीवनावर, प्रगतीवर परिणाम होत असतो, प्रभाव पडत असतो. त्यामुळे व्यक्तिगत वाढदिवसाकडे यदाकदाचित थोडे दुर्लक्ष झाले, तो मोठा गाजावाजा करून साजरा केला नाही तरी चालू शकते. पण समाजहिताचा व कल्याणाचा अविरत ध्यास घेतलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या एका मोठ्या जबाबदार व सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या राष्ट्रीय पक्षाला आपला वाढदिवस विसरून चालणार नाही. त्याला नवे संकल्प करून, नवे काम हाती घेऊन, विरोधकांशी लढण्याची उर्मी जागवित व प्रबळ करीत वाढदिवस जोमाने साजरा करावाच लागेल. या कामाने, कार्याने व उपक्रम राबविण्याने पक्षासाठी अहोरात्र तळमळणाऱ्या कार्यकर्त्यांचे कर्तृत्व सिद्ध होत असते. कर्तृत्वाच्या समाधानाचे दव म्हणजे वाढदिवस. आयुष्याचा देठ सांभाळणाऱ्या मोरपिशी स्वप्नांचा शामियाना म्हणजे वाढदिवस. तो डोळ्यात तेल घालून प्रत्येक कार्यकर्त्याने जपला पाहिजे. म्हणून आपले राष्ट्रीय अध्यक्ष व सर्वांचे मार्गदर्शक आणि देशातील ज्येष्ठ राजकीय नेते मा. शरद पवार साहेब आणि महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष ना. जयंत पाटील यांनी आपल्याला पाच कलमी कार्यक्रम दिलेला आहे. त्यासंबंधीचे लेखी पत्रकही त्यांनी जारी केले आहे. आपण सर्वांनी या पत्राची तंतोतंत अंमलबजावणी करावयाची आहे.

काही कार्यकर्ते 'सर्किटे' झाले आहेत. मंत्री, नेते सर्किट हाऊसवर, समारंभस्थळी आले की हे कार्यकर्ते गोंडा घोळायला आणि लाळघोटेपणा करायला पुढे असतात. पक्षाच्या कामात, उपक्रमात, आंदोलनात यांचा कधीही सहभाग नसतो. सत्तेचा मेवा चाखायला मात्र हे सर्वात पुढे असतात. आपण मंत्र्यांच्या, नेत्यांच्या किती जवळ आहोत, विश्वासू आहोत याचे प्रदर्शन करून स्वतःचे 'चांगभले' करून घेणाऱ्यांना मंत्री व नेत्यांनी वेळीच ओळखून खड्ड्याप्रमाणे बाजूला केले पाहिजे. आपल्या पक्षाला खऱ्या निष्ठावंत व पवार साहेबांच्या विचारांवर श्रद्धा ठेवून त्याप्रमाणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज आहे. स्वार्थाने पेटून उठलेल्या लाचार दलालांची आपल्याला काडीमात्र गरज नाही हे नेत्यांनी व मंत्र्यांनी कृतीतून सिद्ध केले पाहिजे. इतकेच नव्हे तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढविण्यासाठी जो प्रामाणिकपणे अहोरात्र कष्ट करतो, अन्याय-अत्याचाराविरुद्ध बेडरपणे लढतो आणि संघर्षातील लाठ्या-काठ्या व फटके आनंदाने झेलतो अशाच कार्यकर्त्याला मान सन्मान व प्रतिष्ठा देऊन त्याचे काम व प्रश्न प्राधान्याने व त्वरित सोडविण्याची विजीगिषा नेत्यांनी दाखविली पाहिजे. पक्षाच्या वाढदिवशी असा संकल्प मंत्री व नेत्यांनी केला पाहिजे. कार्यकर्त्यांना उपदेश आणि मार्गदर्शन करायला बहुतेक सगळ्या नेत्यांना आवडते. काहीजण त्यासाठी आसुसलेले असतात. पण पक्ष बांधणी, विस्तार, पक्षाची ध्येयधोरणे व विचार यांची अंमलबजावणी करण्याकडे कितीजणांचे लक्ष असते हा प्रश्न विचारला तर काही नेत्यांना राग येईल. आला तरी हरकत नाही. मा. पवार साहेब जर वयाच्या ८२ व्या वर्षी संपूर्ण देशभर दौरे करून पक्ष बांधणी व विस्ताराचे व केंद्रातील सत्ताधारी भाजपला पर्याय उभा करण्याचे काम करीत असतील तर त्या तुलनेत आपण किती काम करतो आणि मा. पवार साहेबांच्या कामाला किती हातभार लावतो याचे स्वतःला नेते म्हणवून घेणाऱ्या सर्वांनी आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. पक्षाची तिसरी फळी उभारण्याचे काम कुणाचे आहे? या वयात पवार साहेबांनी तालुक्या-तालुक्यात व गावागावात जाऊन पक्षासाठी कामे करणारे निःस्वार्थ, अभ्यासू व ध्येयवादी कार्यकर्ते शोधावेत अशी आपली अपेक्षा आहे काय? चांगले

कार्यकर्ते पक्षात घेऊन नवीन लढवय्या तरूणांची फौज उभी करावी अशी अपेक्षा पवार साहेबांनी अनेक वर्षांपासून ऊराशी बाळगली आहे. ती आम्ही केव्हा पूर्ण करणार? प्रत्येक गोष्ट त्यांनी सांगायची वाट पाहणार आहोत का?

या २३ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी पक्ष मजबुतीने बांधणी करण्याचा संकल्प करून त्या दिशेने काम करीत राहिले तर ती खऱ्या अर्थाने वाढदिवसाची पवार साहेबांना दिलेली भेट ठरेल. नुसत्या बाता व वल्गना करून पक्ष नंबर एकचा होत नसतो. त्यासाठी नेता आणि कार्यकर्ता चंदनासारखा झिजावा लागतो. हे काम मा. पवार साहेब ५० वर्षांहून अधिक काळ करीत आले म्हणून सत्तेचा सुगंध आपल्याला मिळाला आहे हे विसरू नका. त्यांनी ज्या पद्धतीने व ध्येयाने काम केले तोच वारसा, प्रथा व परंपरा निष्ठापूर्वक पुढे नेण्याचा संकल्प या वर्धापनदिनी आपण सारेजण मिळून करूया. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांच्या निवडणुका येत्या सप्टेंबर-ऑक्टोबरला होतील. म्हणजे त्या आता दरवाज्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपल्या आहेत. अशा वेळी आपल्याला दोन्ही अध्यक्षांनी जो पाच कलमी कार्यक्रम दिला आहे तो वेगाने पुढे न्यावाच लागेल. आता मी या कार्यक्रमाकडे वळतो.

या कार्यक्रमातले महत्त्वाचे पाच मुद्दे पुढीलप्रमाणे -

१) महागाईबाबत आंदोलन

२) युवक वर्गात वाढत चाललेली बेरोजगारी

३) ओ.बी.सी. आरक्षण आणि विरोधी पक्ष करीत असलेली दिशाभूल याबाबत आंदोलन.

४) केंद्रातील सत्तेतील पक्षाच्या नेत्यांकडून महिलांविषयी वारंवार अपमानीत करण्यात येणारी कृत्ये व विविध वक्तव्ये आणि सत्तेचा चालविलेला गैरवापर याविरुद्ध आंदोलन उभारणे आणि

५) शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत आंदोलन करणे (उदा. खते, बियाणे, औषधे यांच्या वाढलेल्या किमती)

या पाच मुद्द्यांचा सविस्तर उहापोह करण्यापूर्वी राजकीय पक्षात कार्यकर्ता किती महत्त्वाचा असतो आणि त्याचे स्थान काय असले पाहिजे याचा थोडासा पण धावता आढावा घेऊया. हा घेतल्याशिवाय या पाच कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतले कार्यकर्त्याचे कळीचे स्थान व महत्व ठळकपणे अधोरेखित होणार नाही.

लोकांना लोकांच्या प्रश्नांसाठी लढणारा कार्यकर्ता भावतो. अशा कार्यकर्त्याच्यामागे हजारो लोक उभे राहतात. एका अर्थाने कार्यकर्ता हा जनतेचा तारणहार असतो. फोटोत कोणाचेही चेहरे दिसू देत, पण नेता जेव्हा बोलायला उभा राहतो तेव्हा त्याच्या एकमुखी संवादातून अनेक कार्यकर्त्यांच्या मुखाच्या कृतीचे चिंतन उभे असते. नेता हा कार्यकर्त्याच्या मनाचा सुंदर आरसा आहे. तो आरसा स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली आहे तरच नेत्याचे प्रतिबिंब त्यातून स्वच्छ दिसते. जनतेशी संबंधित असलेले प्रश्न हातात घेऊन, लोकांना एकत्र करून समुहात्मक शक्तीचा अवलंब करण्याची जी गरज असते, त्याची पूर्तता फक्त कार्यकर्ताच करू शकतो. पोलिस बंदोबस्तासाठी असतात पण कार्यकर्ता लोकांसाठी असतो. तो लोकांना हवा असतो. कार्यकर्त्याच्या अभ्यासाची परिपक्वता त्याच्या कृतीतून व्यक्त होते. म्हणून कार्यकर्त्यांनी नेहमी एक लक्षात ठेवावे पूर्ण सामर्थ्यानिशी आपण कोणत्याही प्रश्नाशी लढले पाहिजे. एखादा प्रश्न आपण हाती घेतला तर तो तडीस जाईपर्यंत निभावून नेला पाहिजे. टोल आंदोलनासारखा तो अर्धवट सोडता कामा नये. त्यासाठीचा निःस्वार्थी कणा कणखर हवा. तोडपाणी करण्याची वृत्ती नसावी. वेळ पडल्यास सगळ्यांना एकत्र करून घेण्याची कुशलता हवी. त्यासाठी कार्यकर्त्याला लोकांशी सतत संवाद करता आला पाहिजे. लोकांना सत्य समजून सांगण्याची तयारी पाहिजे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज तर याच्याही पुढे गेले. त्यांनी लिहून ठेवले आहे -

**तुका म्हणे होय मनासी संवाद ।**
**आपुलाचि वाद आपणांसी ॥ (१७२०)**

मनाने विचार करणे हे जिवंत समाजमनाचे लक्षण आहे. माणूस हा नुसता विचारशील प्राणी नाही. तो कृतीशील प्राणी आहे. विचार आणि कृती जेथे एकत्र येते तेथे संवादाचा उगम होतो. संवाद ही फार अर्थपूर्ण मानवी शक्ती आहे. संवाद करावा लागत नाही. तो साधावा लागतो. जिथे संवाद साधतो तिथे समाज आपण होऊन नतमस्तक होतो. कारण माणसाला पुढे नेण्याचे सामर्थ्य संवादात असते. संवाद माणसाला स्वतःचे समर्थ भान देतो. आपण नक्की कुठे उभे आहोत ते दाखवितो. आपण प्रवाही झालो की नाही की दगडाप्रमाणे एका ठिकाणी घट्ट रुतून राहिलो हे दाखवितो.

कोणत्याही थोर पुरुषाचे चरित्र उघडून पाहा. थोर पुरुष आधी स्वतःशी वाद घालतो. तो स्वतःतल्या 'स्व'ला घासून पुसून काढतो. त्याचा अनुभव घेतो आणि मग त्यातून तो आपल्याशी वाद घालतो. महाराष्ट्राचे भाग्य आहे की असे सुंदर वाद घालणारे मानदंड महाराष्ट्रात निर्माण झाले. त्यांनी केवळ समाज प्रबोधनच केले नाही तर समाजाला विचार कसा करावा आणि वाद कसा घालावा याचे आदर्श धडे दिले. म्हणूनच महाराष्ट्राचे वाद महाराष्ट्रापुरते न राहता ती भारतीय विचारधारा ठरली.

विचार हा नेहमी एकाक्ष नसतो. तो अनेक विचारांनी मिळून येतो. त्यात अनेक विचार नव्याने निर्माण होतात.

विचाराने विचाराशीच गुणाकार आणि भागाकार करावा लागतो. अशा वेळी बाकी काय राहते यापेक्षा प्रश्नाचे उत्तर सापडते की नाही ते महत्त्वाचे असते. विचाराचा अभ्यासाशी जेव्हा संबंध जोडला जातो तेव्हा त्या विचाराला त्याची स्वतःची एक शिस्त लाभते. त्यातून पुन्हा एका नव्या विचाराची चौकट तयार होते. या चौकटीतूनच आपल्याला आपल्या विचाराचा अवकाश तावून सुलाखून घ्यावा लागतो. वेळ आल्यास 'मी'पणा बाजूला ठेवावा लागतो. माझ्यातला मी सखोल करावा लागतो तेव्हा विचार बहुआयामी होतो. कदाचित काही विचार सिद्धान्तापर्यंत पोहोचू शकणार नाहीत पण ते सिद्धांत तयार करायला मदत करतात. विचाराचा हेतू निखळ विचार कृतीशील मार्गाने पुढे जावा हा असतो. मला असे वाटते असे म्हणण्यापेक्षा मला असे सुचते हे जास्त महत्त्वाचे आहे. अर्थातच प्रत्येक 'मी'ला मर्यादा नक्कीच आहे. या विश्वात कोणताही 'मी' परिपूर्ण नाही. हे सगळे विचारवंत मान्य करतात. म्हणूनच या अपूर्ण 'मी' ला काही प्रमाणात पूर्ण करण्यासाठी 'आपुलाची वाद' करावा लागतो.

या 'मी'पुढे काही प्रश्न ठेवावे लागतात. काही प्रश्न त्याला सुचावे लागतात. प्रश्न सुचणे ही वादाची सुंदर सुरुवात आहे. मनातली जिज्ञासा प्रश्नातून व्यक्त होते. माझ्या सभोवार मला जे काही दिसते ते निरीक्षणातून आणि परीक्षणातून माझ्या आतल्या 'मी'ला सतत विचारीत असतो आणि त्यातून मी मला बहुश्रुत करीत असतो. आजच्या काळातला 'मी' समस्याग्रस्त झाला आहे. त्याच्याभोवती प्रश्नांचे मोहोळ उठले आहे. आश्चर्य म्हणजे योग्य कृतींचा दुष्काळ आहे. शिक्षण आहे पण रस्ते नाहीत, प्रकाश आहे पण दिसत नाही, पाणी आहे पण रसत्व नाही अशी आजची अवस्था आहे.

एका बाजूला गुगलने प्रचंड कामे केली आहेत. आयपॅड व आयफोनने एका मोबाईलमध्ये सारे जग आणून टाकले आहे. वाटाच वाटा खूप दिसताहेत पण सारे मृगजळाचे मालक झाले आहेत. नक्की कळतच नाही काय करायचे आहे व कुठे जायचे आहे? यासाठी माझ्यातला 'मी' घासूनपुसून तपासायला हवा. कोणत्याही कृतीची चांगली सुरुवात मी पासूनच करावी म्हणजे प्रश्नाच्या अंतिम सत्यापर्यंत जाता येते.

आता मी पक्षाध्यक्षांनी दिलेल्या कार्यक्रमाकडे वळतो.

**१) महागाईबाबतचे आंदोलन –** आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे (क्रूड ऑईल, पेट्रोल, डिझेल) दर प्रचंड उतरलेले असताना केंद्र सरकारने आपला खजिना कायम भरलेलाच राहावा या उद्देशाने तेलाच्या किमती कमी न करता त्यावर मोठ्या प्रमाणावर कर बसवून जनतेची लूट चालविली आहे. त्यातून २७ लाख कोटी गोळा केले आहेत. या इंधन दरवाढीमुळे सर्व मालाच्या वाहतुक दरात प्रचंड वृद्धी झाली आहे. त्यात रशिया–युक्रेन युद्धाची भर पडल्याने सागरी वाहतुकीचा खर्च ४ ते ५ पटीने वाढला आहे. शिवाय अनेक उद्योगांना उदा. कागद, खाद्यतेल, धान्य वगैरे कच्चा माल मिळणे दुरापास्त झाले आहे. त्यामुळे बाजारपेठेत सर्वच वस्तुंचे भाव गगनाला भिडले आहेत. प्रचंड महागाई झाल्याने त्याचा फटका सर्वसामान्य गोरगरीब जनतेबरोबरच मध्यमवर्गीय पगारदार लोकांनाही बसतो आहे. या महागाईला केंद्रातील मोदी सरकारच जबाबदार असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सातत्याने आंदोलन करण्यात येत आहे. घरगुती गॅस सिलेंडरचे दर एक हजाराच्या पुढे गेले आहेत. केंद्र सरकारने मोठी टिमटीम करून राबविलेल्या उज्वला गॅस योजनेचा पुरता पर्दाफास झाला आहे. सिलेंडर खरेदी करणे आवाक्याबाहेर गेल्यामुळे हातावर पोट असलेल्या व मोलमजुरी करून जगणाऱ्या महिलांनी पुन्हा सरपण आणून चूल पेटविणे पसंत केले आहे आणि गॅसला तिलांजली देऊन कोनड्याची जागा दाखविली आहे. इंधनाबरोबरच खाद्यतेले, डाळी आणि अन्नधान्याच्या किमतीतही प्रचंड वाढ झाल्यामुळे एकदमच महागाईचा डोंब उसळून आला आहे. कोरोना महामारीने व नोटबंदीने अगोदरच कोट्यावधी लोकांचा रोजगार व उपजिवीकेचे साधन संपुष्टात आल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे. बेरोजगारांची व भिकाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. महागाईचा हा चटका सोसणे आता अशक्य झाल्यामुळे राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने मागील दोन महिन्यात राज्याच्या काही भागात केंद्र सरकारचा निषेध करणारी आंदोलने करण्यात आली. ती आता आणखीन वाढवायला हवीत आणि भाजप सरकारचा खरा चेहरा प्रखरपणे जनतेसमोर उघडा करायला हवा. शांततेच्या व लोकशाहीच्या मार्गाने प्रत्येक गावागावात आंदोलन, सभा, मोर्चा, धरणे यांसारखे विविध उपक्रम योजून जनतेला कार्यकर्त्यांनी सत्य सांगावे व भाजप सरकारने मागील आठ वर्षात लोकांना किती लुटले आहे हे जाहीर करावे. यासंबंधीची सर्व आकडेवारी, आलेख, माहिती उपलब्ध आहे.


**२) वाढती बेरोजगारी** : मा. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०१४ मध्ये पहिल्यांदा भाजपचे सरकार सत्तेवर आले तेव्हा दरवर्षी दोन कोटी लोकांना रोजगार निर्माण करून देऊ असे सांगितले होते. अच्छे दिनाचे गाजरही दाखवून प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख भरण्याचे व शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्याचे स्वप्नही दाखविले होते. प्रत्यक्षात एकही आश्वासन मोदी सरकारने पूर्ण केले नाही. दरवर्षी दोन कोटी याप्रमाणे मागील आठ वर्षात १६ कोटी लोकांना नवा रोजगार निर्माण करून द्यायला हवा होता. नवा रोजगार तर सोडाच उलट नोटबंदी, जीएसटी, अनेक सरकारी व सार्वजनिक उद्योगांची

विक्री, खाजगीकरण, उद्योगपती व भांडवलदारांची घरे भरणे, त्यांची कर्जे माफ करणे वगैरे. यांसारखे अत्यंत चुकीचे निर्णय घेऊन संपूर्ण अर्थव्यवस्थाच मोदी सरकारने संकटांच्या खाईत लोटली आहे. बेरोजगारीचे प्रमाण तर दिवसेंदिवस वाढतच जाईल असे चित्र आज तरी दिसते आहे. त्यामुळे शिकलेल्या युवकांपुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे. याविरुद्ध जोरदारपणे आवाज उठविण्याची गरज आहे. त्याही कामात पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सक्रियपणे लक्ष घालावे असे आवाहन अध्यक्षांनी केले आहे.

**३) ओ.बी.सी. आरक्षण** : जाती-धर्माच्या आधारावर समाजात तेढ निर्माण करून विद्वेष व संघर्ष वाढीला लावायचा हा जातीयवादी धर्मांध भाजपचा जुना धंदा आहे. हेच त्यांचे भांडवल आहे. त्यांच्या खोट्या प्रचार व भूलथापांना जनता बळी पडते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओ.बी.सीं.ना आरक्षण मिळू नये यासाठी भाजपने पडद्यामागे बऱ्याच हालचाली केल्या. फडणवीस सरकारचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत हे आपल्या वेळीच लक्षात आले नाही. या प्रश्नाचे राजकारण करून आपली पोळी भाजायची व भाजपसाठी ओ.बी.सींचा जनाधार मिळवायचा आणि आम्हीच तुमचे तारणहार आहोत असे आभासी चित्र निर्माण करून मते मिळवायची या क्षुद्र हेतूने पछाडल्यामुळेच भाजपचे नेते उलटेसुलटे फासे टाकत राहिले. मुख्यमंत्री मा. उद्धव ठाकरे व ओबीसींचे नेते मा. छगन भुजबळ हे सातत्याने या आरक्षणासाठी प्रामाणिकपणे मा. शरद पवार यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली प्रयत्न करीत आले आहेत. महाविकास आघाडीने यासाठी केलेला महत्प्रयास आपण जनतेपुढे नेण्याची गरज आहे. न्यायालय मध्यप्रदेशला वेगळा न्याय लावते आणि महाराष्ट्राच्या बाबतीत वेगळी भूमिका घेते, असे का घडते हे मी तुम्हांला नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. याबाबत फार परखडपणे व प्रखर लिहिता येईल पण कदाचित तो न्यायालयाचा अवमान झाला असे निमित्त करून भाजपवाले कोर्टात जातील. त्यामुळे सत्य बोलण्यावर देखील मर्यादा आल्या आहेत ही वस्तुस्थिती समजून घ्या. देशात अगोदरच अघोषित आणिबाणी आहे. खरे बोलण्याची सोय राहिलेली नाही. ईडी, सीबीआय, इन्कमटॅक्स यांसारख्या सरकारी यंत्रणांचा वापर करून विरोधी लोकांवर दडपण आणून दहशत निर्माण करण्याचे काम केंद्र सरकारने चालविले आहे. त्यामुळे आपण रीतसर मार्गाने जाऊन व ओबीसींच्या जनगणनेची आकडेवारी गोळा करून ती न्यायालयात सादर करू.बघू या न्यायालय किती सत्याच्या बाजूने उभे राहते ते! 'सत्यमेव जयते' हे आता फक्त म्हणण्यापुरते ब्रीदवाक्य उरू नये एवढीच न्यायालयाकडून अपेक्षा!

**४) महिलांना अपमानीत करणारी वक्तव्ये आणि सरकारी यंत्रणेचा गैरवापर** : मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून भाजपचे मंत्री, खासदार, पदाधिकारी आणि महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष महिलांबाबत किती अश्लील विधाने करतात आणि त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक देऊन किती अपमानीत करतात हे मागील आठ वर्षांपासून आपण सर्वजण पाहात आलो आहोत, ऐकत आलो आहोत. याबाबत प्रधानमंत्री मात्र अवाक्षर बोलत नाहीत किंवा वेडेवाकडे बोलणाऱ्या त्यांच्या पक्षाच्या नेत्यांना सूचनाही देत नाहीत किंवा त्यांच्यावर कारवाई देखील करीत नाहीत. त्यांचे असे मौन बाळगणे म्हणजे एक प्रकारचा पाठिंबाच आहे. पंतप्रधानच जर असे वागणार असतील तर महिलांनी कोणाकडून अपेक्षा करावी? म्हणून याविरुद्ध प्रखर आवाज आपल्या कार्यकर्त्यांनी उठविला पाहिजे. ईडी, सीबीआय, प्राप्तीकर विभाग व अन्य सरकारी यंत्रणांचा विरोधकांना नामोहरम करण्यासाठी केंद्र सरकारकडून जो जबरदस्त व बळजबरीचा वापर केला जातो आहे तो प्रकार तर केवळ निंदनीयच नाही तर लोकशाहीला दडपणारा व काळीमा फासणारा आहे. महाविकास आघाडीचे सरकार पाडण्यासाठी जर अशा यंत्रणांचा वापर ते करणार असतील तर ते भ्रमात आहेत आणि मूर्खांच्या नंदनवनात वावरत आहेत एवढेच म्हणता येईल. याविरुद्धही प्रखर आवाज आपल्याला उठवावाच लागेल.

**५) शेतकऱ्यांच्या समस्यांसाठी आंदोलन** : यावर्षीच्या खरीप हंगामात बी बियाणे आणि रासायनिक खते यांची मोठ्या प्रमाणावर कमतरता आहे. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रश्न अनेक ठिकाणी निर्माण होतील अशी भिती व्यक्त होते आहे. खते आणि बी बियाण्यांचे भाव तर प्रचंड वाढले आहेत पण प्रश्न उपलब्धतेचा आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा खूप कमी आहे याला केंद्र सरकारच जबाबदार आहे कारण रासायनिक खतांची आयात सरकारने पुरेशी केलेली नाही. कंपन्यांकडे खताचा पुरेसा साठाही नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पेरणीसाठी लागणारी खते पैसे दिले तरी उपलब्ध होऊ शकणार नाहीत. याचा निश्चित विपरीत परिणाम खरीपाचे उत्पादन घटण्यावर झाल्याशिवाय राहणार नाही. अगोदरच शेतकरी शेतमालाला भाव नसणे, अवेळी पाऊस, गारपीट, तापमान वाढ व अन्य संकटांमुळे बेजार व कर्जबाजारी झाला आहे. केंद्र सरकारने चुकीची धोरणे राबवून त्याला संकटाच्या खाईत लोटले आहे. त्यातून त्याला बाहेर काढण्यासाठी आपल्याला प्रयत्नांची शिकस्त करावी लागेल. हे काम राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मनापासून करतील आणि पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त मदतीची भेट जनतेला देतील अशी अपेक्षा करून थांबतो.



**प्रश्न : राजद्रोहाच्या कायद्याचा फेरविचार केंद्र सरकार करतंय. या मुद्यावर आपणही आपले मत व्यक्त केले होते. कुठेतरी केंद्र सरकारने यावर यू-टर्न घेतलांय का?**

**शरद पवार :** असं आहे, की भीमा-कोरेगाव इथं आपल्याकडं कंट्रोव्हर्सी झाली होती आणि त्या आयोगानं मलाही समन्स काढलं. त्या समन्समध्ये असं लिहिलं, की जे काही इन्सिडंट झाले वगैरे, त्याच्यापेक्षा पुन्हा असं घडू नये यासाठी कायद्यांच्यामध्ये दुरूस्त्या कराव्यात, याबाबतीत तुमचा मला सल्ला हवाय. त्यावेळी हा प्रश्न मला विचारला. हे कलम मान्य करू नये असं स्टेटमेंट मी त्यादिवशी केलं. सुदैवानं सुप्रिम कोर्टामध्ये तीच एक केस चालू आहे. त्या केसमध्ये अनेक वकिलांनी भाग घेतलांय आणि त्याच्यामध्ये काल केंद्र सरकारनी आम्ही याचा फेरविचार करायला तयार आहोत, असं मत मांडल्याची बातमी आहे. हे जर असेल तर योग्य आहे.

**प्रश्न : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय पंधरा दिवसांत घेणं शक्य आहे का?**

**शरद पवार :** तो गैरसमज आहे असं माझं मत आहे.




मी सांगितलं, की १२४(८) हे जे कलम आहे, त्या कलमामध्ये राजद्रोह म्हणून कुणाच्यावरही खटला भरण्याची तरतूद आहे. हे कलम आलं कधी? हे कलम १८९० साली इंग्रजांनी समाविष्ट केलं. आता इंग्रज गेले. त्या काळामध्ये इंग्रज राज्याविरूद्ध कुणी उठाव केला, तर त्याच्यासाठी राजद्रोह. आता आपण स्वतंत्र देशाचे नागरिक आहोत आणि त्यामुळं लोकशाहीमध्ये सरकारच्या विरूद्ध एखाद्या प्रश्नावर आवाज उठवायचा जनतेचा अधिकार आहे. त्यामुळं राजद्रोह कोर्टानं असं सांगितलं, की निवडणूक थांबवली होती. ज्या स्टेजला थांबवली, तिथपासून तुम्ही सुरू करा. आता अनेक ठिकाणी काय झालंय, तर याद्या तयार झाल्या आहेत. काही ठिकाणी हरकती मागवायच्यात. आता हरकती मागवल्या, तर त्याला एक महिना लागतो. हरकती येऊन याद्या तयार झाल्यावर त्यावर वाद होतो. वाद तयार झाल्याच्यानंतर मग महिलांच्यासाठी राखीव कोणतं, दलितांसाठी कोणता हे ठरवावं लागतं आरक्षण. त्याला एक दोन-तीन आठवडे

लागतात. हे सगळं व्हायला अडीच-तीन महिने हे लागणारच. आणि मी जो कोर्टाचा अर्थ समजतो तो म्हणजे, जेव्हा थांबवलं तिथनं सुरू करा. आणि हे सगळं करायला पंधरा दिवसांत काय होणार नाही. पंधरा दिवसांत ही प्रक्रिया सुरू करा.

**प्रश्न : संभाजीराजेंचं आम्ही स्वागत करू असं हसन मुश्रीफ यांनी म्हटलं आहे. त्यांना राज्यसभेची जागा देण्याचा काय विचार आहे का?**

**शरद पवार :** अशी काय चर्चा वगैरे झालेली नाही. पण आता राज्यसभेत मीही त्याठिकाणी आहे. ज्यावेळी महाराष्ट्राचे काय प्रश्न यायचे आणि आम्ही महाराष्ट्रातल्या सदस्यांना बोलवायचो, की हा असा असा प्रश्न आहे. इथं आपण पक्षीय मतभेद काही असले तरी बाजूला ठेऊ. राज्यासाठी एकत्र येऊ. तर अशा कामांमध्ये संभाजीराजेंचं सहकार्य आम्हाला नेहमी मिळालं. आता उद्या पाठिंबा द्यायचा म्हणजे हा एका पक्षाचा निर्णय नाही. आम्हाला काँग्रेसला विचारावं लागेल. शिवसेनेला विचारावं लागेल. शक्यतो आम्ही एकत्रित निर्णय घेऊ.

**प्रश्न : कोल्हापूरच्या राजकारणात काही फरक जाणवतो का?**

**शरद पवार :** मला फरक एवढाच जाणवतो, की कोल्हापूर हे गाव किंवा जिल्हा चळवळीचं एक केंद्र असायचं. पण त्या चळवळी कशासाठी असायच्या? त्या चळवळी लोकांच्या प्रश्नांच्यासाठी असायच्या. आत्ता सामान्य लोकांच्यासमोर अनेक प्रश्न आहेत. सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे महागाई. त्याशिवाय बेकारी, कायदा-सुव्यवस्था हे सगळे प्रश्न बाजूला राहिले आणि आता अयोध्येचं काय झालं, कोण कुठं प्रार्थना म्हणला. याचा अर्थ स्वच्छ आहे, की ज्यांच्या हातामध्ये देशाची सूत्रं आहेत, त्या लोकांना मुलभूत प्रश्न सोडवता येत नाहीत, अपयश आलेलं आहे आणि म्हणून लोकांचं लक्ष डायव्हर्ट करण्याच्यासाठी या सगळ्या धर्माच्यासंबंधित विषयांना प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतली आहे. आणि त्याचे हे परिणाम आहेत.

**प्रश्न : वाढती महागाई पण रोखण्यासाठी सरकारला अपयश आलेलं आहे. श्रीलंकेत तर आणीबाणी लागली आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी मे महिन्यात विविध ठिकाणी झालेल्या पत्रकार परिषदांमधून पक्षाची ध्येयधोरणे, राज्यातील सरकारचे काम, देशातील वेगवेगळे प्रश्न आणि त्यावर केंद्र सरकारला येत असलेले अपयश आदी मुद्यांवर आपली मते मांडली. त्याचा थोडक्यात गोषवारा...

# केंद्र सरकार लोकांचं लक्ष धार्मिक विषयांकडे वळवतंय

## शरद पवार यांची टीका

**शरद पवार :** मघाशीच मी सांगितलं, की इश्यूज कोणते आहेत. महागाईचा इश्यू आहे आणि बेकारीचा इश्यू आहे. आणि आज दिवसेंदिवस प्रत्येकी गोष्टीच्या किंमती वाढतायंत. आता पेट्रोल-डिझेल कुठं जाऊन पोहोचलं? आज तुम्ही स्टीलचे भाव बघा. ९५ ते ९८ रूपये स्टीलचे भाव गेलेत. आता कसं आहे. पेट्रोल किंवा डिझेल याचं भाव वाढणं म्हणजे ज्याच्याकडं गाडी आहे, त्यालाच फक्त त्रास होतो असं नाही. त्यातून भाजीपाला, धान्य अशा प्रत्येक गोष्टीचे भाव वाढतात. सामान्य माणसाला हे सगळं सहन करावं लागतं. आणि आज देशाची सूत्रं ज्यांच्याकडं आहेत, ते याकडं ढुंकून बघायला तयार नाहीत.




**प्रश्न : लोकं या प्रश्नासंबंधी बंड करतील असं वाटतं?**

**शरद पवार :** बंड करायचं म्हणजे चळवळी होतील आणि चळवळी कराव्या लागतील. आत्ताचं जे केंद्रात मोदींचं सरकार आहे, त्या सरकारनं जी आश्वासनं लोकांना दिली होती, विशेषत: महागाई, बेरोजगारी या प्रश्नांवर, त्याच्यात शंभर टक्के अपयश आलेलं आहे. आणि त्याची किंमत लोक त्यांच्याकडून वसुल करतील योग्यवेळी.

**प्रश्न : महाराष्ट्रात आल्यावर औरंगजेबाची जी कबर आहे त्याठिकाणी जाऊन वाद वाढवतायंत. याबद्दल आपलं काय मत आहे?**

**शरद पवार :** असं आहे, की सगळ्यांना महाराष्ट्राचा आणि देशाचा इतिहास माहिती आहे. औरंगजेब यांनी त्यांच्या कालखंडामध्ये काय केलं, हे सर्व माहिती असताना काही कारण नसताना हे राज्य शांततेनं चालू असताना या राज्यात नवीन प्रश्न निर्माण करण्याचं काम काही लोकांनी केलं हे काय योग्य नाही. त्यामुळं त्याचा निषेधच केला पाहिजे.

**प्रश्न : सरकारच्या कामाविषयी तुम्ही समाधानी आहात का?**

**शरद पवार :** आम्ही एकत्रितपणे सरकार चालवतोय. व्यवस्थित चालवतोय. त्यामुळं निश्चित समाधानी आहे. आता ही पाच वर्षे तर मिळाली आहेतच, पण पुढची पाच

वर्षेही मिळतील.

**प्रश्न : नारायण राणे म्हणालेत, की ६ जून हा दिवस शेवटचा दिवस आहे महाराष्ट्र सरकारचा.**

**शरद पवार :** नारायण राणे साहेब, चंद्रकांत पाटील साहेब हे सारखे तारखा वगैरे देत असतात. आम्हीही ऐकत असतो, वाचत असतो. एन्जॉय करायचा असतो.

**प्रश्न : ऊस गेला नाही म्हणून बीडमध्ये एका शेतकऱ्यानं आत्महत्या केली.**

**शरद पवार :** माझ्या वाचनात आलं, की अशी अशी आत्महत्या केलेली आहे, ही केवळ चिंताजनक आहे. पण मुद्दा असा आहे, की मी याच्या खोलात गेलेलो नाही किंवा मला पूर्ण माहिती नाही. पण मला एक गोष्ट माहित आहे, की यंदाच्या वर्षी विशेषत: जालना जिल्ह्यामध्ये आणि बीडच्या काही भागामध्ये आणि इकडं पश्चिम महाराष्ट्रामध्ये सातारा परिसरामध्ये अतिरिक्त ऊस आहे आणि राज्य सरकार ज्या पद्धतीनं सगळ्या सहकारी साखर कारखान्यांना सूचना देतंय, की कारखाने बंद करू नका. शेवटचा ऊस जाईपर्यंत गळित चालू राहील याची काळजी घ्या आणि हे काम सरकारच्यावतीनं सुरू आहे.

सकाळी मी सांगितलं, की ॲग्रीकल्चर सोसायट्या ज्या आहेत, त्याच्यानंतर सेवकांच्या ज्या सोसायट्या आहेत. आणि त्यानंतर को-ऑपरेटिव्ह बँका ज्या आहेत, नागरी सहकारी बँका या सामान्य माणसाला त्याची जी कर्जाची गरज असते ते सहज शेतकऱ्यांच्यापर्यंत पोहोचू शकतात. पण जसं या संस्थांच्याकडं त्यांना पोहोचणं शक्य होतं, तसं स्टेट बँकेकडं पोहोचणं शक्य होत नाही. किंवा



कमर्शियल मोठ्या बँका आहेत त्यांच्याकडं पोहोचणं शक्य होत नाही. असं असताना रिझर्व्ह बँकेचा दृष्टीकोन या छोट्या ज्या संस्था आहेत, यांच्याबाबतीत सहानुभूतीचा नाही असं ऑब्झर्वेशन आमच्या कानावर सातत्यानं या क्षेत्रातील लोक सांगतात. उदाहरणं देतात. आणि त्यामुळं मी सकाळी त्याचा उल्लेख केला. आणि आमचा आग्रह आहे, की विशेषत: फायनान्स मिनिस्टर गव्हर्मेंट ऑफ इंडिया, त्यांनी याची नोंद घ्यावी आणि त्यांच्यापुढं आम्ही मांडणी पण करतो आहोत.

**प्रश्न : राज्यसभेच्या निवडणुकीसंबंधी...**


**शरद पवार :** असं आहे, की प्रत्येक पक्षाची स्ट्रेंथ काय आहे यावर सगळं अवलंबून आहे. अन्य पक्षांशी आम्ही चर्चा केलेली नाही. पण राष्ट्रवादी पक्षाच्यासिमीत मी सांगतो, की आमचा एक प्रतिनिधी निवडून यायला कुठल्याही प्रकारची अडचण नाही. त्याची जी काय मतांची गरज आहे, ती गरज भागवून कायतरी बारा एक मतं आमच्याकडं जादा शिल्लक आहेत. त्याच्यानंतर शिवसेनेकडं सुद्धा ६४ मतं आहेत. त्यामुळं त्यांनाही काय अडचण नाही. आणि तिसरा राहता राहिला आमचा सहकारी पक्ष काँग्रेस, त्यांच्याकडेही पुरेसे नंबर आहेत. पण कमी जास्त असेल तर आमचे लोक त्यांना मदत करतील.






**प्रश्न : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू होतेय. महाविकास आघाडी एकत्रितपणे या निवडणुका लढवणार का?**

**शरद पवार :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्यासंदर्भात याचा कार्यक्रम आता लवकरच जाहीर होईल असं स्पष्ट झालंय. सुप्रिम कोर्टाने यासंबंधीचा एक निर्णय घेतलेला आहे. याशिवाय राज्याच्या निवडणूक आयोगानं काही गोष्टींचं स्पष्टीकरण हे सुप्रिम कोर्टाकडनं मागवलेलं आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र याठिकाणी तो प्रश्न निर्माण झालेला आहे. आता काय निकाल येतो तो बघू. पण तुम्ही म्हणतांय ती गोष्ट खरी आहे, की येत्या निवडणुकीच्या संबंधीचा कार्यक्रम फायनल करून त्याबाबतीत त्याची सुरूवात करायची ही प्रक्रिया करावी लागेल. आता नॉर्मल पोझिशन असते, त्यावेळी फारशा अडचणी काय येत नाहीत. पण






यावेळेला महाराष्ट्रामध्ये तीन पक्षांचं मिळून सरकार आहे. त्यामुळं या सरकारमधल्या घटक पक्षांच्याबरोबर आमचे अध्यक्ष हे चर्चा करतील. अन्य पक्षांचे जे अध्यक्ष आहेत, त्यांच्याशी चर्चा करतील आणि याच्यातून एकत्रित आपण निर्णय घ्यायचा का हा एक पर्याय असू शकतो. तो नसेल तर दुसरा काय पर्याय आहे का हे असू शकेल किंवा प्रत्येकानं स्वतंत्र निवडणुका लढवाव्यात आणि निवडणुका झाल्यावर एकत्र यावं असाही विचार येऊ शकतो का अशा दोन-तीन गोष्टी नजरेसमोर आहेत. त्याचा अंतिम निर्णय मला असं वाटतं, की येत्या दहा ते पंधरा दिवसांत घ्यावा लागेल. कारण निवडणुका अत्यंत जवळ आलेल्या आहेत.

**प्रश्न : केंद्र सरकार आवश्यक वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण आणण्यात अपयशी ठरतंय का?**

**शरद पवार :** आमचं म्हणणं तेच आहे. आज खरं देशाच्या समोरचे प्रश्न लोकांना आवश्यक असलेल्या वस्तूंच्या किंमती, त्यचबरोबर पेट्रोल आणि डिझेलच्यासंबंधीच्या किंमती आणि त्याचबरोबर दिवसेंदिवस वाढत जाणारी बेकारी. आज किंवा कालच केंद्र सरकारच्यावतीनं सुद्धा जाहीर करण्यात आलेलं आहे, की आता ८ टक्क्याच्या आसपास सुद्धा ही संबंध महागाईची लेवल पोहोचलेली आहे, जी गेल्या अनेक वर्षात कधी नव्हती. त्यामुळं केंद्र सरकारची ही जबाबदारी आहे, की या किंमती नियंत्रित ठेवायच्या. केंद्र सरकारची हीही जबाबदारी आहे, पेट्रोलियम पदार्थाच्या किंमती मर्यादित ठेवायच्या आणि या जर ठेवल्या नाहीत, तर याचे परिणाम अनेक गोष्टींवर होत असतात आणि त्यासाठी आज केंद्राच्यासमोर हा मुद्दा प्रामुख्यानं मांडावा अशा प्रकारची चर्चा आमची चालू आहे. कालच मला सीपीएमचे सीताराम येचुरी, जे त्यांचे राष्ट्रीय नेते आहेत, त्यांचा फोन होता, की या प्रश्नाच्यासंबंधी आपण सगळ्यांनी एकत्र बसूया आणि एकत्रित भूमिका केंद्र सरकारबरोबर घेऊया आणि त्या प्रयत्नात आम्ही आहोत.

**प्रश्न : केंद्र सरकार म्हणतंय, की राज्य सरकारांनी पेट्रोलवरील कर कमी करावा.**


**शरद पवार :** प्रश्न असा आहे, की केंद्र सरकारचा टॅक्स किती आहे, हे बघायला पाहिजे आणि अन्य राज्यांचेही कसे टॅक्सेस आहेत हे ज्यावेळी बघितली त्यावेळी असं दिसेल की केंद्र सरकारचा कर हा त्यांच्याहून अधिक आहे. आणि दुसरी गोष्ट अशी आहे, जी राज्यं प्रचंड प्रमाणावर केंद्राला

कर पुरवतात किंवा अर्थपुरवठा करतात त्या राज्यांच्या या प्रश्नाकडं ज्यांना कराचं उत्पन्न अधिक मिळतं त्याकडं केंद्र सरकारनी गांभीर्यानं बघण्याची गरज आहे. महाराष्ट्र स्टेट हे या देशामध्ये हायेस्ट टॅक्स कलेक्शनचं केंद्राचं राज्य आहे आणि त्यामुळं साहजिकच आपली इच्छा ही आहे, की महाराष्ट्राला त्यांच्याकडनं न्याय मिळावा.

**प्रश्न : केंद्र सरकारचा राज्यांकडं पाहण्याचा दृष्टीकोन याबद्दल काय वाटतं?**

**शरद पवार :** सध्या ज्या पद्धतीनं केंद्रातील सत्ताधारी पक्ष किंवा त्यांचा राज्यातला पक्ष विविध प्रश्नांच्या संबंधी ज्या प्रकारची भूमिका घेतायंत तो त्यांचा सगळा ॲप्रोच हा आम्हाला योग्य वाटत नाही. मतभेद असतात. पण मतभेद याचा अर्थ, एकमेकाच्यासंबंधी एक एक्स्ट्रीम अशी भावना ही ठेवणं योग्य नाही. एकेठिकाणी आजच माझ्या वाचनात आलं, माझाच उल्लेख त्याच्यात आहे, की बाळासाहेब ठाकरे आणि मी, आमच्यात प्रचंड संघर्ष होता. पण एका चौकटीच्या बाहेर त्याला व्यक्तीगत स्वरूप येणार नाही, याची काळजी दोन्ही बाजूंनी घेतली होती. आज ज्यांच्या हातामध्ये केंद्राची सत्ता आहे, त्या सत्तेच्या ज्या वेगवेगळ्या यंत्रणा आहेत, त्या यंत्रणेचा त्यांच्या विरोधी विचाराच्या लोकांना संकटात आणण्याच्यासाठी, नाउमेद करण्याच्यासाठी आज त्या ठिकाणी वापर केला जातो. हे यापूर्वी महाराष्ट्रात कधी घडलंच नव्हतं. साधी गोष्ट आहे, नवाब मलिकसारख्या व्यक्तीनी, तो प्रवक्ता होता, त्याबद्दलची नाराजी कुणाची असेल, मी काय नाही म्हणत नाही, पण २५ वर्षापूर्वीची कुठली तरी केस, की त्याच्यात तथ्य आहे की नाही हे आता कोर्टात सिद्ध होईल त्याच्यासाठी एक महिना त्यांना अटक करून ठेवलीय. दुसरे आमचे सहकारी जे गृह खात्याचे मंत्री होते, त्यांना अरेस्ट करण्यात आलेली आहे. त्यांच्याबद्दलची तक्रार एका पोलिस अधिकाऱ्यानेच दिली,









की ज्या अधिकाऱ्याला शेवटी आज अधिकारापासून बाहेर ठेवायचा निकाल घ्यावा लागला. याच्यामध्ये कम्प्लेंट केल्याच्यानंतर त्या यंत्रणेनं जी चौकशी केली, त्याच्यामध्ये पहिल्यांदा शंभर कोटीचा गैरव्यवहार आहे असं सांगितलं. नंतर दुसरं दुरूस्त आरोपपत्र केलं, की शंभर नाही, चार कोटीचा आहे. आणि तिसरं आता केलंय, त्यात म्हटलंय एक कोटीचा आहे. याचा अर्थ काय दिसतो? शंभर कोटीचा आरोप करायचा, एखाद्या व्यक्तीला अटक करायचं आणि आज सांगायचं की एक कोटीच आहे. मला माहिती नाही, आणखी एक पंधरा दिवसांनी ते लाखावर येईल का हजारावर येईल. पण असं असताना एका जबाबदार सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्या, अनेक वर्षे शासनामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीला इतक्या महिन्याच्यासाठी जेलमध्ये ठेवायचं आणि साधी गोष्ट आहे, याचा शारिरीक कुठं काय इजा असेल तर त्यासाठी त्याला हव्या त्या डॉक्टरकडून इलाज करायला परवानगी सुद्धा न देणं याचा अर्थ, आज ज्यांच्या हातात देशाची सत्ता आहे, ते कोणत्या टोकाला वागतात, याची ही उदाहरणं आहेत.

**प्रश्न : देशातील सध्याचं वातावरण पाहता भारत श्रीलंकेच्या मार्गाने जाईल का?**

**शरद पवार :** जे काय श्रीलंकेत घडलंय आणि काही प्रमाणात आपण पाकिस्तानमध्येही पाहिलं. श्रीलंकेत लोक रस्त्यावर आले. मला स्वत:ला असं वाटतं, की एक गोष्ट समाधानाची आहे, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी घटना देशाला दिली, त्या संविधानामुळं श्रीलंकेसारखी स्थिती इथं येईल असं चित्र नाही. येऊ नये. जर मुलभूत प्रश्नांची सोडवणूक होत नसेल, बेफिकीरपणानं केंद्र सरकार मुलभूत प्रश्नांच्याकडं पाहात असेल तर शेवटी लोकांची प्रतिक्रिया येतच असते. पण ती आली तर ती चौकटीच्या बाहेर असू नये.

■■

मतदारांना 'अच्छे दिन'चे आश्वासन देऊन सत्तेवर आलेल्या राज्यकर्त्यांच्या राजवटीला आठ वर्षे पूर्ण झाली. योगायोग पहा की या सरकारची आठ वर्षे पूर्ण होताना जनतेला उच्चांकी महागाईचे चटके सहन करावे लागत आहेत. विशेष म्हणजे अशी खोटी व बनावट स्वप्ने दाखविणारे राज्यकर्ते स्वतः मात्र वेगळ्याच विश्वात मश्गुल आहेत. त्यांच्या दृष्टीने महागाई हा फारसा महत्वाचा त्यांच्या उत्सवात मग्न आहेत. सरकारच्या पाळीव माध्यमांची पण कमाल आहे. भारताचे सामान्य नागरिक महागाईच्या चटक्यांनी हैराण झालेले असताना त्यांनी मात्र विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी अलीकडेच केलेल्या परदेश दौऱ्याची रसभरित वर्णने व वार्तांकन करण्यात धन्यता मानली. विश्वप्रियांनी या दौऱ्यातही दुसऱ्यांची निंदा करण्याचा त्यांचा अत्यंत प्रिय असा धंदा सोडला नाही. स्वतःची




मुद्दा नाही. उलट त्यावरुन लक्ष इतरत्र वळविण्यासाठी त्यांनी हिंदुत्वाचे, हिंदू वर्चस्वाचे मुद्दे उपस्थित करुन जनतेला भ्रमित करण्यास सुरुवात केली आहे. विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी परदेश दौरे सुरु केले आहेत. तेथे त्यांच्या उच्चभ्रू पेहरावांमधील विविधतेचे किमती व महागडे नमूने सादर होऊ लागले आहेत. त्या दौऱ्यांच्या प्रसिध्दीत ते धुंद अवस्थेत आहेत. महागाईने जनता तळमळत असली तरी ते टिमकी वाजवण्यासाठी आणि स्वनामधन्यतेच्या त्यांच्या नियमित कार्यक्रमासाठी परनिंदा करण्याचा आवडता उद्योग त्यांनी या दौऱ्यातही इमानइतबारे पार पाडला. परदेशातील भारतीयांना भेटून कॅमेऱ्याचे झोत स्वतःवर ठेवून भारतातील जनतेला प्रभावित करण्याचा ह अत्यंत हलका, सवंग प्रकार त्यांनी यावेळीही केला. आता हे असले कार्यक्रम पाहून त्याची शिसारी येऊ लागली आहे. नागरिकांना महागाई

असह्य होत असतानाही किमती, मूल्यवान आणि भपकेबाज पेहराव करुन, त्यावर महागड्या शाली पांघरुन आपली छबी सार्वत्रिक करण्याचे हे व्यसन आणखी किती वाढणार आहे आणि किती काळ चालणार आहे हे कळेनासे झाले आहे. चेहऱ्यावर असे काही हसरे भाव की जणू काही भारतात सर्व काही आलबेल आहे, जनता खाऊनपिऊन सुखी आहे, आनंदात आहे! हा राजा आपल्याच उत्सवांमध्ये मग्न आहे!



# महागाई

## तळमळे अवघी प्रजा... उत्सवी मग्न राजा!

**- अनंत बागाईतकर**

महागाईला भारतातील स्थिती जबाबदार नाही. रशिया-युक्रेन युध्द आणि एकंदरीतच जागतिक अर्थव्यवस्थेतील समस्यांमुळे भारतालाही महागाईला तोंड द्यावे लागत आहे असा एक सहज पटेल असा युक्तिवाद करुन जनतेची दिशाभूल करण्याचा 'राष्ट्रीय कार्यक्रम' राज्यकर्ते नियमितपणे करीत आहेत. त्यांना त्यांच्या 'पाळीव माध्यमांनी ईमानी साथ दिलेली आहे. त्यामुळे अमेरिकेत

**काही ठळक बिंदूंच्या आधारे या आठ वर्षांचे मूल्यमापन करता येईल. विकासदर खालावलेला आहे हे विविध वित्तीय संस्थांनी आकडेवारीसकट सांगितलेले आहे. कामगार भरतीचे प्रमाणही ऐतिहासिक नीचांकी टक्क्यांवर (४०.३८) आहे तर बेकारीचे प्रमाण ७.८३ टक्के नोंदविण्यात आले आहे. जीएसटीच्या उच्च किंवा चढ्या दरांमुळे महागाईच्या तीव्रतेत वाढ झालेली आहे. सामाजिक सेवांवरील खर्चात सरासरी पाच टक्के घट गेल्या आठ वर्षात झालेली आहे. मनमोहनसिंग सरकारच्या दहा वर्षांच्या काळात हे प्रमाण सरासरी ९ टक्के होते. संस्थात्मक गुंतवणूकदारांनी गेल्या सात महिन्यात भारतातून २२ अब्ज डॉलर्स काढून घेतले आहेत. परकी चलन गंगाजळीत सातत्याने घट होत आहे आणि या सरकारच्या काळात आतापर्यंत ३६ अब्ज डॉलर्स बाहेर वाहून गेले आहेत. एका डॉलरचा रुपयातील दर ७७ रुपये ६९ पैसे इतका आहे(२९ मे २०२२). सध्याच्या पंतप्रधानांनी आणि त्यांच्या पक्षसहकाऱ्यांनी मनमोहनसिंग यांच्या काळात रुपयाच्या दरात किंचित गिरावट आलेली असताना, 'पंतप्रधानांच्या वयाप्रमाणे रुपया घसरत चालला आहे' अशी अत्यंत खालच्या दर्जाची टिप्पणी केली होती. आता यांच्या कारकिर्दीत रुपया केवळ घसरत नसून पार मातीत चाललेला असताना काय टिप्पणी करायची?**

कशी महागाई आहे, पाकिस्तानात भारतापेक्षा पेट्रोल व डिझेल कसे व किती महाग आहे याच्या बातम्या देऊन ही पाळीव माध्यमे महागाईचे निर्लज्ज समर्थन करताना दिसत आहेत. या असल्या बातम्या देऊन भारत आणि पाकिस्तानची बरोबरी केली जाते याचे साधे भान या 'भाट माध्यमां'ना राहिलेले नाही. राज्यकर्त्यांच्या चाटुकारितेची अशी काही नशा या पाळीव माध्यमांना चढलेली आहे की त्यांचा सारासार विवेक संपून गेलेला आहे. परंतु अद्याप देशात काही यंत्रणा आहेत की ज्यांची सचोटी शाबूत आहे. त्यामुळेच महागाई आणि एकंदरीतच आर्थिक स्थितीबाबतचे वस्तुनिष्ठ चित्र या यंत्रणांमार्फत समजायला मदत होते.

राज्यकर्त्यांना अर्थव्यवस्थेचे व्यवस्थापन चांगल्या रीतीने करता येत नसल्याचा निष्कर्ष निघतो. अर्थव्यवस्थेची ढिसाळ हाताळणी होत असल्यानेच हा आर्थिक विचका व अनागोंदी निर्माण झाली आहे हेच या अहवालाने सूचित केले आहे. देशांतर्गत आर्थिक परिस्थितीच्या दुर्दशेचे खापर जागतिक घडामोडींवर फोडण्याचा राज्यकर्त्यांचा प्रकार ही निव्वळ 'फेकूगिरी' व जनतेची फसवणूक असल्याचाच अर्थ या अहवालातून ध्वनित होतो. 'जागतिक घडामोडींचा देशांतर्गत आर्थिक स्थितीवर होणारा परिणाम नगण्य किंवा अत्यल्प असतो' असे रिझर्व बँकेच्या अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. म्हणजेच वर्तमान आर्थिक



राज्यकर्त्यांच्या 'राष्ट्रीय दिशाभूल कार्यक्रमा'ला टाचणी लावणारा अहवाल रिझर्व बँकेनेच दिला आहे. जागतिक आर्थिक परिस्थितीचा देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर अंशतः परिणाम होत असला तरी त्याचे प्रमाण किंवा टक्केवारी अल्प असते. देशांतर्गत आर्थिक धोरणे, सरकारतर्फे लादले जाणारे कर व विविध शुल्के, पुरवठा शृंखलेतील विविध अडथळे आणि अपुरा वस्तु पुरवठा यासारख्या कारणांमुळे देशांतर्गत महागाई वाढलेली आहे. त्यामध्ये जागतिक परिस्थितीचा परिणाम नगण्य आहे असे रिझर्व बँकेच्या ताज्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यात तथ्य अशासाठी आहे की वरील सर्व बाबी या केवळ केंद्र सरकारच्या अधिकारात येणाऱ्या आहेत. म्हणजेच अनागोंदीला व महागाईला राज्यकर्त्यांची धोरणेच जबाबदार आहेत हाच त्याचा अर्थ होतो हे जनतेने समजावून घेण्याची वेळ आली आहे. सांख्यिकी भाषेत सांगायचे झाल्यास दैनंदिन जीवनावश्यक वस्तुंच्या जागतिक पातळीवरील किमतींचा देशांतर्गत ग्राहक किंमत निर्देशांकावर(सीपीआय) म्हणजेच महागाई निर्देशांकावर होणारा परिणाम फक्त ०.०२ टक्के असतो असे रिझर्व बँकेने म्हटले आहे.

(आर्थिक) संवेदनशीलता विश्लेषण पाहणी अहवाल रिझर्व बँकेने नुकताच जारी केला आणि त्यामध्ये यासंबंधीची आकडेवारी देण्यात आली आहे. एप्रिल – २०२२ मध्ये घाऊक किंमत निर्देशांक(डब्ल्यूपीआय) १५.०८ टक्के नोंदला गेला. तर किरकोळ किंवा ग्राहक किंमत निर्देशांक(सीपीआय)

हा ७.७९ टक्के नोंदला गेला. यालाच महागाई निर्देशांक म्हणतात. २०१४मध्ये अतिमहत्वाकांक्षी घोषणांच्या लाटेवर आरूढ होऊन सत्तेत आलेल्या सत्ताधाऱ्यांच्या गेल्या आठ वर्षांच्या कारकिर्दीतील महागाईची ही उच्चांकी वाढ मानावी लागेल. ग्राहक किंमत निर्देशांक(सीपीआय) हा प्रामुख्याने खाद्यान्न(फूड) आणि पेय(बीव्हरेजेस)वस्तुंच्या किमतीवर आधारित असतो. एकंदर चलनवाढीमध्ये(इनफ्लेशन) याचे प्रमाण(वेटेज) ४५.८६ टक्के मानण्यात येते. घाऊक किंमत निर्देशांक(डब्ल्यूपीआय) हा मुख्यतःउत्पादित वस्तु किंवा उत्पादनांवर आधारित असतो आणि त्याचे प्रमाण ६४.२ टक्के मानण्यात येते. घाऊक किंमत निर्देशांकात समाविष्ट खाद्यान्न टक्क्याने झालेल्या बदलामुळे घाऊक किंमत निर्देशांकाशी निगडित चलनवाढ किंवा महागाईत ०.११ टक्के बदल होतो.

देशांतर्गत परिस्थिती विचारात घेता एकंदर घाऊक किंमत निर्देशांकात(डब्ल्यूपीआय) एक टक्का बदल झाल्यास ग्राहक किंमत निर्देशांकात(सीपीआय) त्यामुळे होणारा बदल केवळ ०.२६ टक्के इतका असतो. याचा अर्थ जागतिक परिस्थितीचा परिणाम अल्प असतो परंतु देशांतर्गत घटकांचा महागाईवर होणारा परिणाम अधिक असतो. याचा अर्थ जीवनावश्यक वस्तुंचा अपुरा पुरवठा आणि त्यांची टंचाई, सरकारतर्फे आकारण्यात येणारे सक्तीचे कर व शुल्के यामुळेच जीवनावश्यक वस्तुंच्या किमती अनियंत्रित होण्यात



निर्देशांकाची मर्यादा(फूड इंडेक्स) २४.४ टक्क्यांवर सीमित केलेली असते. ही टक्केवारी किंवा प्रमाण लक्षात घेतल्यानंतर या निर्देशांकांचा परस्परांवरील परिणाम किंवा प्रभाव किती अत्यल्प असतो हे लक्षात यावे. अर्थात या घटकापेक्षाही इतरही अनेक घटक महागाईचे मापन करण्यासाठी आधारभूत मानले जातात असेही या अहवालाने म्हटले आहे. परंतु वरील मुद्याच्या पुष्टीसाठी त्यांनी जीवनावश्यक वस्तुंच्या जागतिक किमतींमध्ये(ग्लोबल कमॉडिटि प्राइसेस) एक टक्क्याने बदल झाल्यास एकंदर ग्राहक किंमत निर्देशांकावर(सीपीआय) त्याचा होणारा परिणाम केवळ ०.०२ टक्के इतकाच होतो असेही नमूद केले आहे. तसेच जीवनावश्यक वस्तुंच्या एकंदर जागतिक किमतींमध्ये एक व प्रचंड महागाईत त्या परिवर्तित होत असल्याचे स्पष्टपणे आढळून येते. वरील काहीशी किचकट सांख्यिकी लक्षात घेतल्यास देशांतर्गत महागाईचे स्वरुप चटकन लक्षात येऊ शकेल. हे विश्लेषण रिझर्व बँकेचे आहे हेही लक्षात ठेवावे लागेल. म्हणूनच राज्यकर्त्यांची महागाईबाबतची फसवेगिरी आणि जनतेची दिशाभूल करण्याचा त्यांचा राष्ट्रीय कार्यक्रम लक्षात येऊ शकेल.

या अहवालात आणखीही काही चिंतेचे मुद्दे आहेत. त्यानुसार घाऊक किंमत निर्देशांकाचा किरकोळ किंवा ग्राहक किंमत निर्देशांकावर होणारा परिणाम आपोआप होताना आढळत नाही. तर हा परिणाम परावर्तित होण्यामधील अंतर हे जास्त असल्याचे दिसून येते.

विशेषतः बिगर खाद्यान्न व बिगर इंधन वस्तुंच्या संदर्भात. म्हणजेच ज्यांना 'कोअर आयटेम' म्हणतात त्या क्षेत्रात ही तफावत अधिक असल्याचे त्यांचे मत आहे. या श्रेणीत प्रामुख्याने वस्तु व सेवा यांचा समावेश होतो. सामान्य भाषेत सांगायचे झाल्यास घाऊक आणि किरकोळ किंमत

जाणीवपूर्वक दुर्लक्षित करीत आहे किंवा तिचे गांभीर्य कमी लेखत आहे. मात्र गहू निर्यातीवर घालण्यात आलेली बंदी आणि त्या पाठोपाठ साखरेच्या निर्यातीवर घालण्यात आलेले निर्बंध या दोन निर्णयांनी परिस्थितीचे गांभीर्य प्रकट झाले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताला या निर्णयाचा फेरविचार करण्याचे सुचविले आहे परंतु भारतीय वाणिज्य मंत्रालयाने ती सूचना अमान्य केली आहे. या पाठोपाठ तांदळाच्या निर्यातबंदीची अपेक्षा केली जात आहे.








निर्देशांकांमधील मोठ्या फरकास उत्पादित म्हणजे कारखानदारीतून उत्पादन होणाऱ्या मालामधील महागाई कारणीभूत होते याचा संबंध या मालाच्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंच्या महागाईशी असतो. त्यातून किरकोळ किंवा ग्राहक म्हणजेच महागाई निर्देशांक प्रभावित होतो. हे एक प्रकारचे दुष्टचक्र आहे आणि सध्या अर्थव्यवस्था या चक्रात अडकली आहे. परंतु केंद्र सरकार ही बाब






प्रश्न एवढाच आहे की तडकाफडकी असा निर्णय करण्याचे कारण काय? कुठेतरी पाणी मुरते आहे आणि सरकारला येऊ घातलेल्या महागाईचे संकट आता भेडसावू लागले आहे काय अशी शंका आल्याखेरीज रहात नाही. न जाणो महागाईचा विस्फोट झाल्यानंतर भारतातही श्रीलंकेप्रमाणे तांदूळ किंवा गहू पाचशे रुपये किलो होऊ नयेत या धास्तीने तर ही खबरदारी घेतली जात नसेल ना अशा शंकेची पाल चुकचुकताना दिसते. थोडक्यात सांगायचे झाल्यास केंद्र सरकारने लोकांना विश्वासात न घेता परस्पर काही पावले उचलण्यास सुरुवात केलेली दिसते. इंधनावरील एक्साईज मध्ये केंद्र सरकारने कपात करण्याचा उदारपणा उगाच



दाखविलेला नाही. पाणी गळ्यापर्यंत आले म्हणून ही धडपड सुरु करण्यात आली आहे. तांदळाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात येणार नाही अशी एकतर्फी घोषणा सरकारने केली आहे. जेव्हा सरकारला अशी घोषणा करण्याची वेळ येते तेव्हाच बाजारात यासंदर्भात सुरु झालेल्या चर्चेची चाहूल सरकारला लागलेली असते आणि त्यातून बाजारात आणखी उलथापालथीला सुरुवात होऊ नये यासाठी खबरदारी म्हणून सरकारने ही घोषणा केली आहे. एकीकडे देशाची गरज भागविण्याइतका धान्यसाठा कोठारांमध्ये भरलेला आहे असे सांगतानाच या घोषणा करणे हा काहीसा विचित्र प्रकार वाटतो. याला सारवासारव असेही म्हणता येईल.

चलनवाढीचा दर चार टक्क्यांपर्यंत राखण्याचे उद्दिष्ट २०१५ पासून अमलात आणले गेले. स्थूलमानाने दोन ते सहा टक्क्यांच्या कक्षेत ते राखण्याच्या उद्दिष्टाला प्राधान्य देण्यात आले व त्याचा मध्यबिंदू म्हणून चार टक्क्यांचे उद्दिष्ट राखण्यात आले.मात्र गेल्या चार महिन्यात किरकोळ महागाई सहा टक्क्यांहून अधिक राहिलेली आहे. हा प्रकार आटोक्यात आणण्यासाठी रिझर्व बँकेने काही उपाययोजना जाहीर केल्या व प्रामुख्याने व्याजदरात वाढ करण्याचा प्राथमिक उपाय केला आहे. त्याला साह्यभूत उपाय म्हणून सरकारने इंधनावरील एक्साईज शुल्कात कपात केली तसेच गहू निर्यातबंदी जाहीर केली. करोना साथीचा जोर ओसरल्यानंतर रिझर्व बँकेने आणि सरकारने देखील बाजारपेठेला उठाव मिळावा यासाठी चलनविषयक धोरण शिथिल ठेवले होते. चलनवाढ झाली तरी अर्थव्यवस्थेत मागणी आणि खपाला चालना मिळावा यासाठी ही मुद्रा किंवा चलनविषयक शिथिलता अमलात आणण्यात आली. होती. परंतु ती वेळीच आटोक्यात आणणे सरकारला शक्य झाले नाही आणि चलनवाढ हाताबाहेर जाऊ लागली. आता महागाईने आपले रूप दाखवायला सुरुवात केल्यानंतर धावाधाव सुरु झालेली आहे. रिझर्व बँकेच्या या विश्लेषणाबाबत मतमतांतरे असू शकतात. परंतु त्यांनी जी काही अनुमाने काढलेली आहेत त्याबाबत दुमत होण्याचे कारण नसावे. केवळ जागतिक आर्थिक घडामोडींमुळेच भारतात महागाई वाढल्याचा सिध्दांत त्यांनी अमान्य केला आहे. त्याचे सांख्यिकी पुरावे सादर केले आहेत. काहींच्या मते जागतिक आर्थिक घडामोडींचा महागाईवर होणारा परिणाम जास्त प्रमाणात असू शकतो. परंतु त्यापेक्षा देशांतर्गत घटक म्हणजेच केंद्र सरकारची आर्थिक धोरणे कारणीभूत असल्याची बाब कुणी नाकारु शकणार नाही. हे वास्तव स्वीकारण्याची वेळ आता आली आहे. याचाच जाब सरकारला विचारावा लागेल. या उच्चांकी महागाईचे चटके जनतेला बसत असतानाच भाजपच्या केंद्रातील सरकारला आठ वर्षे पूर्ण झाली. २६ मे २०२२ रोजी या सरकारला आठ वर्षे पूर्ण झाली. याची दखल घेण्याचे कारण असे की राज्यकर्त्यांच्या दाव्यानुसार भारताची जी काही प्रगती झाली ती या आठ वर्षात. त्यापूर्वी भारतात विकास व प्रगती झालीच नाही आणि देश

पूर्णतया अंधारात होता. असा गगनभेदी दावा करणाऱ्या राज्यकर्त्यांमुळेच महागाईच्या चटक्यांची तीव्रता अधिक होते. आपल्या आधीच्या राज्यकर्त्यांची अत्यंत हलकी व सवंग अशी निंदा देशातच नव्हे परदेशातही करण्याचा उर्मटपणा व उद्दाम असभ्यपणा करणारे हे राज्यकर्ते आहेत आणि म्हणूनच त्यांच्या चुकांची दखल विशेष तीव्रतेने घेणे भाग पडते. गेल्या आठ वर्षातील यांच्या राज्यकारभाराचा ताळेबंद काय? अनिर्बंध खासगीकरण, सरकारी उद्योगांची बेलगाम विक्री, रेल्वेसारख्या सेवेचे देखील खासगीकरण, मूठभर बड्या उद्योगपतींना झुकते माप, सामान्य जनतेचे




दैनंदिन जीवन महागाईने असह्य करणे, नोटाबंदीसारखे लहरी व विकृत निर्णय करुन सामान्यांचा छळ करणे, लोकशाही संस्थांची मोडतोड आणि सर्वात गंभीर म्हणजे समाजात धार्मिक ध्रुवीकरण करुन भेदभावाचे विष पेरुन सतत संघर्ष चालू ठेवणे ही या आठ वर्षांच्या कारकिर्दीची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

आता या सरकारची तिकडमबाजी पण पाहिली पाहिजे. सरकारी आकडेवारीनुसारच गेल्या आठ वर्षात या सरकारने इंधनावरील एक्साईज ३४४ टक्क्यांनी वाढवून २७ लाख कोटि रुपयांची कमाई केली आहे. ही जनतेची निव्वळ लूट म्हणावी लागेल. एकीकडे पेट्रोल व डिझेलच्या किमती या क्रूड तेलाच्या आंतरराष्ट्रीय दराशी जोडल्याचा दावा करायचा पण जेव्हा क्रूड तेलाचे भाव कमी होते तेव्हा भारतातील इंधनाचे दर कमी का झाले नाहीत असा सवाल जनतेने करण्याची गरज आहे. परंतु हिंदुत्वाच्या नशेचे इंजेक्शन घेऊन बसलेल्यांना महागाईचे चटके कसे समजणार? ते त्या धार्मिक नशेत आहेत. पण ही नशा उतरल्यानंतर आपण देशोधडीला लागल्याचे त्यांच्या ध्यानात येईल तेव्हा फार उशीर झाला असेल. त्यामुळे काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलवरील एक्साईजमध्ये कपात करुन उदार कर्णाचा जो आव आणला तो तद्दन खोटराडेपणाच आहे. हे शहाणपण यापूर्वी का सुचले नाही असा स्वाभाविक प्रश्न आहे. त्याचे उत्तर सरकारकडे नाही. काही ठळक बिंदूंच्या आधारे या आठ वर्षांचे मूल्यमापन करता येईल. विकासदर खालावलेला आहे हे विविध वित्तीय संस्थांनी आकडेवारीसकट सांगितलेले आहे. कामगार भरतीचे प्रमाणही ऐतिहासिक नीचांकी टक्क्यांवर (४०.३८) आहे तर बेकारीचे प्रमाण ७.८३ टक्के नोंदविण्यात आले आहे. जीएसटीच्या उच्च किंवा चढ्या दरांमुळे महागाईच्या तीव्रतेत वाढ झालेली आहे. सामाजिक सेवांवरील खर्चात

सरासरी पाच टक्के घट गेल्या आठ वर्षात झालेली आहे. मनमोहनसिंग सरकारच्या दहा वर्षांच्या काळात हे प्रमाण सरासरी ९ टक्के होते. संस्थात्मक गुंतवणूकदारांनी गेल्या सात महिन्यात भारतातून २२ अब्ज डॉलर्स काढून घेतले आहेत. परकी चलन गंगाजळीत सातत्याने घट होत आहे आणि या सरकारच्या काळात आतापर्यंत ३६ अब्ज डॉलर्स बाहेर वाहून गेले आहेत. एका डॉलरचा रुपयातील दर ७७ रुपये ६९ पैसे इतका आहे(२९ मे २०२२). सध्याच्या पंतप्रधानांनी आणि त्यांच्या पक्षसहकाऱ्यांनी मनमोहनसिंग यांच्या काळात रुपयाच्या दरात किंचित गिरावट आलेली असताना, 'पंतप्रधानांच्या वयाप्रमाणे रुपया घसरत चालला आहे' अशी अत्यंत खालच्या दर्ज्याची टिप्पणी केली होती. आता यांच्या कारकिर्दीत रुपया केवळ घसरत नसून पार मातीत चाललेला असताना काय टिप्पणी करायची? यांच्या आठ वर्षांच्या कारकिर्दीत जागतिक भूक निर्देशांकात भारताची इतकी घसरण झाली की ११६ देशांमध्ये भारताचे स्थान १०१ क्रमांकापर्यंत खाली आले. दहा टक्के लोक अति किंवा महागरीबीच्या अवस्थेत असल्याचे अहवाल आहेत. शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रातील घसरणीचे अहवाल तर नीती आयोगानेच दिले आहेत. राज्यांची आर्थिक स्थिती हालाखीची झाली आहे. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, गुजरात, राजस्थान, पंजाब, मध्य प्रदेश, बिहार व केरळ या आठ राज्यांवरील कर्जाचा बोजा ८० लाख कोटि रुपयांवर असल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये उत्तर प्रदेश व गुजरात आघाडीवर आहेत. उत्तर प्रदेश पहिल्या क्रमांकावर, बंगाल दुसऱ्या तर गुजरात तिसऱ्या क्रमांकावर आहे. इतर राज्यांना केंद्र सरकारच्या लहरी धोरणांमुळे व वेळेवर आर्थिक साधनसंपत्तीचे वाटप करण्यात न आल्याने आर्थिक तंगी झाली आहे. आकडेवारी देता येईलही परंतु त्या जंजाळापेक्षा एकंदरीत विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांच्या कारकिर्दीतील





धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेची कशी वाट लागली आहे याचे हे दर्शन थोडक्यात घडविण्याचा प्रयत्न आहे. ही मालिका अशीच चालू राहिल्यास देशाला कोण वाचविणार आहे हे देखील ठाऊक नाही. परंतु हिंदुत्व, राममंदिर आणि आता नव्याने जे धार्मिक वाद उकरुन काढण्यात आले आहेत त्यामुळे बहुधा देशाची महागाईपासून सुटका होईल अशी आशा व्यक्त करावी लागेल. आता सामान्यजनांना दिलासा मिळेल काय हे सांगणे अवघड असले तरी राज्यकर्त्यांना मात्र 'अच्छे दिन' असतील हे मात्र हमखासपणे सांगता येईल!


■■

# भाजपचा मुकाबला आता प्रादेशिक पक्षांशी

- व्यंकटेश केसरी




२०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीचे चित्र कसे असेल याची रूपरेषा २०२२ मध्ये दिसू लागली आहे. चित्र अस्पष्ट असले तरी खिलाडू स्पष्ट आहेत. भाजपच्या एकछत्री अंमलाला प्रादेशिक पक्षांपासून धक्के बसायला सुरूवात झाली आहे. त्यामुळे ध्रुवीकरणाचे कितीही प्रयत्न झाले तरी निवडणुका एकतर्फी होण्याची शक्यता दिसत नाही. प्रादेशिक पक्षांवर घराणेशाहीचे, जातीयवादाचे, भ्रष्टाचाराचे कितीही आरोप झाले तरी त्यांचा जनतेतील आधार कमी होत नाही हे भाजपला कळून चुकले आहे. तर महागाई, बेरोजगारी या प्रश्नांवर भाजप बचावात्मक असून भारत–पाकिस्तान, लोकसंख्या नियंत्रण, दहशतवाद, काशी (अयोध्येनंतर ज्ञानव्यापी मशिद), हनुमान चालिसा आदि मुद्दे पेटते ठेवण्यावर तिचा भर आहे हे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ‘अच्छे दिन’, ‘सबका साथ’ या घोषणा मागे पडल्या असून ‘.... गोली मारो सालों को’, ‘बुल डोझर’ ही नवीन प्रतिके, घोषणा पुढे येत आहेत.



उत्तर प्रदेश, बिहार, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, आंध्र




**प्रादेशिक पक्ष चिवट आहेत. लोकांच्या नजिक आहेत, राजकीय 'स्पेस' त्यांनी तयार केली आहे. लवचिक आहेत, नेतृत्व लादलेले नाही याची जाणीव भाजपला आहे. तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, बिजू जनता दल, द्रमुक, समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता दल, आम आदमी पार्टी, वाय.एस.आर.काँग्रेस पार्टी, तेलंगाणा राष्ट्र समिती यांना भाजप संपवू शकत नाही. तर बिहारमध्ये स्वबळावर निवडणूक लढण्याचा आत्मविश्वास तिच्याकडे नाही.**

प्रदेश, तेलंगणा, ओरिसा, केरळ, पंजाब, झारखंड, दिल्ली आदी राज्यांत भाजपचा मुकाबला प्रादेशिक पक्षांशी होणार आहे. प्रादेशिक पक्ष विखुरलेले असले तरी खरा धोका कोणत्या पक्षापासून आहे हे न ओळखण्याइतपत भाजपचे राष्ट्रीय नेते दूधखुळे नाहीत. शिवसेना, तृणमूल काँग्रेस, समता पार्टी/जनता दल (युनायटेड), इंडियन नॅशनल लोकदल, शिरोमणी अकाली दल, असाम गण परिषद, झारखंड मुक्ती मोर्चा, बिजू जनता दल यांच्याशी निवडणुकीत युती करून म्हणा किंवा त्यांच्या शिड्या घेऊन म्हणा भाजपचे महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, हरियाणा, पंजाब, ओरिसा, आसाममध्ये आपला फैलाव केला. त्यामुळे भाजपची खरी ताकत युतीतून मिळालेली ताकत, जातीय समिकरणे, हिंदुत्व, विकास यांचा अंदाज प्रादेशिक पक्षांना आहे.



प्रादेशिक पक्ष चिवट आहेत. लोकांच्या नजिक आहेत, राजकीय 'स्पेस' त्यांनी तयार केली आहे. लवचिक आहेत, नेतृत्व लादलेले नाही याची जाणीव भाजपला आहे. तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, बिजू जनता दल, द्रमुक, समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता दल, आम आदमी पार्टी, वाय.एस.आर.काँग्रेस पार्टी, तेलंगणा राष्ट्र समिती यांना भाजप संपवू शकत

नाही. तर बिहारमध्ये स्वबळावर निवडणूक लढण्याचा आत्मविश्वास तिच्याकडे नाही.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची ताकद पाठिशी असताना, संसदेत पूर्ण बहुमत असतानाही भाजप 'प्रन इंडिया' बनू शकला नाही तर सत्तेत असतानाही या पक्षाला कर्नाटक, गुजरात, आसाम, झारखंड, त्रिपुरा, आदी राज्यात नेतृत्व बदल करावा लागला. अयोध्येत राम मंदिर उभारूनही उत्तर प्रदेशात रामराज्य आले नाही, विधानसभा निवडणुकीत जागा घटल्या.

महाराष्ट्र शत प्रतिशत भाजपमय करण्याची भाषा



करणारे संयुक्त महाराष्ट्राबाबत सावधपणे बोलतात. कारण वेगळ्या विदर्भ राज्याचा मुद्दा या पक्षाने सोडला नाही. त्यामुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची या पक्षाची भूमिका नेहमी संशयास्पद राहिली आहे.

दक्षिणेत 'हिंदीवादी', महाराष्ट्रात 'विदर्भवादी', पश्चिम बंगालमध्ये 'बाहेरचा', पंजाबात 'संधीसाधू' अशा बहुरूपी पक्षाला २०२४ च्या निवडणुका सोप्या नाहीत.



तीस टक्के जनतेला विविध योजनांचा लाभ देवून 'मतपेढी' बनविणारे ७० टक्के लोकांना याही वेळी मूर्ख बनवू शकतील काय? हे येणाऱ्या काळात कळेल. पण वाढत्या महागाईने त्यांचा भ्रमनिरास व्हायला सुरूवात झाली आहे. 'मोदी है तो मुमकिन है' म्हणणारे महागाईने हलक्या होणाऱ्या खिशाकडे पाहात आहेत.

१९७७ पासून निवडणुकांतील मतदानाचा पॅटर्न, राजकीय पक्षांच्या मतपेढ्यातील बदल ठळकपणे दिसू लागले. नसबंदीच्या अतिरेकाविरुद्ध उत्तरेतील अल्पसंख्यांकांनी काँग्रेसच्या विरोधात निर्णायक मतदान केले. १९८०, १९८४ च्या लोकसभा निवडणुकांत हा समजा पुन्हा काँग्रेसकडे आला तरी १९८९, १९९१ पासून तो काँग्रेस पासून दुरावत गेला आणि याचा फायदा जनता दल व नंतर तिच्यापासून फुटलेल्या मुलायमसिंग यादव यांच्या समाजवादी पार्टीला, लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाला, देवीलाल यांच्या लोकदलाला अनुक्रमे उत्तर प्रदेश, बिहार, हरियाणात झाला. अयोध्या व मंडल आंदोलनानंतर हा पॅटर्न अधिक धारदार झाला. बहुजन समाज

पक्ष, आंध्रात तेलुगू देसम पार्टी, तामिळनाडूत द्राविडियन पक्ष, पश्चिम बंगालमध्ये डावी आघाडी, पंजाबमध्ये शिरोमणी अकाली दल, ओरिसात बिजू जनता दल निर्माण झाले, स्थिरावले. आणि ही प्रक्रिया चालूच आहे. नॅशनल डेमॉक्राटिक अलायन्स व युनायटेड प्रोग्रेसिव्ह अलायन्सच्या आघाड्यातून भाजप व काँग्रेसने १६ वर्षे राज्य केले असले तरी त्या सत्तेचा आधार प्रादेशिक पक्षच होता.

'काँग्रेस मुक्त भारत' अशी घोषणा देवून भाजपचे नरेंद्र मोदी २०१४ साली केंद्रात सत्तेवर आले तरी त्यांना ना काँग्रेस ना प्रादेशिक पक्ष संपविता आले नाहीत. आता मैदानात नव्या दमाचे खेळाडू उतरत आहेत. महाराष्ट्रात तीन पक्षांची (शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस) आघाडी बनणार नाही, बनली तरी ती टिकणार नाही व टिकली तरी ती चालणार नाही हा भाजपचा होरा साफ चुकला. आणि आता या महाविकास आघाडीला कमजोर करण्यासाठी त्यांना राज ठाकरेंची मदत घ्यावी लागतेय यातून भाजपची कमजोरी बाहेर येतेय.



पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसमधील फुटीरांच्या सहाय्याने भाजप उभा आहे तर कर्नाटकात काँग्रेसमधील



फुटीरांच्या सहाय्याने हा पक्ष सत्तेत आला. आसाममध्ये काँग्रेसमधून फुटलेल्यांना मुख्यमंत्री करावे लागले. गुजरात, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश वगळता भाजपच्या अश्वमेधाचा घोडा पुढे जात नाही. कर्नाटक, राजस्थान, छत्तीसगढमध्ये काँग्रेस सावरली तर निवडणुका चांगल्या होतील. हे सारे चित्र पाहिले तर कोणत्याच पक्षासाठी मैदान साफ नाही हे दिसू लागते. तथाकथित राष्ट्रीय पक्षांच्या विस्ताराच्या, नेतृत्त्वाच्या मर्यादा एकीकडे स्पष्ट होत आहेत तर दुसरीकडे प्रादेशिक पक्ष 'बडी आघाडी करण्यापेक्षा आपापले प्रभाव क्षेत्र राखून ठेवण्याच्या कामाला लागले आहेत. यातूनच पर्यायाच्या शक्यता निर्माण होतात हा इतिहास आहे.

■■

**जळगाव येथे १५ एप्रिल रोजी सौ. प्रतिभा शिंदे यांच्या पुढाकारातून लोक संघर्ष मोर्चा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. खा. शरद पवार यांनी केलेले भाषण. या मेळाव्यात जळगाव, धुळे, नंदूरबार या जिल्ह्यातील आदिवासी महिलांना तयार केलेल्या वेगवेगळ्या वस्तू व खाद्यपदार्थांचे प्रदर्शन मांडले होते.**





आज प्रतिभाताई शिंदे यांनी प्रचंड मेळावा जो आयोजित केला, त्यांची जी 'लोक संघर्ष मोर्चा' ही संघटना आहे. या संघटनेच्यावतीने दिल्लीमधील शेतकऱ्यांच्या आंदोलनामध्ये बाराशेपेक्षा जास्त भगिनींनी सहभाग घेऊन उपस्थित राहिल्या होत्या. त्यांनी शेतकरी आंदोलनाला पाठिंबा दिला.



# लोक संघर्ष मोर्चाच्या पदरात न्यायाचे माप टाकू

## शरद पवार यांची ग्वाही

आणखी एका गोष्टीची आठवण होते, की या भागातील तुमच्या भगिनी, भाऊ आंदोलनाला आले. पण दुर्दैवाने तुमच्यातील एक भगिनी सीताबाई पडवी यांचे दुःखद निधन झाले. या निधनामुळे आलेल्या भगिनी अस्वस्थ होत्या. पण तरीही त्यांनी आपले मैदान सोडले नाही. या संघर्षात आपले जे सहकार्य आहे. त्यात कमतरता दाखवली नाही. म्हणून मला तुमच्या सर्वांचे अभिनंदन करायचे आहे. आपल्या प्रश्नांसाठी लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याची प्रतिभाताईंची जी भूमिका असते ती निव्वळ या ठिकाणी नाही तर देशपातळीवर मांडायला सुद्धा तुम्ही अग्रभागी होता. म्हणून तुमचे मनापासून अभिनंदन करतो.

आज अनेक प्रश्न आपल्या सगळ्यांचे आहेत. शेतीचे प्रश्न आहेत, जमीनीचे प्रश्न आहेत, त्यावरील सातबाऱ्याच्या नोंदीचे प्रश्न आहेत, उतारा तुमच्या नावाने देण्याचा निर्णय झाला असतानाही गावामध्ये या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. या सगळ्या गोष्टी मांडण्यासाठी तुम्ही सगळे एकत्र आले आहात. मला ठाऊक आहे, की एका प्रश्नासाठी प्रतिभाताई व तुम्ही नेहमी अत्यंत जागरूक असता त्याचे महत्त्वाचे कारण जल, जंगल, जमीन यावरील तुमचा अधिकार मान्य केला. अधिकार मान्य केल्यानंतर काही ठिकाणी जमिनी दिल्या, पण सातबाऱ्याच्या उताऱ्यावर तुमचे नाव ठिकठिकाणी नाही. काही ठिकाणी अपुरेपणा

आहे. हा अपुरेपणा पूर्ण झाला पाहिजे. त्याशिवाय महिला शेतकरी सन्मान योजनेच्या दृष्टीने ही परिषद जी याठिकाणी घेतली, या परिषदेत जवळपास सहा ठराव याठिकाणी मंजूर केले. त्यामध्ये महाविकास आघाडी सरकारच्या धोरणाचे तुम्ही समर्थन केले. पण हे असतानाही काही गोष्टींची पूर्तता महाविकास आघाडी सरकारने करावी, ही या ठिकाणी आपण मागणी केली आहे. मला आनंद आहे, की तुमच्या या परिषदेला महाविकास आघाडीमधील एक नाही तर चार मंत्री आज हजर आहेत. या सगळ्यांच्या मदतीने आणि माझी खात्री आहे की, राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कानावर आम्ही सगळेजण हा प्रश्न मांडून तुमच्या पदरात न्यायाचे माप कसे पडेल याची काळजी घेऊ अशी खात्री देतो.

आजच्या परिषदेत आपण काही गोष्टी सांगितल्या. राज्य सरकारच्या बजेटमध्ये काही गोष्टींची तरतूद केली, तर काही गोष्टींचा अपुरेपणा आहे. तो कसा घालवायचा त्याचा प्रयत्न आम्ही करू. पण मी एवढेच सांगतो की, याठिकाणी मांडलेले ठराव आणि भाषणात आलेले मुद्दे या संदर्भात कमीत कमी राज्य सरकारचे धोरण तुमच्या मदतीचे यावे, यासाठी शक्य झाल्यास येत्या तीन किंवा चार तारखेला मुंबईमध्ये संबंधित मंत्री, प्रतिभाताई आणि त्यांचे सहकारी यांची संयुक्त बैठक आम्ही घेऊ व तुमच्या प्रश्नांची सोडवणूक कशी होईल, याची काळजी घेऊ.या बैठकीला आदिवासी विकास मंत्री, शेती मंत्री, पालकमंत्री गुलाबराव पाटील, अर्थमंत्री, राज्यमंत्री तनपुरे, राज्यमंत्री भरणे या सर्वांना निमंत्रण देऊ. सरकारने तुमच्यासाठी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी कशा पद्धतीने होते, ते प्रत्येक गावात जाऊन त्याची पाहणी मी स्वत: प्रतिभाताईंसोबत करेन. हे सर्व महत्त्वाचे प्रश्न आदिवासींचे आहेत, भगिनींचे आहेत, कष्टकऱ्यांचे आहेत आणि यांच्यासाठी सरकार चालवणे हे सूत्र उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आहे. त्यामुळे राज्य सरकारची संपूर्ण शक्ती तुमच्यासोबत उभी करून त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे काम आम्ही करू हा विश्वास आपल्याला देतो. प्रतिभाताईंचे अभिनंदन करतो. एवढ्या उन्हातान्हात हजारोंच्या संख्येने तुम्ही आलात. मी अनेक महिलांचे मेळावे पाहिले, अनेक पुरुषांचे, कामगारांचे मेळावे पाहिले, पण आपल्या रास्त प्रश्नांसाठी भगिनी एवढ्या मोठ्या संख्येने येतात, शांततेने बसतात आणि या धोरणाच्या मागे राहतात. लोक संघर्ष मोर्चाला शक्ती देतात असे चित्र कुठे बघायला मिळत नाही. ते तुम्ही दाखवले त्याबद्दल तुम्हाला लाख लाख धन्यवाद देतो.

■■

आदिवासी भगिनींनी प्रदर्शना मांडलेल्या वस्तूंची शरद पवार पाहणी करताना, शेजारी कृषीमंत्री दादा भुसे, प्रतिभा शिंदे, मनिष जैन व रविंद्र पाटील.





# समृद्ध महिला परिषद कश्यासाठी!

## -प्रतिभाताई शिंदे यांचे प्रतिपादन

दि. १५ एप्रिल रोजी होणारी ही समृद्ध महिला परिषद अनेक अर्थाने ऐतिहासिक आहे . पहिल्यांदाच शेतकरी कष्टकरी अल्पसंख्यांक, बहुजन ग्रामीण, व आदिवासी अश्या समाजातील आदिम परंतु मुख्य प्रवाहाच्या काठावर किंवा परिघाबाहेर असणाऱ्या वर्गातील महिला व शासन यांच्या एकत्रित व बरोबरीच्याभागीदारीतून ही परिषद होते आहे. म्हणूनच या सामान्य समाज स्तररचनेतील महिलांनी आयोजित केलेल्या त्यांच्या संकल्प परिषदेला शासनातील महत्वाच्या खात्यांचे धोरणकर्ते येथे उपस्थित आहेत आणि आज या परिषदेत या महिलांच्या समृद्धीचा मार्ग नेमका कोणता व कसा असू शकतो याचा संकल्प आराखडा पुढे आणला जाईल याची खात्री आहे.

आजच्या या परिषदेत मुख्य करून शेतकरी महिलांचा मोठा सहभाग आहे. शेतीचा शोध जिने लावला ती एक स्त्री होती. सर्वात जास्त श्रम करते ती कुटुंबातील महिलाच परंतु तरीही शेतकरी म्हटला की तो पुरुषच असे गृहीत धरले जाते आणि स्त्री ला तिची शेतकरी महिला म्हणून स्वतंत्र अशी ओळख दिली जात नाही ही आजची व्यवस्था असली तरी या परिषदेला आलेली महिला ही शेतकरी महिला म्हणून आज येथे सहभागी झालेली आहे आणि तिने कुटुंबात शेती बाबतीत पुढाकार घेत ही शेती समृद्ध कशी करता येईल या बाबत संकल्प केला आहे आणि गावागावातून आपले शेतकरी गट तयार करून या महिलांनी त्याची सुरवात ही केलेली आहे

ग्रामीण भागात आज शेतीपुढील समस्या गंभीर होत आहेत. शेती हा न परवडणारा आतबट्याचा व्यवहार असल्याचा मतप्रवाह सार्वत्रिक झालेला आहे खरं तर शेती हा ग्रामीण भारताचा फक्त आत्माच नाही तर ती भारताची जीवन संस्कृती आहे परंतु.शेती परवडत नाही म्हणून एकीकडे आत्महत्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे कारण शेती उत्पादनाचा खर्च आणि प्रत्यक्षात पिक बाजारात विकल्यावर मिळणारे उत्पन्न याचा ताळमेळच लागत नाही. त्यात हवामान बदलामुळे अवकाळी येणारा पाऊस किंवा दुष्काळ याचे गणित ही दिवसेंदिवस बदलत चालले आहे. त्यामुळे शेतात उभे पिक केंव्हा हातातून जाईल याची शाश्वती राहिलेली नाही. अश्या अवघड काळात शेती हीच ज्यांचे उत्पन्नाचे साधन आहे, अश्या शेतकऱ्यांपुढे विशेषतः कोरडवाहू शेती असणाऱ्या बहुसंख्य बळीराजापुढे आज जीवनामरणाचा प्रश्न गंभीर आहे.

आज स्थानिक पातळीवर रोजगार मिळत नाही म्हणून रोजगारासाठी हंगामी स्थलांतर करणाऱ्या शेतमजुरांचे प्रमाण मोठे आहे. या शेतमजुरांचा मोठा वर्ग हा प्रत्यक्षात कोरडवाहू

अल्पभूधारक शेतकरीच आहे त्याच्या शेतात पावसाळ्यात चार महिने राबून तरीही वर्षभर उदरनिर्वाहाचे भागत नाही म्हणून उरलेले आठ महिने गाव/घर सोडून जाणारा हा ९० % हंगामी मजूर प्रत्यक्षात अल्पभूधारक शेतकरी आहे ही बाब अजूनही गांभीर्याने घेतली जात नाही आणि म्हणून या हंगामी मजुरांचे स्थलांतर थांबविण्याचा उपाय त्याच्या कोरडवाहू शेतीत व शेती साठी आवश्यक गांवातील नैसर्गिक संसाधनांच्या सामुहिक संवर्धनाच्या उपाय योजनांसाठी त्याला वर्षभर पुरेल इतका रोजगार उपलब्ध करून देणे हाच असू शकतो.

या परिषदेतील उपस्थित बहुसंख्य महिला शेतकरी आपल्या कोरडवाहू शेतीत माती व पाणी यांचे संवर्धन करत कशी समृद्धी आणता येईल गावातील नैसर्गिक संसाधने कशी शाश्वत व शेतीपूरक बनविता येतील या साठी आपल्या शेतीत प्रयोग करणाऱ्या महिला आहेत आणि या महिलांना जर शासकीय योजना व या शेती विकासासाठी आवश्यक बिजभांडवल, पतपुरवठा, पायाभूत सुविधा व बाजारातील शाश्वती यांची मदत एकहाती मिळाली तर ग्रामीण महाराष्ट्रातील विकासाचे खरे चित्र पुन्हा उभे राहील यात शंका नाही.

आतापर्यंत यासाठी शासनाने ही विविध शेती विकासाची धोरणे व योजना तयार केल्या आहेत.

- कृषीविभागाच्या आत्मासारख्या विविध योजना.
- रोजगार हमी अंतर्गत शरद पवार गांव समृद्धी योजना व लखपती शेतकरी किंवा समृद्धी बजेट योजना
- नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प किंवा पोकरा प्रकल्प
- शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठीचा सात कलमी कार्यक्रम
- शेतकरी सन्मान योजना

अश्या विविध योजना आज राबविल्या जात असूनही त्याचे यश किंवा महत्व प्रत्यक्ष लाभार्थी शेतकऱ्यापर्यंत पोहोचत नाही कारण त्यांना एकत्रित व एक हाती मदत मिळत नाही. विहीर मिळाली तर पाणीपुरवठ्याची सुविधा नसते शेतीपूरक व शेती आधारित प्रक्रियेची साखळी उभी रहात नाही वैयक्तिक लाभार्थींची योजना लॉटरी ठरली आहे. हजारों मधून नंबर लागला तर लागला त्यात पारदर्शकतेच्या नावाखाली लादली गेलेली , करावी लागणारी ऑनलाइन नोंदणी ही तर ग्रामीण दुर्गम भागातील शेतकऱ्यांना भिक नको पण कुत्र आवर अशी त्रासदायक ठरली आहे. मिळाली तरी गांव समूहाला पुरेस त्यांच प्रमाण असत नाही म्हणूनच ही गॅप भरून काढण्याची गरज आहे. शासन व लाभार्थी यांच्यात सुलभ सहज नाते निर्माण झाले पाहिजे, हा प्रयत्न करत या शेतकरी कुटुंबातील या शेतकरी महिलांनी आता पुढाकार घेतला आहे आणि शासनाने ही त्यासाठी सकारात्मक पाऊल उचलत आजच्या या परिषदेत सहभाग घेतला आहे. या शेतकरी महिलांप्रमाणेच आजच्या परिषदेला शहरी भागातील कष्टकरी महिला, अल्पसंख्यांक समाजातील बेरोजगार महिला यांची ही उपस्थिती आहे. या महिला स्वतः च्या पायावर उभे रहाण्यासाठी स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवता यावा म्हणून संघर्ष करत मिळेल ते काबाड कष्ट, अंगमेहनतीचे काम करत उद्याच्या समृद्ध जीवनाचे स्वप्न बघते आहे. या समृद्धीच्या स्वप्नाला अधिक बळ देण्यासाठी शासनाने ठोस मदत ही केली पाहिजे आणि ग्रामीण भागात जशी रोजगाराची हमी देणारी योजना आहे तशी शहरी भागात ही मागेल त्याला काम देणारी शहरी रोजगार हमी योजना व्यापकतेने व अधिक प्रभावीपणे राबवली जावी त्यांच्या साठीही MIDC च्या धर्तीवर सामुहिक स्वयंरोजगार उद्योग संकुले निर्माण झाली पाहिजेत ही त्यांची मुख्य मागणी आहे

या परिषदेत मोठ्या संख्येने आदिवासी महिला शेतकरीही सहभागी झाल्या आहेत. त्यांचा संघर्ष तर खूप मोठा आहे जल जंगल जमीन यावरचे अधिकार मिळवण्यासाठी प्रदीर्घ लढा देवून आता कुठे त्यांच्या शेतजमिनी त्यांच्या नावावर झाल्या आहेत. मात्र अजूनही या वनकायद्याची अंमलबजावणी अपूर्ण आहे. अजूनही ताब्यात असलेल्या व पिढ्यादर पिढ्या कसत असलेल्या शेतजमिनी नावावर झालेल्या नाहीत. त्या बाबतीत कायद्याचे पालन झाले पाहिजे. कायद्यात दिलेले कुठलेही दोन पुरावे असले तर जमीन नावावर झालीच पाहिजे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे या वनकायद्यात कबूल केल्याप्रमाणे त्यांना शेतीविकासाच्या योजना तातडीने व प्राधान्याने दिल्या पाहिजेत

यात कोरोना मुळे पती वारल्याने निराधार झालेल्या एकल महिला ही या परिषदेत सहभागी झाल्या आहेत महाविकास आघाडी सरकारने त्यांच्यासाठी जी मदत जाहीर केली त्यासाठी शासनाचे आभार व अभिनंदन. मात्र त्यांच्या पुनर्वसनाचे व मदतीचे धोरण आखत त्यासाठी अधिक प्रभावी पणे अंमलबजावणी होणे ही गरजेचे आहे आणि ती होईल याची आम्हाला सर्व महिलांना खात्री आहे

आज येथे जमलेल्या महिला शेतकरी या स्वतःची शेतकरी म्हणून असलेली ओळख अधिक व्यापक व्हावी या साठी आम्ही सर्व शेतकरी महिला आहोत याची आभिमानाने घोषणा करीत आहोत. त्याचप्रमाणे शासनानेही हे वर्ष महिला शेतकरी सन्मान वर्ष म्हणून जाहीर करून आमचा हा सन्मान केला आहे म्हणून या शासनाचे अभिनंदन ही करीत आहोत.

■■



Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्त्व असतं.
CBSE व ICSE शाळा
MAGARPATTA CITY
Call: 020-67275800 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com



ग्यानवापी मशिद




मथुरेतील श्रीकृष्णाचे जन्मस्थळ

इतिहास उकरुन वर्तमान स्थिती आणि देशाचे भविष्य खोलवर गाडण्याचा राष्ट्रीय उद्योग सुरु करण्यात आला आहे. त्यासाठी निरनिराळे जुनेपुराणे वाद उकरण्यात येत आहेत. ताजमहाल हे शिवमंदिर आहे, ग्यानवापी मशीदीत पुजेसाठी परवानगी मिळावी कारण तेथेही पूर्वी मंदिरच होते, मथुरेतील श्रीकृष्ण जन्मस्थळ ही या उकरलेल्या वादांची ताजी उदाहरणे आहेत. त्यावरुन देशभर सांप्रदायिक तणाव निर्माण करण्यात येत आहे. अल्पसंख्यक समाज



दिल्लीील कुतुब मिनार



आग्रा येथील ताजमहाल

**धर्म आणि इतिहासातील गोष्टी खणून काढण्याचे उद्योग सत्ताधाऱ्यांच्याच निकटवर्तुळातून सुरु आहेत. मथुरा न्यायालय असो किंवा ग्यानवापीचे प्रकरण असो या प्रकरणांमध्ये रंजना अग्निहोत्रि नावाच्या महिला वकील सक्रिय आहेत आणि त्या काही विशिष्ट संघटनांशी संबंधित आहेत. एवढे लक्षात घेतले तरी यामागील डाव व षड्यंत्र समजण्यास मदत होईल. ही परिस्थिती कशी आहे ? इतिहास उकरण्याच्या अतिरेकाचा हा परिणाम आहे. याचे भान मात्र कट्टरपंथीयांना येताना दिसत नाही.**

# इतिहास उकरुन वर्तमान व भविष्य गाडण्याचा उद्योग!

कबीर दास

आणि या वादांपुरते बोलायचे झाल्यास मुस्लिमांना यासाठी पध्दतशीरपणे 'लक्ष्य' म्हणजेच 'टार्गेट' करण्यात येत आहे. या सर्व पुराणमतवादी कट्टरपंथीयांना कुणाचे 'पाठबळ' आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. बहुसंख्यकवाद ही ज्यांची धोरणात्मक विचारसरणी आहे आणि त्या आधारे समाजात धार्मिक ध्रुवीकरण करणे आणि बहुसंख्यक समाजाची जास्तीजास्त मते आपल्याच झोळीत कशी पडतील या हिशोबाने राजकारण आणि राज्यकारभार करणाऱ्या मंडळींनी

हे ‘राजकीय रसायन’ तयार केले आहे. हे जे उकरलेले वाद आहेत ते २०२४च्या लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी आहेत. कारण असले वाद तत्काळ निकाली निघणे अशक्य असते. ज्याप्रमाणे अयोध्या विवाद हा साधारणपणे १९८७ पासून सुरु करण्यात आला आणि त्याची परिणिती १९९२ मध्ये बाबरी मशिदीची वास्तू उद्ध्वस्त होण्यात झाली व त्यानंतरच्या टप्प्यात हा विवाद न्यायालय प्रविष्ट झाला आणि अखेर मंदिर निर्मितीच्या बाजुने कोर्टाचा निकाल (९ नोव्हेंबर २०१९) झाल्यानंतर बहुसंख्यक वादाला नवे बळ मिळाले. करणाऱ्यांचे हे उद्योग आहेत. यासाठी प्रसंगी घटनेच्या चिंधड्या करायलाही ते मागेपुढे पाहीनासे झाले आहेत.

या नवनिर्मित वादांचा आढावा घेण्यापूर्वी पूजा व प्रार्थनास्थळ विषयक कायद्याची माहिती घेणे आवश्यक आहे. त्यानंतरच हे नवे वाद उकरुन काढणाऱ्यांचे षड्यंत्र लक्षात घेणे सोपे जाईल. ‘प्लेसेस ऑफ वरशिप ॲक्ट’(पूजा किंवा प्रार्थनास्थळांविषयीचा कायदा) हा सप्टेंबर-१९९१चा कायदा आहे. अयोध्या विवादाच्या पार्श्वभूमीवर हा कायदा तत्कालीन नरसिंह राव सरकारने



परंतु मंदिर निर्मितीने या जुन्यापुराण्या मुद्यांना मूठमाती मिळू नये आणि समाजात बहुसंख्यक विरुध्द अल्पसंख्यक असा वाद सतत पेटता रहावा आणि त्याआधारे बहुसंख्यक मते सतत आपल्यालाच मिळावी या हेतुने हे प्रकार सुरु करण्यात आले आहेत. अयोध्येचा वाद मंदिरनिर्मितीमुळे संपला तर निवडणुकीत मते कशाच्या जोरावर मागायची ? म्हणून आता हे काशी, मथुरेचे वाद उकरुन काढण्यात येत आहेत. म्हणजेच ज्यांना केवळ भावना-भडकाऊ मुद्दे उपस्थित करुन निवडणुकीत मते मिळवायची आहेत त्यांनी हे उपद्रवी उद्योग चालू केले आहेत.

समाज सतत खदखदता ठेवणे आणि त्या आधारे निवडणुकीत मते मिळविण्याचे घाणेरडे राजकारण

संमत केला होता. या कायद्याच्या किचकट तपशीलात न जाता सामान्य भाषेत त्याचा अर्थ समजावून घेणे अधिक योग्य राहील. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. तो दिवस या कायद्यासाठी आधारभूत धरण्यात आला. या दिवशी भारतातील जी पूजा किंवा प्रार्थना अथवा धर्मस्थळे आहेत यांचे जे स्वरुप आहे ते कायम ठेवण्याची व त्यासंदर्भात कोणतेही विवाद उत्पन्न करण्यास बंदी घालणारा हा कायदा आहे. तसेच कुणी असे विवाद उत्पन्न करण्याचा प्रयत्न केल्यास न्यायालयांनी त्याची दखल घेऊ नये अशी तरतूदही या कायद्यात करण्यात आली होती. तसेच जर कुणी एखाद्या प्रार्थनास्थळाचे स्वरुप बदलण्याचा प्रयत्न केल्यास या कायद्याच्या सहाव्या कलमानुसार तो अपराध ठरविण्यात

आला आहे. कोर्टांना देखील असे स्वरुप बदलण्याचा अधिकार नसल्याचे या कायद्यात नमूद करण्यात आले होते. हा कायदा अयोध्येतील विवादास लागू होणार नसल्याचे त्यात नमूद करण्यात आले कारण ते प्रकरण त्यावेळी न्यायप्रविष्ट होते. इतिहासात अनेक राज्यकर्त्यांनी चुका केल्या आहेत आणि अनेक राज्यकर्त्यांनी अन्याय व अत्याचार केल्याची माहितीही सर्वांनाच आहे. परंतु त्याआधारे वर्तमानात समाजात तणाव, भावना भडकाविण्याचे प्रकार करणे ही अपराधी प्रवृत्ती आहे आणि त्यास आळा घालण्याच्या




हेतुनेच व व्यापक समाज आणि राष्ट्रहित लक्षात घेऊन हा कायदा करण्यात येत असल्याचे त्यावेळी सांगण्यात आले होते. यावेळच्या घडामोडी कुणाच्या आठवणीत असतील किंवा नसतील. परंतु यावेळी हिंदुत्वाच्या आधारे राजकारण करणाऱ्यांनी अयोध्या, मथुरा व काशीमधील प्रार्थनास्थळांबाबत वाद निर्माण केला होता. यासर्व प्रकारांमध्ये संघ-परिवार आणि भारतीय जनता पक्षाचा पूर्णपणे सहभाग होता. सुरुवातीला केवळ अयोध्येतील राममंदिर निर्मितीनंतर अन्य विवाद सुरु करण्याचे तोंडदेखले आश्वासन या मंडळींना दिले होते. परंतु २०१४ नंतर समाजात पध्दतशीर दुही माजविण्यासाठी हे विवाद सुरु करण्यात आले आहेत. २०१४ व २०१९च्या निवडणुका देशभक्ति व राष्ट्रवादाचे मुद्दे उपस्थित करुन आणि बालाकोट सारख्या प्रकरणांच्या आधारे जिंकल्यानंतर धार्मिक ध्रुवीकरणासाठी नवे भावना भडकाविणारे मुद्दे शोधण्यात आले व त्यातूनच या मुद्यांवर योजनाबध्द रीतीने वातावरण तापविण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे सध्या हे जे वाद निर्माण करण्यात येत आहेत ते 'बेकायदेशीर' म्हणजेच १९९१च्या प्रार्थनास्थळ विषयक कायद्याचा भंग करणारे आहेत. या कायद्याला आव्हान देता येणार नाही अशीही तरतूद त्यामध्ये आहे. तरीही कट्टरपंथीयांनी या कायद्याला कोर्टात आव्हान दिलेलेच आहे. सर्वोच्च न्यायालयाने अयोध्येतील राम मंदिर उभारणीस परवानगी देणाऱ्या आपल्या निर्णयात(२०१९) या कायद्याचे पूर्ण समर्थन केलेले होते. संसदेला, संसदसदस्यांना हा कायदा करताना इतिहासाचे किंवा इतिहासात घडलेल्या चुकांचे ज्ञान नव्हते असे म्हणता येणार नाही. परंतु या ऐतिहासिक चुका किंवा कुणीतरी केलेले अनुचित प्रकार यांचा आधार घेऊन वर्तमान व भविष्य पायदळी तुडविण्याचे प्रकार खपवून घेता येणार नाहीत असे सर्वोच्च न्यायालयाने एकमुखाने म्हटले होते.

काशी किंवा बनारसमधील ग्यानवापी मशिदीच्या विवादाचा प्रथम आढावा घेऊ. ग्यानवापी मशीद ही काशी विश्वनाथ मंदिराच्या जवळच आहे. यासंदर्भात अनेक प्रवाद







व उलटसुलट माहिती मिळते. याबाबत केल्या जाणाऱ्या दाव्यानुसार ग्यानवापी मशीद ही त्याठिकाणी आधी बांधलेले विश्वनाथ मंदिर उद्ध्वस्त करुन त्याच्या अवशेषांवर बांधण्यात आली आहे. हिंदू मान्यतेनुसार सध्या अस्तित्वात असलेले काशी विश्वनाथ मंदिर हे मूळ ग्यानवापीच्या जागेवर होते. परंतु कुतुबुद्दिन ऐबक आणि औरंगजेब यांनी ते उद्ध्वस्त केले. कुतुबुद्दिन ऐबक ते औरंगजेब यांच्या दरम्यान या मंदिराच्या जीर्णोध्दाराचे व पुनरुज्जीवनाचे प्रयत्न झाले. अकबराच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक राजा तोडरमल याच्या मुलाने गोवर्धन दास याने वडिलाच्या सांगण्यावरुन या मंदिराचे पुनरुजजीवन केल्याचे काही इतिहासकारांनी लिहिलेले आहे.


नारायण भट्ट या विद्वान गुरुच्या आज्ञेवरुन हे मंदिर पुन्हा बांधण्यात आल्याचे हे इतिहासकार सांगतात. परंतु औरंगजेबाच्या काळात ते पुन्हा उद्ध्वस्त करण्यात येऊन तेथे मशीद उभारण्यात आली. तेव्हापासून तेथे नमाज अदा केली जाते. संघ परिवार ज्यांच्या नावाने बोटे मोडत असतात त्या डाव्या विचारसरणीच्या आणि धर्मनिरपेक्ष इतिहासकारांनी देखील औरंगजेबाच्या धर्मवेड्या कृत्यांवर प्रकाश टाकलेला आहे आणि ग्यानवापीबद्दल देखील त्यांनी तटस्थपणे लिहिताना तेथे विध्वंसक कृत्ये झाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे हा इतिहास कुणाला माहिती नाही किंवा कुणी तो नाकारण्याचा प्रश्नही उपस्थित होत नाही. परंतु मुद्दा हा आहे की हे भावना भडकाविणारे आणि समाजात तेढ-तणाव निर्माण करणारे हे विषय उकरण्याचे कारण काय ? कारण दुसरे तिसरे कोणतेही नसून २०२४च्या निवडणुकीसाठी वातावरण तापविणे हे आहे.

एप्रिल महिन्यात अचानक चार महिलांनी ग्यानवापी मशिदीत जाऊन शृंगारगौरी पूजन करण्याची मागणी केली होती. हे हिंदू मंदिर असल्याचा दावा त्यांनी केला. विश्व वैदिक सनातन संघ या संघटनेतर्फे हा अर्ज दाखल करण्यात

आला. वाराणसी न्यायालयात हे प्रकरण दाखल झाले आहे. त्यानंतर ग्यानवापी मशीदीचे व्यवस्थापन असलेल्या अंजुमन इंतजामियां मस्जिद संस्थेनेही कोर्टाकडे धाव घेऊन या अर्जाची दखल घेऊ नये अशी याचिका दाखल केली. कोर्टाने १९९१च्या कायद्याची दखल न घेता ग्यानवापी मशीद परिसरात चित्रीकरणाचे आदेश दिले. त्यामध्ये एका लहानशा कुंडात शिवलिंग सापडल्याचा दावा करण्यात येत आहे. तसेच भिंतींवर त्रिशूळ चिन्हे असल्याचेही सांगण्यात येऊ लागले आहे. आधी कोर्टाने या सर्व माहितीचा अहवाल गुप्त राखण्याचा आदेश दिला होता. बंद पाकिटात तो अहवाल कोर्टाला सादर करण्याचा आदेशही देण्यात आला होता. परंतु तो फुटल्याचे निष्पन्न झाले आणि चित्रीकरणाचे सर्व तपशील माध्यमांनी सार्वत्रिक करुन टाकले. आता कोर्टाने या फुटकेगिरीबद्दल चौकशीचे आदेश दिले आहेत. आता कोर्टाने ४ जुलै ही पुढची तारीख सुनावणीसाठी दिली आहे. या प्रकरणात असंख्य तपशील देता येतील परंतु जागेअभावी ते शक्य नाही. परंतु अचानक कोणीतरी दीर्घनिद्रेतून जागे व्हावे आणि त्यांना काहीतरी उपरती व्हावी व त्यांना ग्यानव्यापी मशीदीत जाऊन पूजाअर्चा करण्याची इच्छा व्हावी यामागील कारणे शोधण्याची बाब अधिक महत्वाची आहेत. हे अचानक घडलेले असले तरी त्यामागे एक सुनियोजित डाव आहे. यामध्ये अयोध्याकांडातील सर्व घटक सक्रिय आहेत.

अयोध्येतील राममंदिर उभारणीचा कोर्टाचा निर्णय येऊन तेथे बांधकाम सुरुही झाले आहे. परंतु त्या पाठोपाठ जणू वेळापत्रक तयार असावे त्याप्रमाणे ग्यानवापी मशीदीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. थोडा स्मृतीला ताण दिला तर विश्व हिंदू परिषद आणि संघ परिवाराने राममंदिर उभारणीसाठी मोहिम सुरु केल्यानंतर ते देत असलेली घोषणा आठवावी.

'ये तो(अयोध्या) सिर्फ झांकि है, कांशी मथुरा बाकी है' अशी ती घोषणा होती. बाबरी मशीद पाडल्यानंतर भाजपने काशी व मथुरेतील प्रार्थनास्थळांशी संबंधित मोहिम निघाली तर ते त्यात सहभागी नसतील असे जाहीररीत्या मान्य केले होते. लालकृष्ण अडवानी अयोध्या मोहिमेचा राजकीय चेहरा होते. त्यांनी एनडीटीव्ही या प्रतिष्ठित वृत्तवाहिनीचे प्रमुख प्रणय रॉय यांना दिलेल्या मुलाखतीत काशी-मथुरेच्या वादात भाजपचा सहभाग नसेल असे स्पष्ट केले होते. अर्थात अडवानी आता राजकीयदृष्ट्या अस्तंगत झालेले आहेत. आता भाजपची सूत्रे नरेंद्र मोदी व अमित शहा या जोडीकडे आहे. ते या भूमिकेत बदल करु शकतात. किंवा पडद्याआड राहून या मोहिमांना मदत, साधनसामग्री व सर्व प्रकारचे साह्य व पाठबळ देण्याचा गनिमी कावा अमलात आणू शकतात. ज्या पध्दतीच्या घडामोडी सध्या घडत आहेत त्या लक्षात घेता या मुद्याला पुष्टीच मिळते. संघ परिवारातील विश्व हिंदू परिषद यामध्ये सक्रिय आहे. परंतु या मंडळींच्या असंख्य




संघटना आहेत.

ज्याप्रमाणे विश्व वैदिक सनातन संघ ही संस्था यामध्ये प्रमुख अर्जदार आहे त्याचप्रमाणे ही मंडळी बहुरुपी असल्याने कोणत्या नव्या अवतारात व रुपात अवतीर्ण होतील



आहे आणि ते स्थान या मैदानाखाली असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ग्यानवापी प्रमाणेच यासंदर्भातही प्रवाद आहेत आणि पुष्टिसाठी काही दाखलेही आहेत. याठिकाणी मशीदही आहे. ही मशीद



हे सांगणे अवघड आहे. अशा या सराईत आणि हातोहात रंगबदलू मंडळींचा अंदाजही येणे कठीण होऊन बसते. प्रत्येक वादग्रस्त मोहिमेसाठी नवनवी नावे व रुपे घेऊन ही मंडळी आपल्या फाटाफुटीच्या आणि समाजात तेढ व तणाव निर्माण करण्याच्या कारवाया करीत राहतात.

ग्यानवापी हा एक नव्याने उकरलेला वाद आहेच पण या मंडळींनी मथुरेतील शाही ईदगाह, कुतुबमिनार, ताजमहाल याबद्दलही वाद पेटविण्यास सुरुवात केली आहे. यातच भर म्हणून रामभक्त हनुमानाच्या जन्मस्थळावरुनही या मंडळींनी वादास सुरुवात केली आहे. मथुरेतील शाही ईदगाह मैदानाखाली श्रीकृष्ण जन्मस्थान असल्याची श्रध्दाळूंची समजूत आहे.

कृष्णजन्म हा तळघरातील तुरुंगात झाल्याची कथा सध्या असलेल्या कृष्णजन्मस्थाच्या मंदिराला लागून आहे. ही मशीद मूळ तेथे असलेले केशवदेव मंदिर पाडून बांधण्यात आलेली असल्याने तेथून ती हलविण्यात यावी अशी याचिका उत्तर प्रदेशातील मथुरेच्या जिल्हा न्यायालयात दाखल करुन घेण्यात आली आहे. या संदर्भात अन्य नऊ याचिका न्यायालयासमोर प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे जिल्हा न्यायालयाने यासंबंधीच्या याचिका कनिष्ठ न्यायालयांसमोर सादर करता येणार नाही अशी टिप्पणी केली आहे. यापूर्वी यासंदर्भात करण्यात आलेल्या याचिका १९९१च्या कायद्याचा भंग करणाऱ्या असल्याने कनिष्ठ न्यायालयांनी फेटाळून लावल्या होत्या. ही देखील एक प्रश्न चिन्हांकित बाब मानावी लागेल. लखनौ उच्च न्यायालयाने मथुरेच्या जिल्हा न्यायालयास या नऊ याचिकांसह इतरही याचिका

चार महिन्यात निकाली काढण्याचा आदेश दिलेला आहे. १२ मे रोजी हा आदेश दिलेला असल्याने आता पुढील चार महिन्यात यावरुन रणकंदन सुरु राहणार आहे.

कुतुबमिनार हा दिल्लीवर राज्य करणाऱ्या कुतुबुद्दिन ऐबक याने बांधल्याचे व त्यावरुनच त्याचे नाव कुतुबमिनार पडले असे मानले जाते. परंतु नव्याने म्हणजेच आता केल्या जाणाऱ्या ताज्या दाव्यांनुसार हा स्तंभ किंवा बुरुज (मिनार) पाचव्या शतकात सम्राट विक्रमादित्याने बांधल्याचे सांगण्यात येते. गुप्त घराण्यातील या पराक्रमी राजाने तो बांधला असे सांगण्यात येते. तसेच तो सूर्य स्तंभ म्हणून बांधल्याचे सांगितले जाते. विश्व हिंदू परिषदेने हा 'विष्णु स्तंभ' असल्याचा दावा केला आहे. कुतुबमिनारबद्दल वाद निर्माण करण्यात आल्यानंतर हिंदू संघटनांनी नेहमीप्रमाणे कोर्टात धाव घेतली. परंतु हे स्थळ पूजा किंवा प्रार्थनास्थळ नसल्याचा अहवाल पुरातत्व विभागाने दिला आणि १९९१च्या कायद्याखाली त्याचा समावेश करता येणार नसल्याचे म्हटले. त्याबरोबर या परिसरात असलेल्या कुव्वत उल् इस्लाम मशिदीत प्रार्थनेचा अधिकार मिळावा म्हणून हिंदू संघटनांनी कोर्टाकडे धाव घेतली आहे. उपलब्ध ऐतिहासिक माहिती व दस्तावेजांनुसार कुतुबमिनारचे बांधकाम ११९३ मध्ये सुरु झाले. कुतुबुद्दिन ऐबकच्या काळातच ते सुरु झाले. कुतुबचा अकाली अपघाती मृत्यु झाला होता. त्याच्या काळात या मिनारचा केवळ एकच मजला बांधण्यात आला होता. त्यानंतरचा दिल्लीचा सुलतान किंवा प्रमुख शम्सुद्दिन इल्तुमिश याने त्यावर आणकी तीन मजले





चढविले.

त्यानंतर फिरोजशाह तुघलक याने पाचवा व शेवटचा मजला बांधला. १३६८ मध्ये २८ वर्षांनंतर बांधकाम पूर्ण झाल्याचे नोंदीत म्हटले आहे. हा २३८ फूट उंचीचा बुरुज आहे. भारतातील सर्वात उंच बुरुज म्हणून तो ओळखला जातो. त्याच्या भिंतींवर कुराणाच्या आयत कोरण्यात आल्या आहेत. भारतीय व इस्लामी संस्कृतीच्या संमिश्र शैलीत तो बांधण्यात आल्याचे इतिहासकार मानतात. १५०५ मध्ये झालेल्या एका मोठ्या भूकंपात या मिनारचे नुकसान झाले. सिकंदर लोधी या लोधी घराण्यातील संस्थानिकाने त्याची दुरुस्ती केल्याचे दाखले मिळतात. हा मिनार आता 'युनेस्को'च्या 'हेरिटेज' यादीत समाविष्ट आहे. म्हणजेच या स्थळाच्या स्वरुपात काही बदल करण्याचे प्रयत्न

झाल्यास त्याचे आंतरराष्ट्रीय पडसाद उमटल्याखेरीज राहणार नाहीत.



ताजमहालबद्दल वाद उकरण्याचे प्रकार नवे नाहीत. १९७६ मध्ये दिल्ली विद्यापीठातील इतिहास विभागातील प्राध्यापक पु. ना.ओक यांनी ताजमहालवर एक पुस्तक लिहिले आणि त्यामध्ये ताजमहाल हा शाहजहानने बांधलेला नसून मूळ ते शिवमंदिर असून त्याचे नाव 'तेजो-महालय' असे असल्याचे प्रतिपादन केले. १९८९ मध्येही त्यांनी आणखी एक पुस्तक लिहून या सिध्दांताचे समर्थन केले. त्यामुळे १९७६ पासूनच हिंदुत्वनिष्ठांनी ताजमहालबद्दल वाद निर्माण करण्यास सुरुवात केली होती ती आजतागायत. ताजमहालचे मूळ स्वरुप व इतिहास निश्चित करण्यासाठी तज्ञ समितीची स्थापना केली जावी अशी याचिका भाजपचे उत्तर प्रदेशातील स्थानिक नेते रजनीशसिंग यानी अलाहाबाद उच्च न्यायालयात केली होती. १२ मे रोजी न्यायालयाने ती फेटाळून लावली. परंतु भाजपच्या एक खासदार आणि जयपूर राजघराण्याच्या एक वारस राजकुमारी दियासिंग यांनीही एक निवेदन देऊन ताजमहाल ज्या जागेवर बांधण्यात आला आहे ती जागा त्यांच्या पूर्वजांच्या मालकीची असल्याचा दावा केला आणि न्यायालयाने मागितल्यास त्यासंबंधीचे पुरावे सादर करण्याची तयारी त्यांनी दर्शविली. मात्र न्यायालयाने असले कोणतेच अर्ज व याचिका यांची दखल घेण्याचे नाकारुन तूर्तास तरी या वादाला आटोक्यात ठेवण्यात यश मिळवले आहे. परंतु काही कट्टरपंथी संघटनांनी ताजमहालखाली यमुना नदीच्या पात्रात बुडालेल्या तळघरात हिंदू देवदेवतांच्या मूर्ति आहेत वगैरे दावे करुन त्याची पाहणी करण्यात यावी असे प्रयत्न चालविले आहेत. त्यामुळे हा वादही आता कोणत्या दिशेने जाईल किंवा नेण्यात येईल हे समजेनासे झाले आहे.

ताजमहालचा समावेश जगातील आश्चर्यांमध्ये होतो. 'युनेस्को'च्या 'हेरिटेज' म्हणजेच ऐतिहासिक वारसा जतनाच्या स्मारकांच्या यादीत या वास्तूचा समावेश आहे. दरवर्षी लाखो पर्यटक तेथे भेट देत असतात. त्यामुळे या वादाचे आंतरराष्ट्रीय पडसादही उमटू शकतात. हे ऐतिहासिक वाद कमी पडले म्हणून की काय आता हनुमान जन्मभूमीचा वाद उकरण्यात आला आहे. हनुमानाचा जन्म नक्की कुठे झाला यावरुन साधू-संतांमध्ये वाद पेटला आहे. ताज्या वादा नुसार हनुमानाचा जन्म नाशिकजवळ अंजनेरी येथे झाला की किष्किंधा येथे झाला यावरुन या साधू-संतांमध्येच मारामाऱ्या सुरु झाल्या आहेत. हनुमानाचे जन्मस्थान आपल्याच राज्यात स्थित असल्याचा दावा महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र(तेलंगणा) या राज्यांनी केला आहे. आणखी एका सिध्दांतानुसार झारखंडमध्ये हनुमानाचा जन्म झाल्याचा दावा काही संशोधकांनी केला आहे. आंध्र प्रदेशातील तिरुमला या परिसरात असलेल्या सात टेकड्यांपैकी एकाचे नाव 'अंजनाद्रि' असे आहे आणि तेथेच हनुमानाचा जन्म झाल्याची श्रध्दा येथील लोकांमध्ये आहे. तर कर्नाटकातील हंपी येथे असलेल्या 'अंजेयनाद्रि' या डोंगरावरील स्थानी हनुमानाचा जन्म झाल्याचा दावा कर्नाटकातील संतांनी केला आहे.







वाल्मिकी रामायणात तसा उल्लेख आहे. किष्किंधा नगरी म्हणून जो उल्लेख आहे तो हा भाग आहे असे त्यांचे म्हणणे आहे. तर नाशिकजवळच्या 'अंजनेरी' डोंगर हे हनुमानाचे जन्मस्थान असल्याचा उल्लेख ब्रह्मपुराणात असल्याचा दाखला तेथील मंडळींनी दिला आहे. दुर्दैवाने यामुद्यावर जो वाद झाला त्यावरुन नाशिकमध्ये संत-साधूंमध्येच यावरुन तुंबळ वाद होतानाच एकमेकांवर हात उगारण्याचे प्रकार घडले. अखेर नाशिककरांना आव्हान देणाऱ्या व विरोध करणाऱ्या गोविंदानंद नावाच्या साधूमहाराजांना पोलिस संरक्षणात ठेवावे लागले.

वरील वादांचा संक्षिप्त आढावा घेतल्यानंतर समंजस आणि विचारी माणसाला काय वाटेल ? मराठीत एक म्हण आहे की 'नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ शोधायला जाऊ नये'! अगदी तसलाच हा प्रकार आहे. समजूती, चालीरीती, श्रध्दा यांना तर्काचे अधिष्ठान नसते. त्याबद्दल ठोस पुरावे नसतात. इतिहासात घडलेल्या या प्रसंग, घटना, चुका त्यांच्या आधारे चालू वर्तमानात वाद उत्पन्न करुन भांडाभांडी करणे कितपत तर्कसंगत आहे ? दिवसेंदिवस सभोवतालची परिस्थिती ही क्लिष्ट, वाढत्या गुंतागुंतीची होत चालली आहे. महागाईने उग्र रूप धारण केले आहे. लोकांना त्यांच्या नोकऱ्यांची शाश्वती उरलेली नाही. नोकरी गेल्यानंतर व दोनवेळेस अन्न मिळण्याची मारामार सुरु झाल्यानंतर हे ऐतिहासिक वाद पोट भरण्यास कामी येणारे नाहीत. जेव्हा समाजात सलोखा राहील, राजकीय स्थिरता राहील आणि एकंदरीत स्थिरता राहिली तरच प्रगती व विकास होऊ शकतो. ज्या देशात संघर्ष, अस्थिरता असते तेथे प्रगती व विकास होत नाही. श्रीलंकेत सध्या काय परिस्थिती आहे हे बातम्यांमधून समजलेले आहेच. त्याची पुनरावृत्ती भारतात व्हावी अशी कुणाची अपेक्षा आहे काय?

जगभरात आर्थिक संकटाची स्थिती आहे. भारत त्याला अपवाद नाही. त्यामुळे अशा नाजुक परिस्थितीत हे वाद उकरुन समस्या वाढविणे कितपत शहाणपणाचे आहे ? का याचा अर्थ असा लावायचा की राज्यकर्त्यांनाच हे वाद हवे आहेत ज्यामुळे त्यांच्या चुका व महागाईसारख्या प्रश्नांकडे लोकांचे लक्ष जाऊ नये ? परंतु धर्म आणि इतिहासातील गोष्टी खणून काढण्याचे उद्योग सत्ताधाऱ्यांच्याच निकटवर्तुळातून सुरु आहेत. मथुरा न्यायालय असो किंवा ग्यानवापीचे प्रकरण असो या प्रकरणांमध्ये रंजना अग्निहोत्रि नावाच्या महिला वकील सक्रिय आहेत आणि त्या काही विशिष्ट संघटनांशी संबंधित आहेत. एवढे लक्षात घेतले तरी यामागील डाव व षड्यंत्र समजण्यास मदत होईल. ही परिस्थिती कशी आहे? इतिहास उकरण्याच्या अतिरेकाचा हा परिणाम आहे. याचे भान मात्र कट्टरपंथीयांना येताना दिसत नाही. त्यांना फक्त निवडणुकांमधील मतांची चिंता भेडसावत आहे आणि ती मते मिळविण्यासाठी वाटेल त्या थराला जाण्याचे प्रकार ते करु लागले आहेत. समंजस व सुजाण जनतेनेच याला प्रत्युत्तर देऊन हे प्रकार थांबविण्याची वेळ आली आहे.


■■



परिवर्तनाचे शिल्पकार

फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमाला





# छत्रपती राजर्षी शाहू आणि राष्ट्रीय एकात्मता






डॉ.जयसिंगराव पवार



**परिवर्तनाचे शिल्पकार : फुले–शाहू–आंबेडकर या व्याख्यानमालेअंतर्गत राजर्षि शाहू यांनी देशाच्या एकात्मतेला व एकसंघ राहण्याला महत्त्व देऊन विविध उपक्रमातून राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना कशी केली, यासंबंधीचा राजर्षि शाहू चरित्राचे अभ्यासकार आणि ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी घेतलेला संक्षिप्त आढावा.**

राजर्षी शाहू आणि राष्ट्रीय एकात्मता या विषयाच्या अनुषंगानं मी जे बोलणार आहे, ते एकप्रकारे शाहू महाराजांच्या कार्याचं, कामगिरीचं सिंहावलोकनच आहे. शाहू महाराजांचं संपूर्ण कार्य हे एक राष्ट्रबांधणीचं कार्य होतं. राष्ट्रनिर्मात्याचं काम होतं. आणि म्हणून शाहू महाराज आणि राष्ट्रीय एकात्मता असा जेव्हा आपण विचार करतो त्यावेळेला राष्ट्र ही संकल्पना पहिल्यांदा समजून घेतली पाहिजे आणि ती थोडक्या भाषेमध्ये सांगायचं म्हणजे, एखाद्या देशातील लोकांना आपण या देशातील आहोत, आपण सगळे बांधव आहोत, आपल्यामध्ये परस्परांमध्ये एक प्रकारचा राष्ट्रीय बंध आहे, भावनात्मक बंध आहे, सांस्कृतिक बंध आहे, सामाजिक बंध आहे आणि या सगळ्या बंधांमधून मग राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते.



राष्ट्र ही संकल्पना आम्हाला ज्ञात नव्हती. प्रामाणिकपणे कबुल करायला पाहिजे, की राष्ट्र ही संकल्पना आम्हाला युरोपियन, पाश्चात्य संस्कृती किंवा राजकीय तत्त्वज्ञान याच्यातून समजलं. आणि एकप्रकारे आम्हा भारतीय लोकांना आत्मज्ञान झालं, की अरे आम्ही राष्ट्र आहोत. अरे, आम्हाला माहितच नाही. आमच्या ठिकाणी कितीतरी राष्ट्र बनण्याचे अवयव आहेत आणि मग आम्ही राष्ट्र का बनू शकत नाही. खरं म्हणजे आहोतच, पण विझलेल्या राखेवर साचलेल्या निखाऱ्याप्रमाणे आपण झालेलो आहोत. त्याच्यावर फुंकर टाकली पाहिजे. आणि मग जो धगधगता निखारा दिसेल, ते राष्ट्र असेल. आणि म्हणून राष्ट्र ही संकल्पना पाश्चात्य संस्कृतीच्या सहवासातून आपणाला समजून आली. आणि मग राजा राममोहन रॉयपासून पंडित जवाहरलाल नेहरूंच्यापर्यंत आमच्यामध्ये अनेक राष्ट्रपुरूष निर्माण झाले. पण, राष्ट्रपुरूष आपण कुणाला म्हणालो. त्यांना म्हणालो हे काय चुकीचे नाहीये. पण, केवळ तेच राष्ट्रपुरूष होते का?

देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी जे काय आंदोलन झालं, काँग्रेसच्या नेतृत्वाखाली, राष्ट्रीय सभेच्या नेतृत्वाखाली, त्या नेतृत्वानं जे काय नेते दिले आम्हाला, त्यांना आम्ही राष्ट्रपुरूष मानलं. हे खरं होतं, खोटं नव्हतं. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आमच्या लक्षात आलं, ज्याला आम्ही स्वातंत्र्य म्हणत होतो, ते स्वातंत्र्य हे पूर्ण स्वातंत्र्य नाहीये. सामाजिक स्वातंत्र्याचा जो भाग आहे, तो महत्त्वाचा भाग आहे. आणि सामाजिक स्वातंत्र्य जोपर्यंत मिळत नाही, निर्माण होत नाही, तोपर्यंत आम्हाला खऱ्या अर्थानं स्वातंत्र्य मिळालं, आपला देश स्वतंत्र झाला असं म्हणता येणार नाही. मग आता प्रश्न असा निर्माण झाला, की सामाजिक स्वातंत्र्य निर्माण करणारे महात्मा फुल्यांच्यापासून ते अगदी बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत महाराष्ट्रापुरता आपण विचार करूया, जे नेते होते, त्यांचं कार्य कोणत्या व्याख्येमध्ये बसवणार? आणि मग आमच्या लक्षात आलं, की अरे हे राष्ट्रबांधणीचंच कार्य होतं. हे एकप्रकारे स्वातंत्र्य प्राप्त करण्याचंच कार्य होतं. रानडे, लोकमान्य टिळकांच्यापासून ते महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, नेहरूंच्यापर्यंत राजकीय स्वातंत्र्यासाठी लढलेले लोक होते. आणि हे महात्मा फुल्यांच्यापासून नंतरच्या काळामध्ये सामाजिक स्वातंत्र्यासाठी जे लढले त्यांना आम्ही राष्ट्रपुरूष मानलं नाही. त्यांना आम्ही सुधारकच मानलं. खरं म्हणजे पारतंत्र्यासाठी लढले ते जसे राष्ट्रपुरूष होते, तसेच सामाजिक पारतंत्र्याच्या विरोधात, सामाजिक गुलामगिरीच्या विरोधात, सामाजिक न्याय निर्माण करण्याच्यासंदर्भात ज्यांनी कार्य केले, तेही तेवढेच राष्ट्रपुरूष होते असं आपण मानलं पाहिजे.

आणि मग आपल्या लक्षात येतं, की शाहू महाराजांना जेव्हा महात्मा गांधी, मागच्या माझ्या लेक्चरमध्ये मी म्हणालो, की महात्मा गांधींनी शाहू महाराजांना स्वराज्याचे

खरे संस्थापक मानलं. शाहू महाराजांनी स्वराज स्थापन केलं, अस्पृश्यता नष्ट करून स्वराज स्थापन करण्याचं कार्य केलं. असं का म्हणाले? त्याचा संदर्भ आपल्याला याठिकाणी लागतो. एक खरं आहे, की राष्ट्रीय एकात्मता साध्य करायची असेल तर त्यातला पहिला भाग म्हणजे पारतंत्र्य नष्ट करायला पाहिजे. आणि म्हणून स्वातंत्र्यासाठी जी चळवळ झाली, या चळवळीमध्ये आपल्याला असं दिसतं, की आपण त्या चळवळी करणाऱ्यांना राष्ट्रपुरूष मानलं. नंतरच्या काळामध्ये आम्हाला असं दिसून आलं, की आमचं स्वातंत्र्य हे पूर्ण स्वातंत्र्य नाही. पण इथं थांबत नाही हा प्रश्न. एवढं सांगून केवळ सामाजिक समता निर्माण करणं हे सगळ्यांचं कार्य आहे, या सुधारकांचं हे खरं आहे, परंतु हे राष्ट्रनिर्मितीसाठी कसं उपयुक्त ठरलं हे आपण पाहिलं पाहिजे.

राजकीय स्वातंत्र्याचा लढा असो अथवा सामाजिक स्वातंत्र्याचा लढा असो, तो यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता ही महत्त्वाची आहे. त्याचं यश तुमच्या ठिकाणी राष्ट्रीय एकात्म भाव किती आहे याच्यावर अवलंबून आहे. आणि म्हणून भारतीय राष्ट्रवाद, या राष्ट्रवादामधून निर्माण होणारी राष्ट्रीय एकात्मता यांच्या मार्गावरचे प्रमुख अडथळे कोणते होते? हे आपण पहिल्यांदा पाहिलं पाहिजे. पारतंत्र्य हा मोठा अडथळा. पण हे एकच विघ्न नव्हतं. आणखीन काही विघ्नं आहेत. त्यातलं पहिलं विघ्न असं आहे, की आमच्यामध्ये असलेले धर्मभेद. दुसरा अडथळा वर्णभेद. तिसरा जातीभेद आणि चौथा अज्ञान. हे चार मोठे अडथळे राष्ट्रीय एकात्मतेला घातक, त्याला विरोध करणारे आणि ज्यांच्यामुळं आमच्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता निर्माण होऊ शकली नाही असे हे घटक आहेत. तर हे घटक दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्याच्यामध्ये आपणाला महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, सद्गुरू गाडगे महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील इथपर्यंत आपणाला ही मालिका आणता येईल.

हे जे भेद आहेत, धर्मभेद आहे, वर्णभेद आहे, जातीभेद आहे, अज्ञान आहे, यासंदर्भामध्ये शाहू महाराजांनी काय उपाययोजना केली हे आपण पाहिलेलंच आहे. पण, आज आपण सिंहावलोकन म्हणून काही गोष्टी बघणार आहोत. सर्वात महत्त्वाचा धर्मभेद. अनेक धर्म आहेत. त्यातले दोन मुख्य धर्म म्हणजे हिंदू आणि मुसलमान. याच्यावर आपण पूर्णपणे मात करू शकलेलो नाही. भारताची फाळणी झाली, त्याचं कारण धर्मभेद. आम्ही धर्मनिरपेक्ष मार्गानं गेलो. जिना आणि त्यांचे अनुयायी अतिरेकी धर्माच्या मार्गानं गेले. खूप प्रयत्न केले गेले. पण आम्हाला हे राष्ट्र एकत्र ठेवता आलं नाही. दुभंगलं. पण राहिलेलं राष्ट्र हे एकात्म भावनेनं आज उभं राहिलेलं आपणाला दिसतंय. आणि याला ज्याप्रमाणं राजा राममोहन रॉय म्हणा किंवा दादाभाई म्हणा, किंवा रानडे म्हणा किंवा अलिकडच्या महात्मा गांधींच्यापर्यंत, जसे राष्ट्रपुरूष कारणीभूत आहेत, त्याप्रमाणं मघाशी मी सांगितल्याप्रमाणं समाज क्रांतीकारकही त्याला कारणीभूत आहे. आम्ही सगळे एक आहोत ही एकात्मतेची भावना आपल्या ठिकाणी





१८५७ च्या युद्धात हिंदू-मुस्लिम एक होऊन ब्रिटिशांच्या विरुद्ध लढले

असणं आणि त्यासाठी पहिल्यांदा धर्मभेद नष्ट केला पाहिजे. जातीभेद हा पुढचा भाग आहे. अस्पृश्यता त्याच्याही पलिकडचा भाग आहे. आणि म्हणून धर्मभेदामध्ये पहिली जाणीव, राज्यारोहण झालं शाहू महाराजांचं १८९४ला आणि १८९३ला महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदा हिंदू-मुस्लिम दंगल झाली. त्याचे पडसाद आपणाला शाहू महाराजांच्या एका सत्काराच्या कार्यक्रमात उत्तरादाखल केलेल्या भाषणामध्ये दिसतात.

सार्वजनिक सभेनं पुण्यामध्ये शाहू महाराजांचा एक कार्यक्रम आयोजित केला अभिनंदनाचा. तर त्यामध्ये त्यांनी म्हटलेलं आहे, की नुकतीच मुंबईमध्ये हिंदू आणि मुसलमान दंगल झाली. त्याची पुनरावृत्ती होता कामा नये. शाहू महाराजांनी इच्छा प्रदर्शित केलेली आहे, की हिंदू आणि मुस्लिम हे या राष्ट्राचे, या देशाचे घटक अवयव आहेत. तेव्हा एकमेकांनी द्वेष करून हे राष्ट्र उभं राहणार नाही. हे राष्ट्र जर उभा करायचं असेल, तर एकात्म भावानं आपण पुढं गेलं पाहिजे. ब्रिटिशांना हिंदू आणि मुस्लिम यांचं ऐक्य व्हायला नको होतं. १८५७ साली हिंदू आणि मुस्लिम खांद्याला खांदा लाऊन ब्रिटिशांच्या विरोधात लढलेले आहेत. आणि त्यातून ब्रिटिशांनी धडा असा घेतला, की कोणत्याही परिस्थितीत इथून पुढं हिंदू आणि मुस्लिम एकत्र येता कामा नये. शाहू महाराज हे ब्रिटिशांचे मांडलिक आहेत आणि तरीसुद्धा हिंदू आणि मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार ते करतात. धर्माला शाहू महाराजांनी किंमत दिली नाही असं नाही. पण, धर्मापेक्षा राष्ट्र मोठं आहे असं मानलं. आणि धर्म म्हणजे देवाकडं जाण्याचा मार्ग आहे आणि निरनिराळ्या मार्गानं जर लोक देवाकडं जात असतील तर त्या मार्गावरून जाणाऱ्या लोकांना परस्परामध्ये वैरभावना ठेवण्याचं कारण काय?

आणखी एक फार धर्मनिरपेक्षपणाची आणि शाहू महाराज राष्ट्रीय विचार कसे करत होते याविषयी त्यांचा एक अतिशय चांगला असा उद्‌गार त्यांच्या भाषणामध्ये आपल्याला मिळतो. ज्यामुळं आजसुद्धा शाहू महाराजांचं चरित्र, शाहू महाराजांचे विचार आम्हाला मार्गदर्शक ठरतात. त्यांनी म्हटलं, की आम्ही सर्व हिंदी आहोत. हिंदी प्रजाजन कोणत्याही वर्णाचे असो, कोणत्याही धर्माचे असो, ते सर्व हिंदी आहेत. पुढं हाच विचार पंडित नेहरूंना आपल्याला सांगितला आहे. हिंदी आणि हिंदू याच्यातला फरक. तुम्हाला हिंदू राष्ट्र निर्माण करायचं आहे की हिंदी राष्ट्र निर्माण करायचंय. आजसुद्धा भारताच्या राजकारणामध्ये हा मोठा प्रश्न चर्चिला जातोय विचारवंतांच्यामध्ये. आणि मग अशावेळेला अशा राष्ट्रपुरूषांचे विचार आम्हाला मार्गदर्शक ठरतात. ते असं म्हणतात, व्यक्तीच्यादृष्टीनं धर्माची बाब महत्त्वाची असेल.

मी हिंदू आहे, मला अभिमान आहे. ठीक आहे. तुला तुझा धर्म मोठा वाटत असेल. आम्हाला त्याबद्दल काय म्हणायचं नाही. पण राष्ट्राच्या बाबतीमध्ये तो धर्म केव्हाही आड येता कामा नये. यापुढती धर्म ही बाब फार कमी महत्त्वाची आहे. प्रत्येकानं आपल्या अंत:करणावर शाहू महाराजांचे हे उद्गार कोरून ठेवले पाहिजेत. शाहू महाराज म्हणतात, की तुमचा जो धर्म असेल तो उंबऱ्याच्या आत ठेवा. उंबरा ओलांडून जेव्हा तुम्ही रस्त्यावर येता, त्यावेळेला तुम्ही सर्व हिंदी आहात, सर्व भारतीय आहात. ही राष्ट्रीय एकात्मतेची भावना, हा जो विचार आहे, हा सर्वात मोठा विचार शंभर-सव्वाशे वर्षापूर्वी शाहू महाराजांनी सांगितलेला आहे. आणि म्हणून आमचं असं म्हणणं आहे, की शाहू महाराजांना मग राष्ट्रपुरूष का म्हणू नये? तर हा राष्ट्रबांधणीचा विचार आहे. याच्याशिवाय आजही राष्ट्र बांधलं जाऊ शकत नाही. आम्ही एक आहोत. आमच्या कोल्हापुरातून, आमच्या महाराष्ट्रातून, आमच्या नाशिकमधून म्हणा किंवा मराठवाड्यातून म्हणा जेव्हा शेकडो, हजारो शेतकरी जातात आज दिल्लीला, तिथल्या शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी, तिथं उपोषण करण्यासाठी जातात. हे कशासाठी? केवळ शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी तर आहेच. पण त्या अंतरंगामध्ये आपल्याला असं दिसेल ती राष्ट्रीय एकात्मतेची भावना. पंजाबमधला शेतकरी काय आणि महाराष्ट्रामधला शेतकरी काय, हा एक आहे. राष्ट्रीय एकात्मतेला आणखी काही उदाहरणाची गरज नाही. जेव्हा मद्रासमधला एक तरूण काश्मीरसाठी आपलं बलिदान करतो, तेव्हा काश्मीर हा त्याच्याच देशाचा एक अविभाज्य भाग असतो. ही राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्यासाठी दीडशे वर्षे आमचे नेते, राष्ट्रपरूष त्यासाठी खपायला लागलेले आहेत.

आणि म्हणून आपणाला असं दिसेल, की शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारामध्ये अशा काही गोष्टी केल्या, की हिंदू आणि मुस्लिम यांचं ऐक्य साधलं जावं. कृतीनं त्यांनी दाखवून दिलं. त्यांनी एका ठिकाणी म्हटलंय, की मराठा आणि मुस्लिम यांच्यामध्ये धर्म सोडला तर काय फरकच नाही. सगळे त्यांचे आचार, विचार, पोशाख हे सगळं सारखेच आहेत. आणि म्हणून हेसुद्धा माझे प्रजाजन आहेत. मी केवळ मराठ्यांचा राज नाहीये, मी अस्पृश्यांचाही राजा आहे, मुसलमानांचाही राजा आहे. आणि म्हणून शाहू महाराजांनी त्या काळामध्ये २५ हजार रूपये खर्च करून मूळ अरबीमध्ये असणारं कुराण हा धर्मग्रंथ आपल्या प्रजाजनांसाठी तो उर्दुमध्ये आणला. सध्या जी मुसलमान भाषा बोलतायंत, त्या उर्दु भाषामध्ये आणला. का? तर त्यांना त्यांचा मूळ ग्रंथ समजला पाहिजे. नुसत पठण करून काय उपयोग आहे? ही जी आत्मियतेची भावना आहे मुसलमानांविषयी, एका हिंदू राजांनी मुसलमान प्रजेविषयीची भावना आहे. कितीतरी उदाहरणं सांगता येतील हिंदू आणि मुस्लिम एक प्रकारचं आत्मिक ऐक्य साधावं यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न. पाटगावला मौनी महाराजांचा मठ आहे. त्या मठाच्या उत्पन्नापैकी काही भाग मशिदीला जोडून दिला. शिरोळला एका पिराचं देवस्थान आहे. त्याच्या उत्पन्नातला भाग अंबाबाई मंदिरातील दिवे पाजाळण्यासाठी लावला. मशिद आणि मंदिर याच्यात फरक नाहीये हे त्यांना दाखवायचंय.

कोल्हापुरात मोहरम आणि गणेशोत्सव एकाच मांडवात साजरा केला जातो.



आजसुद्धा कोल्हापुरामध्ये मोहरम आणि गणेशोत्सव येतो त्यावेळेला एका बाजूला मोहरम आणि दुसऱ्या बाजूला गणपती बसवला जातो. हिंदू आणि मुस्लिम यांच्या ऐक्याचा आदर्श शाहू महाराजांनी घालून दिला आणि राष्ट्रापुढं हा एक धडा घालून दिला, की राष्ट्र जर टिकवायचं असेल तर तुम्हाला एकात्म भाव निर्माण करावा लागेल. तुमच्या आचरणातून, तुमच्या विचारातून करावा लागेल. हा एक भाग झाला धर्मभेद. दुसरा आला जातीभेद आणि या जातीभेदाच्याच पोटात असलेला अस्पृश्यता हा एक भावनिक मुद्दा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीभेद हा कसा आहे करणारा माणूस हा सहजासहजी प्राध्यापक बनू शकतो. म्हणजे आपल्या या आजच्या वर्ण व्यवस्थेमध्ये ब्राह्मण होऊ शकतो. पण आम्ही चातुर्वण्य आणि जातीभेद याच्यामध्ये आमचा समाज असा बांधून ठेवलेला होता, की एका मनोऱ्यातून दुसऱ्या मनोऱ्यामध्ये जाण्याचा मार्गच आम्ही बनवला नाही. शाहू महाराजांना, डॉ. आंबेडकरांना हे मनोरे मोडायचे होते. ही जी उतरंड आहे, ही उतरंड नष्ट करायची होती.

शाहू महाराजांनी आपल्या अनेक भाषणांमध्ये जपानमधल्या सामुराईंचं उदाहरण देतात. आपल्याकडं याचं उत्कृष्ट असं एक उदाहरण दिलेलं आहे. ते म्हणतात, की हा एक मनोरा आहे आणि मनोऱ्यातले हे जे मजले आहेत, त्यामध्ये एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी शिडी नाही. ज्या मजल्यामध्ये मनुष्य जन्मला, म्हणजे शूद्राच्या मजल्यामध्ये एखादी व्यक्ती जन्मली तर ती तिथेच वाढणार, तिथेच राहणार आणि तिथेच मरणार. तो वर जाऊ शकत नाही. आपल्याला हे माहित नाही, की यूरोपियन लोकांच्यामध्ये किंवा पाश्चात्य देशांमध्ये किंवा अन्य काही देशांमध्ये सुद्धा जातीभेद नाहीये. त्यांना जात ही कळूच शकत नाही. पाश्चात्य देशामध्ये चांभाराचं काम ज्याप्रमाणं सरदार लोक, जहांगिरदार लोक किंवा तथाकथित आपण म्हणू की, उच्चवर्णिय मराठे आणि त्याच्यामध्ये परत ब्राह्मण वगैरे मंडळी उच्चवर्णिय आले असा जो वर्ग आहे, तशाच प्रकारचा वर्ग हा जपानी समाजामध्ये होता. पण, जपानी लोकांच्या जेव्हा लक्षात आलं, की आपण आधुनिक ज्ञान-विज्ञानाचा स्वीकार करायला पाहिजे, जीवन पद्धतीचा स्वीकार करायला पाहिजे आणि आधुनिक जीवन पद्धतीचा स्वीकार करायचा असेल, तर पहिली गोष्ट आपल्यातली वर्ग जे आहेत, उच्च वर्ग आणि कनिष्ठ वर्ग ते पहिल्यांदा नष्ट करायला पाहिजे. आणि म्हणून मग त्यांनी मैजी क्रांती,


जपानमधील मैजी क्रांती

मैजी क्रांती ही एक राजकीय क्रांती होतीच, पण राजकीय क्रांतीबरोबरच ती फार मोठी सामाजिक क्रांती होती. तिथल्या सामुराई, सरदार वर्गानं आपले सर्व प्रतिष्ठेचे हक्क हे राष्ट्राच्या चरणी अर्पण केले आणि आजपासून आपण एक सामान्य नागरिक झालो, आमच्यातला गरीबातला गरीब माणूस जो असेल त्याच्या दर्जाचा मी झालो हे त्यांनी जाहीर केलं. हे जाहीर केलं म्हणून एक आधुनिक राष्ट्र, एक बलदंड राष्ट्र म्हणून विसाव्या शतकामध्ये जपानचा उदय झाला.

आमचे नेते, लोकमान्य टिळकांच्यापासून अगदी स्वातंत्र्य मिळेपर्यंत ज्यांनी आम्हाला नेतृत्व दिलं, त्या सर्वांनी सांगितलं, की जपानचं अनुकरण करा. लोकमान्य टिळकांनी तर आपल्या भाषणामध्ये त्याचा गौरव केलाय. शाहू महाराजांनी त्याचा गौरव करताना म्हटलेलं आहे, की



आम्ही जपानी लोकांचं अनुकरण करायला पाहिजे. पहा त्यांनी काय केलं? आधुनिक बनले ना ते आणि आधुनिक बनायचं, राष्ट्रीय एकात्मता साध्य करायची, तर त्यातला महत्त्वाचा भाग आहे, त्यातली जी अडचण आहे, ती पहिल्यांदा आपण नष्ट करायला पाहिजे आणि ती म्हणजे वर्गहीन समाज निर्माण करायला पाहिजे. आमच्यातला वर्ग नष्ट करायला पाहिजे. आम्ही केला का? आजही झालेत का? नाही झाले. म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गावरील अडथळे आम्ही अजूनही पूर्णपणे नष्ट करू शकलेलो नाही. म्हणून शाहू महाराज काय, डॉ. आंबेडकर काय, महात्मा फुले काय या सर्वांच्या राष्ट्रीय विचारांचं ९७ टक्के लोकांच्या कल्याणाचा विषय हा राष्ट्रीय विचार असतो हे लक्षात घ्या. तर त्या विचाराचं अनुकरण, त्या विचाराचं मनन, आणि त्यातून प्रेरणा घेऊन काम करणं हे फार महत्त्वाचं आहे.

महाराज म्हणाले, की जातीभेदाचं अत्यंत वाईट असं दर्शन आपल्याला अस्पृश्यता या विषयामध्ये दिसते. म्हणजे आम्हाला कुत्रा चालतो, आम्हाला मांजर चालतं, आम्हाला गाय चालते. पण आम्हाला माणूस चालत नाही हाडामांसाचा. महाराजांना आश्चर्य वाटतं. एका ठिकाणी ते म्हणतात, की आपल्या धर्मात जातीभेदामुळं जो उच्च-नीचपणा आलेला आहे, अशा प्रकारचा जन्मजात भेदभाव जगाच्या पाठीवर कुठेही, कोणत्याही धर्मामध्ये नाही आणि जातीभेदाचे सर्वात मोठे हिडीस स्वरुप कोणते असेल, तर ती म्हणजे अस्पृश्यता. ज्या प्रकारे इतर जातीकडून तुम्हाला, तुम्हाला म्हणजे अस्पृश्य लोकांना, ज्या रितीने वागवले जाते, ती रीत जगात कुठेही आपल्याला आढळून येत नाही. तुम्ही आमचे बंधू असता, तुम्हाला आम्ही अस्पृश्य लेखून मांजरे, डुकरे, कुत्री यांच्यापेक्षाही तुम्हाला नीचपणे वागवता येते ही किती शरमेची गोष्ट आहे, किती लाजेची गोष्ट आहे. असे शाहू महाराज अस्पृश्यांच्या सभेमध्ये म्हणतात.

शाहू महाराजांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी जे अनेक कायदे केले, अनेक उपक्रम केले, म्हणजे राजवाड्यामध्येच त्यांना आणलं, हत्तीवरचे माहुत नेमले, कारवरचे ड्रायव्हर नेमले. एवढंच नव्हे, तर पुजारी बनून त्यांना आपली जी काही देवस्थानं होती, त्याठिकाणी अस्पृश्यांना नेमलं. शिकारखान्यावर नेमलं आणि लोकांना दाखवून दिलं, की हे सुद्धा आपले बंधूच आहेत. अस्पृश्यांना बंधू नव्हे, तो माणूस म्हणून सुद्धा आम्ही जवळ करत नव्हतो. अशावेळेला राष्ट्रीय एकात्मता कशी साध्य होणार? जेव्हा तुम्ही आमच्याच समाजामधल्या शूद्रातिशूद्र अशा वर्गाला जर माणूस म्हणून त्याला किंमत देत नसाल, मानवी मूल्य देत नसाल तर तुम्ही राष्ट्र कसं निर्माण करणार? राष्ट्रीय एकात्मता कशी साध्य होणार? आणि म्हणून डॉ. आंबेडकरांचा सवाल होता, या राजकीय नेत्यांना, स्वातंत्र्यासाठी जे लढत होते, त्यांना विरोध नव्हता त्यांचा. पण वेगळा एक सवाल होता, की हे तुमचं स्वातंत्र्य कोणासाठी आहे. वर्षानुवर्षे तुम्ही आमच्या खांद्यावर सामाजिक किंवा धार्मिक गुलामगिरीचं जू ठेवलेलं आहे, ते पहिल्यांदा काढा. ती गुलामगिरी पहिल्यांदा नष्ट करा. मग राजकीय गुलामगिरीविषयी आपण बोलूया. फार महत्त्वाचा मुद्दा आहे लक्षात घ्या. सामाजिक गुलामगिरी असेल आणि फक्त राजकीय गुलामगिरी नष्ट झाली, तर राजकीय हक्क ज्यांच्या ताब्यात येणार ते परत सामाजिक

गुलामगिरी अधिक घट्ट करणार. हा अंदाज महात्मा फुल्यांनी बांधलेला होता. हा अंदाज राजर्षी शाहू छत्रपतींनी व्यक्त केलेला आहे. डॉ. आंबेडकरांनी तर त्याला सरळ सरळ विरोध केलेला आहे. तुम्ही पहिल्यांदा आम्हाला स्वातंत्र्य द्या. म्हणजे स्वातंत्र्याचा मोठा आशय याठिकाणी डॉ. आंबेडकर, शाहू महाराजांच्या समोर आहे आणि हा राष्टीय एकात्मतेशी जोडलेला आहे.

म्हणजे राष्ट्रामध्ये जातीभेद ठेवायचा, अस्पृश्यता ठेवायची आणि राष्ट्रीय एकात्मतेची भाषा करायची. राष्ट्रीय एकात्मता निर्माण होऊ शकणार नाही. आणि म्हणून जर राष्ट्रीय एकात्मता तुम्हाला साधायची असेल, तर पहिल्यांदा या गोष्टी करा. पहिल्यांदा आम्हाला तुम्ही माणूस म्हणून स्वीकारा. मग बंधू वगैरे नंतरचा भाग. ही भूमिका आपण शाहू महाराजांची समजून घेतली पाहिजे. डॉ. आंबेडकरांची समजून घेतली पाहिजे.

आणि शेवटचा अडसर एक राहिला, आणि तो फार महत्त्वाचा आहे. आम्हाला तरी केव्हा कळालं हो, की आम्ही राष्ट्र आहोत. शिक्षणामुळं कळालं. तेव्हा आमच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार जेवढा जास्त होईल, आमच्यामधलं अज्ञान जेवढं नष्ट होईल, आणि लवकरात लवकर नष्ट होईल तेवढ्या वेगानं आमच्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता साध्य होईल. साधं उदाहरण आहे हो. जपान्यांना असं का वाटलं, की सामुराई वर्ग नष्ट करावा. खुद्द सामुराईंनाच असं वाटलं, की आपले सगळे प्रतिष्ठेचे हक्क सोडून टाकावेत. आम्हाला संस्थानिकांचे हक्क कायदे करून बरखास्त करावे लागलेत हे लक्षात घ्या. काही ठिकाणी तर आम्हाला पोलिसी कारवाई करून, लष्कर पाठवून ही संस्थानं आम्हाला विलिन करावी लागली आहेत. आणि तुम्ही तुलना करायला निघालात जपानशी. ज्यांनी स्वत:हून आपले प्रतिष्ठेचे हक्क राष्ट्राच्या चरणी अर्पण केले. ही अपेक्षा आहे. तुम्हाला जर जगामध्ये नंबर एकचं राष्ट्र म्हणवून घ्यायचं असेल तर पहिली गोष्ट राष्ट्रीय एकात्मतेची आहे. राष्ट्र म्हणून तुम्हाला उभं राहता आलं पाहिजे, की मी या राष्ट्राचा आहे. म्हणून शाहू महाराज म्हणतात, की तुम्ही कोणत्या धर्माचे आहात हे महत्त्वाचं नाहीये. तुम्ही कोणत्या देशाचे आहात हे महत्त्वाचं आहे. आणि म्हणून रस्त्यावर तुम्ही आलात, की तुम्हाला असं वाटलं पाहिजे, की आम्ही सर्व हिंदी आहोत. धर्म हा उंबऱ्याच्या आत. हे सगळं समजतं केव्हा? शिक्षणाचा प्रसार होतो तेव्हा. जेव्हा सामान्यातला सामान्य माणूस सुद्धा शिक्षित होतो तेव्हा. शिक्षित माणूस हा शहाणा होतो असं गृहित धरलं जातं. त्याला कळतं, की राष्ट्र म्हणजे काय. देश म्हणजे काय. आपले हक्क म्हणजे काय. मानवता म्हणजे काय. वर्णभेद आणि जातीभेदामुळं आपलं किती नुकसान झालं, हे कसं समजतं. हे शिक्षणानं समजतं.

शाहू महाराज हे केवळ बोलके सुधारक नव्हते. कर्ते सुधारक होते. आपल्या उत्पन्नाचा जवळजवळ सहावा भाग ते शिक्षणावरती खर्च करत होते. ज्यावेळेला संपूर्ण मुंबई इलाख्यामध्ये प्राथमिक शिक्षणाचं बजेट हे ८० हजार होतं, त्यावेळेला शाहू महाराज एक लाख रूपये आपल्या राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणावर खर्च करत होते. ही गोष्ट आहे १९१७ची. १९२२ साली त्यांचं निधन जेव्हा झालं, त्यावेळी शाहू महाराज आपल्या खजिन्यातील ३ लाख रूपये हे प्राथमिक शिक्षणावर खर्च करत होते. शिक्षण मिळालं पाहिजे. माझी प्रजा सुशिक्षित झाली पाहिजे. चौथीपर्यंत जरी शिकली तरी मी माझं राज्य त्यांच्या हातात द्यायला तयार आहे. स्वराज्य, स्वराज्य म्हणून काय वल्गना करायला लागलात तुम्ही, स्वराज्याचे पुरस्कर्ते आम्ही आहोत. पण स्वराज्याचे हक्क मी दिले तर ते कुणाच्या हातामध्ये जाणार आहेत. सामान्यतल्या सामान्य माणसाच्या हातामध्ये, रयतेच्या हातामध्ये, बलुत्यांच्या हातामध्ये, अस्पृश्यांच्या हातामध्ये जावेत यासाठी माझे प्रयत्न चालू आहेत. आणि हे प्रयत्न जेव्हा सफल होतील त्यावेळेला मी आपणहून माझं राज्य हे त्यांच्या हवाली करणार आहे. हा राष्ट्रीय एकात्मतेचा भाव आहे.

जी गोष्ट आपल्या राज्याबद्दल शाहू महाराज बोलतायंत, राष्ट्रीय एकात्मेचा विचार हा फक्त त्यांच्या राज्यापुरता नव्हता हे लक्षात घ्या. जरी त्यांच्या राज्यात प्रयोग करत असले तरीसुद्धा हा राष्ट्रीय स्तरावरचा विचार आहे. आणि म्हणून आम्ही जेव्हा म्हणतो, की ज्याप्रमाणं दादाभाई नौरोजी, ज्याप्रमाणं न्यायमूर्ती रानडे, ज्याप्रमाणे लोकमान्य टिळक किंवा त्यानंतर महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, हे जसे आमचे राष्ट्रीय नेते आहेत, हे जसे आमचे राष्ट्रीय पुरूष आहेत, तसे महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर हेसुद्धा आपले राष्ट्रीय नेते आहेत. जर राष्ट्राचा खरा अर्थ आम्ही समजून घेतला तर. राष्ट्र म्हणजे केवळ डोंगर, नद्या आणि मैदानं नव्हेत. राष्ट्र म्हणजे माणसं. एकात्म भावानं जोडली गेलेली. देशभक्तीनं जोडली गेलेली. जसं आपल्या शरीरातले अवयव असतात, एकाठिकाणी जरी सुई टोचली तरी सगळ्या शरीराला त्याची जाणीव होते.

आज जरी आपण राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गावरून फार पुढं गेलो असलो तरी आपल्याला अजूनही फार मोठा पल्ला गाठायचा आहे. हा पल्ला गाठत असताना सर्वात महत्त्वाची गोष्ट जी आपणाला आमच्या राज्यघटनेनं दिली आहे, ती म्हणजे जशी लोकशाही आहे, स्वातंत्र्य आहे, सार्वभौमत्त्व आहे या सगळ्या तत्त्वांना महत्त्व आहेच, पण माझ्यादृष्टीनं सर्वात महत्त्वाची, राष्ट्रनिर्मितीच्या दृष्टीनं, राष्ट्र टिकवण्याच्या दृष्टीनं जर कोणती महत्त्वाची गोष्ट असेल, आमच्या राष्ट्र पुरूषांनी सांगितलेली, समाज क्रांतीकारकांनी सांगितलेली, तर ती आहे धर्मनिरपेक्षता.

आम्ही जर आमच्या देशातल्या लोकांना परके टिकवायचं असेल, तर आम्ही सर्व धर्माचे आहोत. आमचं राष्ट्र हे अनेक धर्मांचं आहे. असं असू शकतं. आम्ही तर शतकानुशतके एकत्र आहोत. आणि आज जे आम्हाला मुसलमान दिसतायंत, ख्रिश्चन दिसतायंत हे एकेकाळी मुख्य समाज प्रवाहामध्येच होते. बाहेरून आलेले आणि याठिकाणी स्थायिक झालेले फार कमी लोक आहेत.

मुसलमानांच्या संदर्भामध्ये फार तर म्हणता येईल, की अफगाण आले वगैरे वगैरे. पण आता ते या भूमीमध्ये एकात्म पावलेले आहेत. अशावेळेला धर्माच्या नावानं त्यांना बाजूला करणं हे चुकीचं आहे. राष्ट्र टिकवायचं असेल तर तुम्हाला ही पथ्यं पाळावीच लागतील. आणि



मानायला लागलो, तर परधर्मिय जे आहेत, तर राष्ट्र कसं निर्माण होणार? तर धर्म हा विषय, जसं शाहू महाराज म्हणाले, की हा वैयक्तिक विषय आहे. तो राष्ट्रीय विषय करू नका. राष्ट्रीय विषय हे वेगळे असले पाहिजेत. राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित असे राष्ट्रीय विषय असले पाहिजेत. आणि आज तर असं दिसतंय, की राष्ट्रीय एकात्मतेला सर्वात जर मोठा अडथळा कोणता असेल, तर धर्मवाद्यांचा आहे. म्हणजे माझाच धर्म खरा धर्म. माझाच धर्म श्रेष्ठ धर्म. बाकीचे या देशातले जे आहेत ते जणू काही दुय्यम दर्जाचे नागरिक आहेत. अशा प्रकारचा भाव काही वेळेला, काही लोकांच्याकडून व्यक्त होत असतो. तेव्हा हे राष्ट्र आपणाला हे केव्हा कळेल? आम्हाला काही लोक सांगतील, पण त्यांचा कावा माहित करून घ्यायचा असेल, तर आम्हाला स्वत:ला शहाणं व्हावं लागेल आणि त्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण. महात्मा फुलेंपासून कर्मवीर भाऊराव पाटलांच्यापर्यंत जे बहुजन समाजाचे नेते झाले, त्यांनी ९७ टक्के लोक कसे शहाणे होतील हे पाहिलं. कारण, ९७ टक्के लोक जेव्हा शहाणे होतात, त्यावेळेला देशही शहाणा होतो. ९७ टक्के लोक जेव्हा धर्मनिरपेक्ष वृत्तीनं वागतात, त्यावेळेला देश धर्मनिरपेक्ष होतो. आता लक्षात आलं असेल आपल्या, की आम्ही किती टक्के धर्मनिरपेक्ष आहोत. आम्ही किती टक्के राष्ट्रीय आहोत. आम्ही किती टक्के लोकशाहीवर श्रद्धा ठेवणारे

आहोत. आमचं राष्ट्र लोकशाहीवादी आहे हे समजायचं कसं. तुमची लोकशाही मूल्यांवर किती श्रद्धा आहे यावर तुमची लोकशाही अवलंबून आहे. सगळी जी मूल्यं आहेत, या मूल्यांवर राष्ट्र उभारलेलं आहे. केवळ राजकीय स्वातंत्र्य हे एक मूल्य झालं. राजकीय स्वातंत्र्य ही तशी फार महत्त्वाची गोष्ट आहे. पण केवळ राजकीय स्वातंत्र्य म्हणजे राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचा मार्ग हा पूर्णपणे प्रशस्त झालेला आहे असं नाही.

कारण, आता जवळजवळ पाऊणशे वर्षे होऊन गेली देशाला स्वातंत्र्य मिळून, तरीसुद्धा अनेक सामाजिक प्रश्न आम्ही सोडवू शकलेलो नाहीये. अजूनही आमच्यातला धर्मभेद, भेदभाव, जातीभेद हे दूर होऊ शकलेले नाहीत. ज्या प्रमाणात आम्ही जातीभेद नष्ट करू, ज्या प्रमाणात आम्ही अज्ञान नष्ट करू, ज्या प्रमाणात परस्परांमधला द्वेष, आसूया नष्ट करू त्या प्रमाणामध्ये हे राष्ट्र मजबूत निर्माण होणार आहे. मजबुतीचा विषय हा आमच्या राष्ट्रपुरूषांच्या कार्यक्रमपत्रिकेतला महत्त्वाचा विषय आहे हे लक्षात घ्या आणि म्हणून आम्ही या सर्वांना राष्ट्रपुरूष मानतो. ज्याप्रमाणं आम्ही दादाभाई नौरोजींना राष्ट्रपुरूष मानतो, त्याचप्रमाणं आम्ही न्यायमूर्ती रानडे, आगरकरांनाही राष्ट्रपुरूष मानतो. त्याचप्रमाणात आम्ही शाहू महाराजांना, महात्मा फुल्यांना, डॉ. आंबेडकरांना राष्ट्रपुरूष मानतो. त्यांनी राष्ट्रनिर्माण करण्यासाठी सगळं आयुष्य घालवलं, झिजले. ९७ टक्के लोकांच्या कल्याणाचा विचार ज्यांनी केला, राष्ट्राचा विचार ज्यांनी केला, ते खरे आमचे राष्ट्रपुरूष आहेत असं मला वाटतं.



या व्याख्यानमालेचा आता शेवट होत आहे. मी ही व्याख्यानमाला द्यावी आणि शाहू महाराजांच्या कार्याविषयी बोलावं आणि तरूण पिढीला शाहू महाराजांचं कार्य कसं होतं आणि आज आपण त्या कार्यातून काय घ्यायला पाहिजे, शाहू महाराज जिथपर्यंत गेले, तिथपर्यंत तरी आपण जाऊ शकतो का याचा थोडासा आत्मशोध चालू पिढीनं करावा ही भूमिका घेऊन खासदार सुप्रियाताई सुळे यांनी मला सूचना केली. त्या राजकारणामध्ये वावरणाऱ्या जरी असल्या, तरीसुद्धा पित्याचा वारसा त्यांनी चालवलेला आहे. पित्याचा वारसा म्हणजे राजकारणाचा वारसा मला म्हणायचं नाहीये, तर समाज प्रबोधनाचा वारसा. त्याची तिसरी पिढी आहे माझ्यादृष्टीनं. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आपल्याला दिसतंय, की यशवंतराव चव्हाणांची पहिली पिढी, दुसरी शरद पवारांची आणि तिसरी पिढी सुप्रियाताईंची. म्हणून मला असं वाटलं, की त्यांनी हा जो खटाटोप चालू केलेला आहे, त्याच्यामध्ये आपणही सहभागी व्हावं. त्यांच्या शब्दाला मान देऊन मी एक-दोन नव्हे, तर तेरा व्याख्यानं मी दिलेली आहेत. याचं श्रेय मी खासदार सुप्रियाताईंना देऊ इच्छितो आणि त्यांचं आभारही मानतो, की त्यांनी जर मला सांगितलं नसतं तर मी काय व्याख्यानं दिली असती असं मला वाटत नाहीये. मला आनंद काय आहे, की या व्याख्यानमालेची सुरूवात, ज्याला प्रास्ताविक म्हणू ते आमचे प्रेरक, आमचे मार्गदर्शक शरद पवार साहेब हे लाभल्यामुळं मला एकप्रकारचा हुरूप आला. त्यांचे आशीर्वाद, त्यांच्या शुभेच्छा आमच्या या सगळ्या उपक्रमाला लाभल्या आणि या सगळ्या पाठीमागं एकप्रकारे समाजप्रबोधनाची एक आच सुप्रियाताईंच्या ठिकाणी आहे. हा विचारांचा वारसा आहे हे लक्षात घ्या.

हा फुल्यांच्यापासून आहे. त्यातलाच एक धागा सुप्रियाताईंनी हातात घेतला आणि त्या धाग्यामध्ये आम्हाला सर्वांना, आमचे हरिभाऊ नरके, अशा सगळ्यांना या प्रबोधनाच्या मालिकेमध्ये सहभागी होता आलं. या सगळ्यामधून एक प्रकारचं समाजप्रबोधन होईल आणि समाजप्रबोधन ही काय एक दोन दिवसाची गोष्ट नाहीये. ही सातत्यानं करायची गोष्ट आहे. आणि म्हणून हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक टप्प्यामधील एक महत्त्वाचा टप्पा मी मानतो. पुन्हा एकदा सुप्रियाताईंना धन्यवाद देऊन, आणि ज्यांनी वर्षभर माझी ही व्याख्यानं ऐकली ते सर्व माझे रसिकप्रिय मित्र या सर्वांना धन्यवाद देऊन मी आपला निरोप घेतो. जयहिंद! जय महाराष्ट्र!!

**- समाप्त**

■■

# भारत-'क्वाड' आणि अन्य विभागीय राष्ट्रगट!

बिशंभर नाथ



अमेरिका, ऑस्ट्रेलिया, भारत आणि जपान या चार राष्ट्रांनी मिळून स्थापन केलेल्या 'क्वाड' या राष्ट्रगटाची नुकतीच टोकियो येथे शिखर परिषद झाली. करोनाच्या जागतिक पातळीवर घातलेल्या धुमाकूळानंतर आता कुठे आंतरराष्ट्रीय राजकारण पूर्ववत होण्यास सुरुवात झाली आहे. मात्र रशिया व युक्रेनदरम्यानच्या युध्दामुळे त्यात काहीसा अडथळा आलेला असला तरी हळूहळू स्थिती बदलत आहे. त्यामुळेच या चार राष्ट्रांच्या अलीकडेच स्थापन झालेल्या गटाच्या बैठकीतून होणाऱ्या फलनिष्पत्तीकडे लक्ष लागणे स्वाभाविक होते. हा राष्ट्रसमूह किंवा 'ऑकस' म्हणजेच ऑस्ट्रेलिया, अमेरिका व ब्रिटन यांनी स्थापन केलेला सामरिक राष्ट्रगट यांची स्थापना प्रामुख्याने चीनला वेसण घालण्याच्या हेतुने करण्यात आल्याची एक सर्वसाधारण जागतिक समजूत आहे. ती पूर्णपणे निराधार नाही. आशियातील चीनचा वाढता विस्तारवाद किंवा दक्षिण चिनी समुद्र आणि एकंदरीतच भारत-प्रशांत महासागरी विभागावर वर्चस्व मिळविण्यासाठी चीनने सुरु केलेल्या आक्रमक पवित्र्याला पायबंद घालणे हे प्रमुख उद्दिष्ट या राष्ट्रगटांच्या स्थापनेमागे आहे हे निर्विवाद आहे. त्यामुळेच मे महिन्यात झालेल्या या शिखर परिषदेकडे सर्वांचे लक्ष लागणे स्वाभाविक होते. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, ऑस्ट्रेलियाचे नवनिर्वाचित पंतप्रधान अँथनी अल्बानीज, जपानचे पंतप्रधान फुमिओ किशिदा हे जातीने हजर राहिले आणि त्यांच्यात जागतिक परिस्थितीवरही चर्चा झाली. निरीक्षकांच्या मते या राष्ट्रगटाच्या स्थापनेनंतर (२००७) प्रथमच टोकियेच्या शिखर परिषदेत नेमक्या अशा विषयांवर नुसती चर्चा झाली नाही तर प्रत्यक्षात कृति देखील करण्यात आली. यापूर्वी केवळ चर्चा किंवा युध्दाभ्यास आणि तात्कालिक मुद्यांवर या मंचावर चर्चा होत असे. यावेळी प्रत्यक्षातील देवाणघेवाण व सहकार्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला ही त्यातील महत्वाची फलनिष्पत्ती मानावी लागेल. सागरी लोकशाही देशांचा समूह असे त्याचे वर्णन केले जाते व त्यावरुनच या समूहाचा रोख कोणत्या 'लोकशाही नसलेल्या' देशाकडे आहे हे लक्षात यावे. अर्थात एवढे सगळे असले तरी थेट चीनचे नाव घेऊन संघर्षाची भूमिका घेण्याचे या समूहाने




**'क्वाड'च्या स्थापनेत अमेरिकेचा पुढाकार अधिक होता. याचे कारण त्यांना चीनच्या आर्थिक तसेच लष्करी व सागरी विस्तारवादाला पायबंद घालायचा होता. त्यासाठी सागरी विभागातील लोकशाही देशांच्या या गटाची त्यांनी स्थापना केली. 'लोकशाही निर्यात' हा अमेरिकेचा कायमस्वरुपी हुकमाचा एक्का राहिला आहे. या आधारेच त्यांनी पश्चिम आशियातील इराक व लीबिया या दोन देशात रक्तरंजित सत्तांतर घडवून आणून ते देश कायमस्वरुपी अमेरिकेवर अवलंबुन राहतील अशी सोय करुन ठेवली. इजिप्तमध्येही तो प्रयोग करण्याचा प्रयत्न अमेरिकेने केला होता पण तो अयशस्वी झाला. सीरियामध्येही अमेरिकेला अपयश आले. आता 'क्वाड'च्या निर्मितीमागील एक सूत्र सागरी लोकशाही देश हे आहे. राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर बायडेन यांना सूर गवसताना आढळत नव्हते. त्यांनी रशियाबरोबर संघर्षाची भूमिका घेताना चीनबाबत तुलनेने काहीसे किंचित मवाळ धोरण अवलंबिले. परंतु त्यामध्ये द्विपक्षीय संबंधांचा भाग अधिक होता.**


टाळले आहे.

२३ व २४ मे रोजी झालेल्या या टोकियो शिखर संमेलनात काय घडले याचा प्रथम आढावा घेऊ. इंडो पॅसिफिक किंवा भारत-प्रशांत महासागरी विभाग हा मुक्त, खुला, सर्वसमावेशक आणि मुकाबल्याची क्षमता असलेला असा स्थापन करण्याच्या बांधिलकीचा या परिषदेत पुनरुच्चार करण्यात आला. त्याचप्रमाणे लष्करी, आर्थिक व राजकीय दडपशाहीच्या कोणत्याही प्रकारापासून मुक्त अशा देशांची आंतरराष्ट्रीय नियमांवर आधारित जागतिक घडी निर्माण करण्याच्या बांधिलकीवरही परिषदेत पुन्हा एकदा भर देण्यात आला. करोना-मुक्ततेसाठी औषध व लसीच्या देवाणघेवाण व परस्पर साह्यावरही चारही देशांचे एकमत

झाले. भारत-प्रशांत महासागरी विभागात पायाभूत क्षेत्राच्या मदतीसाठी पुढील पाच वर्षात पन्नास अब्ज डॉलर्सचा निधि देण्याचा निर्णय बैठकीत करण्यात आला. याखेरीज 'क्लायमेट चेंज' म्हणजेच पर्यावरणीय असमतोल व वातावरण बदलांना सरावताना किंवा त्यांच्याशी जुळवून घेतानाच त्यावरील

गणित या चार विषयांमधील विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती असेल.

या परिषदेतच 'इंडो-पॅसिफिक इकनॉमिक फ्रेमवर्क फॉर प्रास्पेरिटी'ची स्थापना करण्यात आली. नावाप्रमाणेच या विभागातील देशांमधील समृध्दी वाढविण्याच्या उद्देशाने



निवारणासाठीच्या योजनेचा प्रारंभ यानिमित्ताने करण्यात आला. 'क्यू चँप' म्हणजेच 'क्वाड - क्लायमेट चेंज ॲडाप्शन ॲंड मिटिगेशन पॅकेज' असे त्या योजनेचे नाव आहे. याच्याच जोडीला साऱ्या जगाला भेडसाविणाऱ्या सायबर सुरक्षेच्या मुद्याचीही दखल घेण्यात येऊन इंडो-पॅसिफिक म्हणजेच भारत-प्रशांत महासागरी विभागात सायबर सुरक्षा क्षमता उभारण्यासाठी भागीदारीचा निर्णय करण्यात आला. सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनिअरिंग व मॅथमॅटिक्स या चार विषयांची अद्याक्षरे घेऊन 'स्टेम' या नावाने शंभर शिष्यवृत्त्या देण्याचा निर्णयही परिषदेत करण्यात आला. या चार देशातील शंभर विद्यार्थ्यांची या शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येईल व त्यांना अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये शिक्षण दिले जाईल. वर उल्लेख केल्याप्रमाणे विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि

या आर्थिक समूहाची स्थापना करण्यात आली. यामध्ये 'क्वाड' मध्ये सामील चार देश आणि अग्नेय आशियातील नऊ देशांचा समावेश आहे. या देशांना विशेष निमंत्रित म्हणून या परिषदेला बोलाविण्यात आले होते. इंडोनेशिया, ब्रुनेई, दक्षिण कोरिया, सिंगापूर, फिलिपिन्स, मलेशिया, न्यूझीलंड, थायलंड आणि व्हिएतनाम या देशांचा यात समावेश होता. व्यापार, पुरवठा साखळ्या(सप्लाय चेन्स), प्रदूषण विरहित ऊर्जा व कार्बनमुक्तता(डीकार्बनायझेशन) आणि पायाभूत क्षेत्र(इन्फ्रास्ट्रक्चर) ही चार क्षेत्रे आधारभूत मानण्यात आली आहेत. या माध्यमातून कर व भ्रष्टाचाराविरुध्द पावले उचलणे, अडचणींशी मुकाबला करतानाच टिकाव धरणे, सर्वसमावेशकता, आर्थिक विकासवाढ, खुलेपणाबरोबरच स्पर्धात्मकता यांना प्रोत्साहन देण्याचे या देशांनी ठरविले

आहे. ही केवळ या नव्या राष्ट्रसमूहाची रूपरेषा होती. प्रत्यक्ष ते सर्व अमलात येण्यास आणखी काही काळ जाणे अपेक्षित आहे. स्थूलमानाने या परिषदेत ही फलनिष्पत्ती होती असे म्हटता येईल.

अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी या परिषदेच्या निमित्ताने तैवानच्या विषयावर काहीशी आक्रमक टिप्पणी केली. 'क्वाड'ची स्थापना ही भारत-प्रशांत महासागरी विभागात शांतता, समृध्दी आणण्याच्या हेतुने झाल्याचे सांगितले जात असले तरी या विभागात चीनचा प्रभाव वरचष्मा कमी करणे हे त्यामागील गुप्त उद्दिष्ट सर्वांनाच माहिती आहे. त्यामुळे बायडेन यांनी जेव्हा तैवानला प्रसंगी चीनच्या विरोधात शस्त्रास्त्रांसह सर्व ती मदत करण्याचे विधान केले तेव्हा या परिषदेला चीनविरोधाचे स्वरुप आपोआपच प्राप्त झाले होते. परराष्ट्रसंबंधांबाबत या राष्ट्रसमूहात आधीच तट आहेत आणि त्यामुळे बायडेन यांच्या विधानामुळे व त्यावरील चीनच्या तीव्र प्रतिक्रियेचे सावंट परिषदेवर आले. रशियाबाबतही भारताची भूमिका अन्य तीन राष्ट्रांपेक्षा भिन्न



आहे. भारताने या संघर्षात साथ दिलेली आहे. त्याचबरोबर चीनबरोबर भारताचे व्यापारी व आर्थिक संबंध लडाख-पेचप्रसंगानंतरही सुरळीत चालू आहेत. भारत, रशिया व चीन हे शांघाय कोऑपरेशन आणि ब्रिक्स या राष्ट्रसमूहातील प्रमुख घटक देश आहेत. 'आसिआन' राष्ट्रसमूहाचा भारत एक प्रमुख भागीदार देश आहे. थोडक्यात 'क्वाड'मधील प्रत्येक सदस्यराष्ट्राच्या परराष्ट्रविषयक संबंधांबाबत विशिष्ट अशा मर्यादा असल्याने त्या मर्यादित चौकटीतच या देशांना या नव्याने स्थापन राष्ट्रसमूहाचे कामकाज चालवावे लागणार असल्याचे या परिषदेच्या निमित्ताने स्पष्ट झाले. त्यामुळेच चीनबद्दल किंवा रशिया-युक्रेन संघर्षाबाबतही परिषदेतर्फे जारी संयुक्त निवेदनात मौन बाळगण्यात आले. पुढील महिन्यातच 'ब्रिक्स' (ब्राझील, रशिया, भारत, चीन व दक्षिण आफ्रिका) या राष्ट्रसमूहाची शिखर परिषद आहे आणि त्यातही भारताचे पंतप्रधान सामील होणार आहेत व त्याची छायाही 'क्वाड'वर कायम राहणार आहे.

'क्वाड'च्या स्थापनेत अमेरिकेचा पुढाकार अधिक होता. याचे कारण त्यांना चीनच्या आर्थिक तसेच लष्करी व सागरी विस्तारवादाला पायबंद घालायचा होता. त्यासाठी सागरी विभागातील लोकशाही देशांच्या या गटाची त्यांनी स्थापना केली. 'लोकशाही निर्यात' हा अमेरिकेचा कायमस्वरुपी हुकमाचा एक्का राहिला आहे. या आधारेच त्यांनी पश्चिम आशियातील इराक व लीबिया या दोन देशात रक्तरंजित सत्तांतर घडवून आणून ते देश कायमस्वरुपी अमेरिकेवर अवलंबुन राहतील अशी सोय करुन ठेवली. इजिप्तमध्येही तो प्रयोग करण्याचा प्रयत्न अमेरिकेने केला होता पण तो अयशस्वी झाला. सीरियामध्येही अमेरिकेला अपयश आले. आता 'क्वाड'च्या निर्मितीमागील एक सूत्र सागरी लोकशाही देश हे आहे. राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर बायडेन यांना सूर गवसताना आढळत नव्हते. त्यांनी रशियाबरोबर संघर्षाची भूमिका घेताना चीनबाबत तुलनेने काहीसे किंचित मवाळ धोरण अवलंबिले. परंतु त्यामध्ये द्विपक्षीय संबंधांचा भाग अधिक होता. विविध विभागीय






राष्ट्रसमूहांच्या पातळीवर मात्र अमेरिकेने चीनला घेरण्याचेच धोरण राखले. त्यासाठी भारताला आपल्या अधिकाधिक कह्यात घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न चालविले. क्वाडच्या माध्यमातून तसेच नव्याने स्थापन 'इंडो-पॅसिफिक इकनॉमिक फ्रेमवर्क फॉर प्रॉस्परिटि'च्या माध्यमातूनही आशियाई देशांना स्वतःबरोबर ठेवण्याचा प्रयत्न चालविला आहे. अमेरिकेने आशिया व विशेषतः पूर्व व अग्नेय आशियाकडे दुर्लक्ष केलेले नाही हे दाखविण्याचाही हा अमेरिकेचा प्रयत्न होता.

जगात विविध विभागात वेगवेगळे असे विभागीय राष्ट्रगट स्थापन आहेत. यातील काही आर्थिक, व्यापारी स्वरुपाचे आहेत तर काही सामरिक महत्वाचे आणि लष्करी स्वरुपाचे देखील आहेत. परंतु यासाठी अनेक राष्ट्रांना परराष्ट्र संबंधांबाबत तारेवरची विलक्षण कसरत करावी लागत आहे. भारताच्या दृष्टिकोनातून याकडे पाहता ही तारेवरची कसरत विशेषत्वाने लक्षात येईल. वर उल्लेख केल्याप्रमाणे केवळ आशियाचाच विचार करायचा झाल्यास आणि विशेषतः अशिया-पॅसिफिक विभागाचा विचार करता अनेक राष्ट्रसमूह सक्रिय आहेत. वर उल्लेख केल्याप्रमाणे 'ब्रिक्स' आहे. 'आसिआन'(असोसिएशन ऑफ साऊथ-ईस्ट नेशन्स) हा दहा अग्नेय आशियाई राष्ट्रांचा समूह आहे. यामध्ये इंडोनेशिया, लाओ (लाओस), व्हिएतनाम, कंबोडिया, ब्रुनेई, मलेशिया, फिलिपन्स, सिंगापूर, थायलंड, म्यानमार यांचा समावेश आहे. आता क्वाडच्या पुढाकाराने जो नवा राष्ट्रगट स्थापन झाला आहे त्यात सामील नऊ राष्ट्रे ही आसिआनचे सदस्य आहेत. आणखी एक महत्वाचा विभागीय राष्ट्रसमूह सध्या अस्तित्वात आहे त्याचे नाव 'आरसेप' किंवा 'रिजनल कॉंप्रिहेन्सिव्ह इकनॉमिक पार्टनरशिप' असे त्याचे नाव आहे. यामध्ये चीन आणि अन्य १४ देश सामील आहेत. यापैकी दहा देश हे 'आसिआन'चे सदस्य देश आहेत. याखेरीज ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, जपान, दक्षिण कोरिया हे चार देशही सामील आहेत. याच्याच जोडीला 'शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन' - 'एससीओ' ही देखील मध्य आशियाई गणराज्ये आणि रशिया, चीन, भारत, पाकिस्तान यांचा समावेश असलेली संघटना किंवा राष्ट्रसमूह आहे. हे सर्व विभागीय व बहुसदस्य राष्ट्रगट आहेत. यांचे परस्परांशी संबंध आणि यांच्या सदस्य राष्ट्रांना या समूहाचे हितसंबंध सांभाळतानाच द्विपक्षीय व बहुस्तरीय संबंध सांभाळणे ही तारेवरची कसरत आहे. क्वाडमध्ये भारताने रशियाच्या विरोधात न जाण्याची तसेच चीनला अधिक न डिवचण्याची भूमिका घेऊन आपल्या परराष्ट्रीय हितसंबंधांची जपणूक केली ही स्वागतार्ह बाब मानावी लागेल.त्यामुळे या विभागीय राष्ट्रसमूहांचे किंवा नव्याने स्थापन झालेल्या समूहांचे स्वरुप प्रतीकात्मक मानायचे की काय असाही प्रश्न तज्ज्ञांतर्फे केला जातो.

अस्पष्ट किंवा स्थूल स्वरुपाचे उद्दिष्ट समोर ठेवून केवळ वरवर दाखविण्यासाठी म्हणजेच उथळ प्रकारे एखादी संघटना किंवा राष्ट्रगट स्थापन करण्यात आल्यास त्याची फलनिष्पत्ती नगण्य राहतेच पण कालांतराने ते निष्क्रिय होऊन अवशेष किंवा केवळ नावापुरते राहतात. 'सार्क' राष्ट्रसमूहाची अशीच अवस्था झाली आहे. 'सार्क' मधून पाकिस्तानला वगळण्यासाठी 'बिमस्टेक' राष्ट्रसमूहाची स्थापना करण्यात आली. अफगाणिस्तानवर तर अनेक देशांनी पुढाकार घेऊन विविध गट स्थापन केले परंतु अमेरिकेच्या मदतीने तालिबानने अफगाणिस्तानवर पुन्हा कब्जा केल्यानंतर आणि पुन्हा आपली पकड घट्ट केल्यानंतर कुणाचेच काही चालेनासे झाले आहे आणि केवळ वरवरचे संबंध चालू ठेवण्यात येत आहेत. अन्यथा अफगाणिस्तानात महिला व मानवाधिकारांचे जे उल्लंघन चालू आहे त्याबाबत कुणाला फारशी माहिती कळेनाशी झाली आहे किंवा कुणी त्यात



पडू इच्छित नसावे अशी स्थिती आहे. 'क्वाड'च्या स्थापनेत असाच काहीसा दोष आढळतो. असे सांगितले जाते की अमेरिकेने युक्रेनला त्यांचे रशियाबरोबर युध्द सुरु झाल्यानंतर तीन महिन्यात सुमारे ५४ अब्ज डॉलर्सची मदत केली आहे. यामध्ये लष्करी मदतीसह इतरही सर्व साह्यांचा समावेश आहे. परंतु 'क्वाड'तर्फे १०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देतानाही ती खासगी मदतीने करण्याची तरतूद आहे. तर पुढील पाच वर्षात भारत-प्रशांत महासागर विभागात पायाभूत क्षेत्र विकास व गुंतवणुकीसाठी केवळ पन्नास अब्ज डॉलर्सच्या साह्याची घोषणा म्हणजे चेष्टा आहे असे तज्ञांचे मत आहे. एकीकडे चीनसारख्या देशाला नियंत्रणात ठेवण्याची भाषा करायची आणि दुसरीकडे त्यासाठी आर्थिक तरतूद करताना हात आखडता घ्यायचा असा दुटप्पीपणा करण्याचे कारण काय असा प्रश्न केला जातो. याचाच अर्थ अमेरिकेसारखा देश देखील पूर्ण ताकदीनिशी यात सहभागी झालेला आहे असे मानता येणार नाही तर अर्धवट भावनेनेच त्यांचा यात सहभाग असावा असे अनुमान काढल्यास ते वावगे ठरणार नाही. 'क्वाड'च्या उद्देशपत्रिकेत लष्करी सहकार्य आणि संयुक्त सराव मोहिमा, युध्दसराव यांचा समावेश आहे. परंतु अमेरिकेने अचानक 'ऑकस'ची स्थापना करुन क्वाडच्या सामरिक सहकार्याची बाबच मर्यादित करुन टाकली आहे. त्यामुळेही आंतरराष्ट्रीय घडामोडीच्या अभ्यासकांपुढे ते एक कोडे झाले आहे. त्याचबरोबर सायबर सुरक्षेचा विषय असो किंवा व्यापार व आर्थिक संबंधांबाबत जी स्पष्टता राष्ट्रसमूहात असावी ती नसल्याचे सर्वसाधारण मत आहे. सायबर सुरक्षेबाबत केवळ परस्पर सहकार्य आणि समन्वयाची गोष्ट करण्यात आलेली आहे. परंतु त्याबाबत काहीतरी ठोस स्वरुपाची नवी योजना आखण्यात आलेली नसल्याने केवळ रुळलेल्या व चाकोरीबध्द स्वरुपातच या राष्ट्रसमूहाने काम करण्याचे ठरविलेले असावे असे दिसून येते.

भारताचा या राष्ट्रसमूहातील समावेश हा अमेरिकेमुळे आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही कारणाने का असेना चीनने लडाखमध्ये जी आगळीक केली त्यासंदर्भात त्यांनी संबंध सुधारणे आणि सीमाभागात यथास्थिती निर्माण करण्याबाबत अंशतः पावले उचलली आहेत. अद्याप हा पेच पूर्णत्वाने सुटलेला नाही. तरीही त्याचा अर्थ भारताने अमेरिकेच्या मांडीवर जाऊन बसणे हा होत नाही. नको इतके अमेरिकेच्या कच्छपि लागणे आणि केवळ चीनला खिजविण्यासाठी त्यांच्या कळपात सामील होण्यामुळे भारताच्या सत्तर वर्षातील स्वतंत्र परराष्ट्रनीतीला छेद दिल्यासारखे होईल. वर्तमान राज्यकर्त्यांनी तशी खबरदारी घेतल्यास गोष्टी सुरळीत राहतील. अन्यथा अमेरिकेच्या मांडलिकत्वाचा धोका भेडसावल्याखेरीज राहणार नाही!

■■

# जाता... जाता...

**गहिनीनाथ**

**ऐका हो ऐका!!!** अमेरिकेच्या परराष्ट्र विभागातर्फे प्रकाशित आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्यविषयक अहवालात(२०२१) भारतात अल्पसंख्यक समाजांवर होणाऱ्या अत्याचाराबद्दल ठपका ठेवण्यात आला आहे. हा अहवाल अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री अँटनी ब्लिंकेन यांनी प्रकाशित केला. भारतात धार्मिक अल्पसंख्यक समाजाला कोणत्या प्रकारे त्रास, छळ व भेदभावाच्या वागणउकीला तोंड द्यावे लागते याचे प्रसंग या अहवालात समाविष्ट करण्यात आले असून भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीत समानता, समता व बंधुभाव, सामाजिक सलोख्याच्या तत्वाला हरताळ फासला जात असल्याचे म्हटले आहे. अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि चीन प्रमाणेच भारतातही महिला व अल्पसंख्यक समाजाला






हल्ल्यांचे लक्ष्य केले जाते असे ब्लिंकेन यांनी या प्रसंगी वक्तव्य केले आहे.

अहवालात चीनबरोबर भारताची तुलना करताना चीन ज्याप्रमाणे (तिबेट, उइघुर मुस्लिम - सिंकियांग प्रांत)वांशिक किंवा धार्मिक अल्पसंख्याकांना भेदभावाची वागणूक देऊन त्यांना सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत करणे, उफजीविकेची साधने त्यांना नाकारण्याचे प्रकार करीत आहे तसेच प्रकार भारतात घडताना दिसत आहेत.

यात अवास्तव काय आहे?

मुस्लिम फेरीवाले, दुकानदार किंवा मुस्लिम दुकाने व विक्रेते यांच्याकडून माल व वस्तुंची खरेदी करु नका असे फतवे अनेक ठिकाणी काढले जात आहेत. त्याच्या बातम्या प्रसिध्द होतात तेव्हा ते नजरेत येते. त्यामुळे त्याचा उल्लेख आंतरराष्ट्रीय अहवालात झाल्यास पोटात दुखण्याचे कारण नाही. आधी स्वतःचे घर नीट राखायला शिकले तर बाहेरच्यांना बोटे घालायला जागा मिळत नाही.

परंतु वर्तमान राजवटीला हे शहाणपण यायचे आहे! तोपर्यंत भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा मलिन होतच राहणार!



भूक निर्देशांक, कुपोषण, बेकारी, मानव विकास निर्देशांक, माध्यमांची गळचेपी या सर्वच आघाड्यांवर भारताचा क्रमांक आंतरराष्ट्रीय क्रमवारीत खाली घसरलेला आहे. त्यात सुधारणा करण्यासाठी आत्मपरीक्षण करावे लागेल, दादागिरी किंवा कोडगेपणा

नव्हे!

दिल्लीच्या सरकारमधील आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन यांच्यावर कथित हवाला मामल्यात कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे राजकीय गदारोळ उडणे अपेक्षितच होते. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी तत्काळ पत्रकार

त्यांना आत टाकण्याच्या तयारीत आहे!

यातला विनोदाचा भाग सोडा. दिल्लीचे सरकार कोणती ना कोणती कारणे खोदून अस्थिर करण्यासाठी केंद्र सरकार जंगजंग पछाडत आहे.

दिल्लीचा व्याप व महानगरीय स्वरुप लक्षात घेऊन



परिषद घेऊन जैन यांच्या 'स्वच्छते'चे गुणगान गायिले. त्यांना पद्मविभूषण सारखा पुरस्कार मिळायला हवा इतके ते सचोटीचे आहेत असे प्रमाणपत्रही त्यांनी दिले.

आता जैन जर एवढे सचोटीचे असतील तर मग त्यांना देशातला दुसऱ्या क्रमांकाच नागरी पुरस्कारच का?

भारतरत्न का नाही?

पण केजरीवाल हुशार आहेत. बहुधा भारतरत्न त्यांनी स्वतःसाठी राखीव ठेवले असावे!

नेत्याची बुध्दी व मेंदू किती तल्लख असतो आणि कसा चालतो याचा हा नमूना नाही का?

सत्येंद्र जैन यांच्या समर्थनासाठी आणि त्यांच्यावरील कारवाई अनुचित, बेकायदेशीर व सूडबुध्दीने केल्याचे

सांगण्यासाठी केजरीवाल यांनी विशेष पत्रकार परिषद घेतली.

................आणि हो जाताजाता असाही एक बाँब टाकला की केंद्र सरकार आता दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्याविरुध्दही काहीतरी कारवाई करुन

या अवाढव्य शहराचा कारभार तीन नगरपालिकांमध्ये विभागण्यात आला होता.

आता केंद्र सरकारने या तिन्ही नगरपालिकांचे अस्तित्व खतम करुन एकच महानगरपरिषद करण्याचे ठरविले आहे.

केंद्र सरकारचे हुकूम पाळणारा प्रशासकही नेमलेला आहे. या तीन नगरपालिकांच्या निवडणुका होणार होत्या पण त्यापूर्वीच ही नगरपालिकांना मूठमाती देण्याची कारवाई करुन टाकण्यात आली आहे. आता त्याजागी नवीन कोणती संस्था अस्तित्वात येणार, संभाव्य महानगरपरिषद कधी अस्तित्वात येणार, तिची निवडणूक कधी होणार हे सर्व प्रश्न अधांतरी – अनिर्णित अवस्थेत लोंबकळत आहेत.

परंतु केंद्र सरकारला त्याची फिकिर पडलेली नाही.

केजरीवाल सरकारला सळो की पळो कसे करुन सोडायचे याच्या काड्या करण्यातच ते मग्न आहे.

आता जरा देशातल्या इतर राज्यात भ्रमंती करु यात!

आम आदमी पार्टीचाच विषय निघाला आहे तर पंजाबमधील त्यांच्या नव्या सरकारची काय हालहवाल





आहे पाहू.

त्रिशूळ सिनेमा आठवतो का?

त्यात एक डायलॉग आहे.

ये कॉलनी बनेगी जरूर, मगर बसेगी नही!

अमिताभ बच्चन यांच्या संवादफेकीमुळे तो लक्षात राहतो.

सध्याचे केंद्र सरकार आहे त्यांची कार्यशैली लक्षात येण्यासाठी हा डायलॉग समजावून घ्यावा लागेल.

एखाद्या राज्यात मतदारांनी भाजप ऐवजी इतर पक्षांना बहुमत दिले तर भाजप आणि संघ परिवार काय करु शकतो त्याचे पंजाब हे उदाहरण आहे. पंजाबमध्ये मतदारांनी आम आदमी पार्टीला प्रचंड बहुमत दिले. पंजाबमध्ये भाजपचे अस्तित्व नगण्य आहे. तरीही आम आदमी पार्टी उर्फ 'आप'ला मतदारांनी निवडल्याची खदखद केंद्र सरकारमध्ये असणारच!

आपली ही खदखद बाहेर कशी काढायची?

मग काड्या सुरु!

अचानक पंजाबमध्ये खलिस्तानवाद्यांचा उपद्रव वाढल्याच्या बातम्या पाळीव माध्यमांमार्फत पेरायला सुरुवात करायची. याकामी देशाच्या म्हणजेच राष्ट्रीय सुरक्षेला जबाबदार असलेली मंडळी या कामात तरबेज असतात आणि त्यांच्या हुकमानुसार पाळीव माध्यमे त्यांचे काम चोखपणे करीत राहतात. पंजाबला खलिस्तानवाद्यांच्या नावाने बदनाम करीत सुटायचे.

आता नुकतीच एका लोकप्रिय पंजाबी गायकाची हत्या झाली.

ती आताच का व्हावी?

त्याबद्दलचा प्राथमिक संशय तिहार जेलमध्ये बंद असलेल्या एका 'डॉन'वर असल्याचे सांगण्यात आले.

तिहार तुरुंग दिल्लीत आहे. दिल्लीतील कायदा व सुव्यवस्था आणि पोलिस केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अधिकारात येतात.

जर एखादा डॉन तुरुंगातून गुन्ह्यांची सूत्रे हलवीत असेल आणि आपल्या साथीदारांना कुणाचा खून करण्यासाठी आदेश देत असेल तर एकंदर तुरुंग प्रशासन व दिल्ली पोलिसांच्या कार्यक्षमतेला ते आव्हान आहे. ही सर्व सूत्रे हलविण्यासाठीच्या सुविधा त्याला कुठून पुरविल्या जातात? त्या हलगर्जीपणाला जबाबदार कोण? जे जबाबदार असल्याचे शाबित होईल त्यांना शिक्षा होणार काय? असे अनेक प्रश्न या निमित्ताने विचारता येण्यासारखे आहेत. त्याची उत्तरे कोण देणार? केंद्रीय गृहमंत्रालय यासाठी उत्तरदायी आहे.



पण हा एक अपराध झाला.

यामागील एकंदर डाव किंवा योजना काय?

पंजाब सरकारला सुखासुखी राज्यकारभार करु द्यायचा नाही.

यासाठी पंजाबमध्ये कशी परिस्थिती हाताबाहेर चालली आहे याच्या कथा-कहाण्या पाळीव माध्यमांना पुरवायच्या आणि वातावरण सतत खदखदते ठेवायचे ही या

मंडळींची विशेष रणनीती आहे.

महाराष्ट्रात हेच चालू आहे.

पश्चिम बंगाल, केरळ, झारखंड........ जेथे जेथे बिगर भाजपची सरकारे आहेत तेथेतेथे अशांतता, अस्थिरता निर्माण करुन तेथील सरकारला नीटपणे राज्यकारभार करु द्यायचा नाही हे या रणनीतीचे सूत्र आहे आणि यामागील सूत्रधारांची नावे सांगण्याचीही गरज नाही.

आता तुम्हाला त्रिशूळ मधल्या डायलॉगचा अर्थ समजला?

प्रथम स्वतःचे सरकार स्थापन कसे होईल हे पहायचे, त्यासाठी घोडेबाजार करायलाही मागेपुढे पहायचे नाही.



ते जमले नाही आणि विरोधी पक्षाचे सरकार स्थापन झालेच तर त्याला रोजच्यारोज कटकटी निर्माण करुन बेजार व त्रस्त करायचे. मग त्या आधारावर त्या सरकारच्या विरोधात बातम्या पेरुन व पसरवून बदनाम करुन त्यांना सळो की पळो करुन सोडायचे अशी ही 'कूटनीती' आहे. यामागे कोणीतरी 'त्रिकूट' आहे एवढे मात्र खरे!






तेव्हा हे राष्ट्रीय षड्यंत्र समजावून घ्या! सावध व्हा!

आता जाऊ काश्मीरमध्ये!

नोटाबंदीमुळे दहशतवाद बंद होणार असल्याचे ब्रह्मांडनायकांनी यासंबंधीची घोषणा करताना देशाला बजावले होते.

बनावट नोटांचा प्रश्नही निकालात निघेल अशी बढाई पण मारली होती. त्यानंतर लगेचच काश्मीरमध्ये दहशतवादी घटना झाली आणि दहशतवाद्यांकडे चक्क नव्या कोऱ्या दोन हजार रुपयांच्या नोटा सापडल्या होत्या.

त्यानंतर काश्मीरला विशेष दर्जा देणारी कलमे – ३७० आणि ३५(अ) ही घटनेतून काढून टाकल्यानंतर काश्मीरमध्ये नंदनवन अवतरणार असल्याचे दावे संसदेच्या पटलावरही सांगण्यात आले. शिवाय या राज्याची दोन तुकड्यात विभागणीही केली.

आता गेल्या काही दिवसांपासून काश्मीरमध्ये पुन्हा हिंदू पंडितांना टार्गेट करण्यास प्रारंभ झाला आहे. त्याचबरोबर काश्मीर खोऱ्यात नोकरीसाठी बाहेरुन येणाऱ्यांवरही हल्ले सुरु झाले आहेत. त्यात एका बँकेचा राजस्थानी बँक व्यवस्थापकाची हत्या करण्यात आली आहे.

काश्मीर खोऱ्यातून पुन्हा पंडितांचे जम्मूकडे स्थलांतर सुरु झाल्याच्या बातम्या प्रसारित होऊ लागल्या आहेत.

या बातम्यांचे तपशील सर्वांनाच वाचायला मिळाले आहेत. परंतु स्वतःच्या मनाप्रमाणे आणि जोरजबरदस्तीने, काश्मिरी लोकांना किंवा त्यांच्या लोकप्रतिनिधींना अटकेत टाकून निषेधाचा स्वरही उमटणार नाही याची खबरदारी




घेऊन ही कलमे रद्द करणारी विधेयके संसदेत बहुमताच्या जोरावर मंजूर करण्यात आली.

प्रत्यक्षात काय चालू आहे.

काश्मीर खोऱ्यात आता लवकरच सर्व काही आलबेल होईल असा दावा 'सरदार पटेल क्रमांक २' उर्फ अमित शहा यांनी ही कलमे रद्द करताना ५ ऑगस्ट २०१९ रोजी केला होता.

पण या सर्व बढायांचे झाले काय?

आता तर रोजच्या रोज हत्या होऊ लागल्या आहेत.



हा प्रदेश आता केंद्रशासित आहे त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी केंद्र सरकारवर येते. पोलादी पुरुष क्रमांक २ अमित शहा यांच्यावरच ती येते. मग आता ते काय करणार? या अपयशाची जबाबदारी घेणार की हे निमित्त करुन मुस्लिमांवर आणखी दडपशाही करणार? कारण अशा घटनांचे खापर दहशतवाद्यांवर न फोडता मुसलमानांवर फोडायचे आणि आख्ख्या मुसलमानांना जबाबदार ठरवून त्यांचा छळ करण्याचे तंत्र सत्ताधीश नेहमीच अवलंबीत असतात. त्याची पुनरावृत्ती होणार काय आणि काश्मीरमधील निरपराध मुस्लिमांना त्याची सजा देण्याचे काम सुरु होणार काय?

हे प्रश्न बोचरे जरूर वाटतील पण गेल्या आठ वर्षात अल्पसंख्यक समाजाला पध्दतशीरपणे मुख्य प्रवाहापासून अलग करण्याचे , वेगळे पाडण्याचे आणि भेदभावाचे प्रकार सुरु आहेत. त्यामुळे मूठभर दहशतवाद्यांची सजा निरपराध मुस्लिम समाजाला भोगावी लागते. त्यामुळे हा एखाद्या व्यापक योजनाबध्द

डावाचाच एखादा भाग नव्हे ना अशी शंका आल्याखेरीज रहात नाही.

बंदुकीच्या जोरावर समाजाला नमवता येत नसते हा जगाचा इतिहास आहे.

परंतु राज्यकर्ते सत्ता व अधिकाराने अंध होतात तेव्हा ही भाषा बोलू लागतात.

काश्मीरमधील परिस्थिती पुन्हा स्फोटक आणि अनिश्चित दिशेने जाऊ लागली आहे.

पुढे काय हे एक भले मोठे प्रश्नचिन्ह आहे.

कधीतरी का होईना एखादे अघटित घडतेच!

बिहारमध्ये मुख्यमंत्री नीतीशकुमार यांनी जातीवर आधारित जनगणनेचा आग्रह धरुन सर्वपक्षीय बैठक घेतली. बहुतेक पक्षांनी या कल्पनेस पाठिंबा दिला. प्रमुख विरोधी पक्ष राष्ट्रीय जनता दलाने देखील या कल्पनेस पाठिंबा दिला.

राष्ट्रीय जनता दलानेही ही कल्पना उचलून धरली.

जातीवर आधारित जनगणनेला भाजपने धोरणात्मक विरोध केला आहे आणि तशा पध्दतीने जनगणना करता येणार नाही असे सांगून ती कल्पनाही फेटाळून लावली आहे.

परंतु आश्चर्याची बाब म्हणजे बिहारच्या भाजप प्रदेश शाखेने मात्र पक्षाच्या अधिकृत व राष्ट्रीय भूमिकेच्या विरोधात

जाऊन नीतीशकुमार यांनी केलेल्या प्रस्तावाला म्हणजेच बिहारमध्ये जातींवर आधारित जनगणना करण्याच्या कल्पनेस पाठिंबा जाहीर केला.

हे कसे घडले हे कुणालाच माहिती नाही. परंतु बिहारमधील भाजप व नीतीशकुमार सरकारच्या स्थिरतेचा मुद्दा लक्षात घेऊन हा निर्णय केला असावा व प्रदेश भाजपला वेगळी भूमिका घेण्यास सांगितले असावे असे समजते.

बिहारमधील भाजपचे वरिष्ठ नेते व सध्या राज्यसभेत



असलेले सुशीलकुमार मोदी हे ओबीसी नेते आहेत आणि भाजपचे तालेवार नेते आहेत. ते या जातींवर आधारित जनगणनेच्या बाजूने सुरुवातीपासून होते. त्यामुळे त्यांची भूमिका यामध्ये निर्णायक राहिली असावी.

या प्रकरणी नीतीशकुमार यांनी दिल्लीत सर्वपक्षीय शिष्टमंडळासह येऊन पंतप्रधानांना निवेदन दिले.

त्यानंतर मागण्या होतच राहिल्या.

अचानक अलीकडेच नीतीशकुमार यांनी जर राष्ट्रीय पातळीवर जातीवर आधारित जनगणना शक्य नसेल तर आपण बिहार राज्याच्या पातळीवर ती करु अशी घोषणा केली. सर्वपक्षीय बैठक बोलावूनच त्यांनी हा निर्णय जाहीर केला. त्याला सामाजिक न्यायाच्या पक्षांनी पाठिंबा दिला व

पण परिस्थितीनुसार रंग बदलण्याचे भाजपचे कसब आणि कौशल्य या निमित्ताने पुन्हा एकदा समोर आले!

■■




# या बदलाचे रहस्य काय?

'वज्रकठोर'!!!

देशाचे पंतप्रधान, त्यांची प्रतिमा आणि त्यांच्या राजवटीसाठी वरील विशेषण अनेकजण लावत असतात.

सहसा आणि सहजासहजी कुणाच्या दबावाला बळी न पडणे हे त्यांचे वैशिष्ट्य! अगदी नोटाबंदीचेच उदाहरण घ्या ना!

या निर्णयामुळे लोकांचे - सामान्यजनांचे अतोनात आणि अमाप हाल झाले. नोटा बदलण्यासाठीच्या रांगेत उभे राहून मृत्यु येणाऱ्यांची संख्या दीडशेच्या आसपास झाली. या निरपराधांच्या विनाकारण मृत्युला जबाबदार कोण?

..............नोटाबंदी करणारेच ना?

दोन महिन्यात परिस्थिती सुरळीत झाली नाही तर मला भर चौकात शिक्षा करा असे जाहीरपणे टीव्हीवरुन देशाला सांगणारे नंतर गेले कुठे?

नोटाबंदीमुळे कोणतेही भले झाले नाही. नोटाबंदीसाठी जाहीर केलेली उद्दिष्टे पाण्यात ढेकूळ विरघळावे तशी हवेत विरुन गेली. ताजी माहिती म्हणजे पाचशे रुपयांच्या नोटांच्या बनावट नोटा चलनात आल्या आहेत.

एवढी सगळी वाट लागूनही राज्यकर्ते एवढे गेंड्याच्या कातडीचे की जनतेची साधी माफी मागण्याचे व चूक कबूल करण्याचे सौजन्य दाखवू शकले नाहीत. केवढा हा उन्मत्तपणा? याला शुध्द व निर्लज्ज कोडगेपणा म्हणतात!

पण कधीतरी शेरालाही सव्वाशेर भेटतातच ना!

भूमि अधिग्रहण कायदा आणि कृषिविषयक तीन कायद्यांवर राज्यकर्त्यांनी सुरुवातीला कोडगेपणा करण्याचा प्रयत्न केला. पण तो असफल ठरला. हे कायदे त्यांना मागे घ्यावे




लागले. कृषि कायद्यांवर आडमुठेपणा दाखवला तर उत्तर प्रदेशातली स्थिती हाताबाहेर जाईल आणि विधानसभा निवडणुकीत गडबड होऊ शकते हे लक्षात आल्यानंतर ते मागे घेऊन कातडी वाचविण्यात आली.

आता या 'माघार-पुराणा'चे पुढचे अंक समोर येऊ लागले आहेत.

निवडणुकीत मते मिळविण्यासाठी का होईना पण माघारीची नामुष्की पदरी पडताना दिसू लागली आहे.

'माघार मालिके'च्या पुढच्या भागात गुजरातमधील एका नदी-जोड प्रकल्पाचा समावेश आहे.

तापी व नर्मदा या गुजरातला पाणी पुरविणाऱ्या दोन प्रमुख मोठ्या नद्या आहेत.

या देशात केवळ गुजरात हेच एक राज्य अस्तित्वात असल्याची राज्यकर्त्यांची समजूत असल्याने गुजरातला सर्वच बाबतीत सढळ व मुक्तहस्ते मदत दिली जात असते. अगदी परदेशी पाहुण्यांना देखील गुजरातची भेट आवर्जुन घडविण्याचा 'बालहट्ट' अमलात आणला जातो. तर तापी व नर्मदा या दोन नद्यांना जोडून त्यांचे अधिकाधिक पाणी गुजरातला मिळविण्याची योजना आखण्यात आली होती. यात अडचण एकच होती की या दोन्ही नद्यांच्या परिसरात वसलेल्या लोकांमध्ये आदिवासी बहुसंख्येने आहेत.

तसा हा भाग महाराष्ट्राला म्हणजे उत्तर महाराष्ट्र किंवा खानदेशला लागूनच आहे. तर या नदी-जोड प्रकल्पामुळे



आदिवासी मोठ्या प्रमाणात विस्थापित होणे अपरिहार्यच होते. त्यामुळे असंतोष होणार, आंदोलने होणार हे देखील अटळ झाले असते.

...........आणि अडचणीत अडचण म्हणजे डिसेंबरमध्ये गुजरातमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. कितीही नाही म्हटले तरी आदिवासींचे प्रमाण १५.५ टक्के आहे. म्हणजे ते अगदीच नगण्य मानता येणार नाही. त्याहीपेक्षा असंतोषामुळे होणारी वातावरणनिर्मिती ही अधिक त्रासदायक असते. जशी शेतकरी आंदोलनामुळे निर्माण झाली होती.

आणि हो, गेल्या विधानसभा निवडणुकीत अगदी काठावर मिळालेले बहुमत विसरलात का? अगदी शेपटीवरच निभावले होते ना?

तर, मग या निवडणुकीच्या वेळी गेल्या वेळेसारखा फाजील आत्मविश्वास नको म्हणून हा नदी-जोड प्रकल्पच रद्द करण्याचे पाऊल उचलण्यात आले. हो, उगाच डोक्याला ताप नको! तेव्हा गुजरात निवडणुकीसाठी अगदी शहाणपणा दाखविण्यात आला आहे.

याच्याच जोडीला असंतोषाला यत्किंचितही वाव मिळू नये यासाठी काही सरकारी उद्योगांचे खासगीकरण देखील थांबविण्यात आले आहे.

पवनहंस या सरकारी हेलिकॉप्टर सेवा देणारी कंपनी खासगी उद्योगपतींना विकण्याची प्रक्रिया थांबविण्यात आली.

सेंट्रल इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड(सीईएल) ही सरकारी कंपनीपण मोडीत काढण्याचा निर्णय झालेला होता. परंतु तूर्तास तो थांबवण्यात आला आहे. एलआयसी म्हणजेच आपल्या सर्वांचे आयुर्विमा महामंडळ सरकारने विकायला काढले आहे. त्याचे समभागही विक्रीस काढले परंतु त्यास लोकांकडून फारसा प्रतिसाद



मिळाला नसल्याने राज्यकर्त्यांना धक्का बसला आहे.

ते काही असो, राज्यकर्त्यांना कोडगेपणा करण्याची आता किंचित का होईना धास्ती वाटायला लागली हे खरे! ..........त्यातही विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांना भीतीपोटी का होईना असे काही करण्याची उपरती होत असेल तर चांगलेच!

## नव्वदीतला निर्धार!

माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांनी नुकतीच नव्वदी पार केली. नव्वदी पार करुनही ते सक्रिय आहेत.

भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांना पर्यायी आघाडी स्थापनेसाठी ते सध्या प्रयत्नशील आहेत. या त्यांच्या प्रयत्नातच तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनीही अलीकडेच त्यांची भेट घेतली.

स्वतः चंद्रशेखर राव हे प्रादेशिक पक्षांची पर्यायी आघाडी स्थापन करण्यासाठी जोरदार कामाला लागले आहेत. त्यांनी दिल्लीत येऊन आम आदमी पार्टीचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याबरोबर यासंदर्भात बोलणी केली होती. त्यानंतर ते थेट देवेगौडांच्या भेटीला गेले आणि त्यांच्याबरोबर तिसऱ्या आघाडीची सविस्तर चर्चाही केली. असे सांगण्यात येते की या दोघांच्या प्रयत्नामुळे अखिलेश यादव(समाजवादी पार्टी), ममता बॅनर्जी(तृणमूल काँग्रेस) आणि अरविंद केजरीवाल (आम आदमी पार्टी) यांनी एकत्र येण्याची तयारी दाखवली आहे.



उत्तर प्रदेशात अखिलेश यांनी भाजपच्या सामर्थ्याला चांगली जोरदार टक्कर दिली. त्याचवेळी ममता बॅनर्जी यांनी अखिलेश यांचे अभिनंदन करुन भाजपचा मुकाबला करण्याची ताकद त्यांनी दाखविल्याचे म्हटले होते.



प्रादेशिक पक्षांनी भाजपला रोखण्याची किमया करुन दाखवलेली आहे. महाराष्ट्रात तर तीन पक्ष एकत्र येण्याची जादू नुसती केली नसून तीन वर्षे यशस्वी करुन दाखविण्यात आली आहे. तमीळनाडूतही प्रादेशिक पक्षांचेच वर्चस्व आहे.

तेलंगणाचे मुख्यमंत्री व तेलंगणा राष्ट्र समितीचे सर्वेसर्वा चंद्रशेखर राव यांनी आधी भाजपबरोबर जवळीक साधण्याचा प्रयत्न केला होता पण तो यशस्वी ठरला नाही. उलट भाजपने तेलंगणात प्रवेश करुन त्यांनाचा आव्हान द्यायला सुरुवात केल्यानंतर त्यांचे डोळे उघडले आणि आता त्यांना भाजपचा धोका पुरेपूर लक्षात आल्याने त्यांनी विरोधी पक्षांच्या आघाडीसाठी पुन्हा प्रयत्न करण्यास सुरुवात केलेली दिसते. कसेही असो, भाजपच्या





एकतंत्री आणि दादागिरीच्या विरोधात एखादी आघाडी उभी रहात असेल तर त्याचे स्वागतच करावे लागेल!



## याला काय म्हणावे? कोतेपणा की दुर्लक्ष?

गीतांजलि श्री या हिंदी लेखिका आहेत. त्यांनी हिंदीत लिहिलेल्या 'रेत समाधी' या कादंबरीचा 'टूंब ऑफ सँड' असा इंग्रजी अनुवाद झाला.






या अनुवादित पुस्तकाची 'मॅन बुकर'(२०२२) या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड झाली.

मूळ भारतीय भाषेत लिहिलेल्या आणि अनुवादित पुस्तकाची या पुरस्कारासाठी निवड होण्याचा हा पहिलाच प्रसंग ठरला.

मॅन बुकर पुरस्कार हा नोबेलच्या तोलामोलाचा किंवा प्रतिनोबेल समजला जातो. यावरुन त्याची प्रतिष्ठा लक्षात यावी. ही कादंबरी अस्वस्थ करणारी आहे. कारण यामध्ये वर्तमान काळात मानवता-माणुसकी यांची विविध नावांखाली होणारी गळचेपी, मुस्कटदाबी आणि घुसमट यांचे वर्णन आहे. रथयात्रा, अयोध्या, मशीद उद्‌ध्वस्त करणे, दंगली, त्यांच्या प्रतिक्रियेत होणाऱ्या प्रतिदंगली, त्याचे समर्थन, गुजरात दंगे, त्यांचे समर्थन आणि या सर्वांच्या खाली गाडली जाणारी माणुसकी, मानवता याचा अस्वस्थ आलेख या कादंबरीत आहे.

गुजरात दंगे आणि अयोध्येबाबत प्रतिकूल मते व्यक्त करणाऱ्यांना वर्तमान राजवटीत महत्व दिले जात नाही किंबहुना त्यांना बहिष्कृत किंवा प्रसंगी संपविण्याचाच दृष्टिकोन राजवटीत अधिक प्रभावीपणे प्रचलित झालेला दिसतो. स्वाभाविकपणे ज्या हिंदी भाषेचा सध्या गवगवा व प्रसंगी दुराग्रह धरण्यात येतो त्या भाषेतील पुस्तकाच्या अनुवादाला असा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळणे ही देशभक्ती व राष्ट्रवादाने भारलेल्या राजवटीला अभिमानास्पद बाब असायला हवी होती.

प्रत्यक्षात राजवटीने मौन पाळलेले आहे. जे राज्यकर्ते घडीघडी ट्वीट करुन आपण कसे सजग असल्याचे फुशारकीने दाखवत असतात त्यांना या पुस्तकाच्या पुरस्काराची आठवण नसावी हे आश्चर्यकारक व आचंबित करणारे आहे.

एक अपवाद निघाला. नगरविकास मंत्री हरदीप पुरी यांनी ट्वीटद्वारे या पुस्तकाला मिळालेल्या पुरस्काराबद्दल अभिनंदन व्यक्त केले. बिच्चारे पुरी हे आंतरराष्ट्रीय पातळीवर काम केलेले विदेशसेवेचे अधिकारी असल्याने त्यांनी या घटनेची दखल घेतली. त्यांना त्यांच्या पक्षाचा किंवा नेतृत्वाचा मौन पाळण्यामागील कावेबाजपणा लक्षात आला नसावा.

पंतप्रधानांनी याची दखल का घेतली नाही हा देखील विचार करण्यासारखा मुद्दा आहे. ते मनाचा मोठेपणा का दाखवू शकले नाहीत ही बाबही प्रश्नचिन्हांकितच आहे!

## येद्युरप्पांना दणका??

येद्युरप्पा आठवतात ना?

कर्नाटकातील लिंगायत समाजाचे अनभिषिक्त नेते आणि माजी मुख्यमंत्री!

वयोमानानुसार त्यांना त्यांच्या मनाविरुध्द कर्नाटकचे मुख्यमंत्रीपद सोडावे लागले होते.

भाजपमध्ये अखेरचा शब्द असलेल्या पंतप्रधानांनी वयाचे कारण सांगून त्यांना पायउतार केले.





तेव्हापासून हा दुखावलेला नेता संधीची वाट पहात बसला आहे.

त्यांचे चिरंजीव बीवाय विजयेंद्र यांना कर्नाटक विधान परिषदेत स्थान मिळावे यासाठी ते प्रयत्नशील होते.

परंतु त्यांच्या चिरंजीवांना तिकिट नाकारण्यात आले. या तिकिट कापाकापीत भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस बीएल संतोष यांची भूमिका असल्याचे सांगण्यात येते.

संतोषी हे भाजपच्या सर्वोच्च नेत्यांच्या जोडगोळीच्या आशीर्वादाने हे सर्व करीत असतात हे आता लपून राहिलेले नाही. येद्युरप्पांनी नमते घेतलेले दिसते. कदाचित विजयेंद्र यांना संघटनेत मोठी जबाबदारी दिली जाईल अशी सारवासारव त्यांनी केली.



भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाला येद्युरप्पांची कोंडी करण्यात आनंद येत असला तरी तो त्यांना आणखी किती काळ घेता येईल हा प्रश्नच आहे.

येद्युरप्पा हे गप्प बसणारे नेते नाहीत. कर्नाटक विधानसभेची निवडणूक पुढील वर्षी होणार आहे. तेव्हा जर या दुखावलेल्या नेत्याने प्रत्युत्तर देण्याचे ठरविले तर भाजपला ते महाग जाईल.

पूर्वी एकदा भाजपला याच कारणास्तव पराभव स्वीकारावा लागला होता. त्याची आठवण नेतृत्व-जोडीला आहे की नाही माहिती नाही.

परंतु कर्नाटकातील राजकारण आता दिवसेंदिवस स्फोटक आणि रंजकही होऊ लागले आहे.

विशेषतः मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या अडचणीत वाढच होत चालली आहे.

कर्नाटकात त्यांना त्यांचे पक्षातील प्रतिस्पर्धी गप्प बसू देत नाहीत. त्यांनी मंत्रीपदासाठी तगादा लावला आहे. भाजपच्या हायकमांडने म्हणजेच मोदी-शहांनी अद्याप त्यांना परवानगी दिलेली नाही. त्यामुळे सतत दिल्लीच्या चकरा मारताना आढळतात.

येद्युरप्पा शांत आहेत आणि मजा बघत आहेत!

आपणही मजा पाहूयात!

## प्रेस क्लब आणि भाजप सत्ताधारी

भाजपच्या दादागिरीला पुरुन उरलेल्या ज्या काही संस्था आहेत त्यामध्ये 'प्रेस क्लब ऑफ इंडिया'चा समावेश होतो.

दिल्लीत १ रायसीना मार्ग येथे असलेल्या या संस्थेने माध्यमांचे स्वातंत्र्य टिकविणे आणि त्यांचे इतर प्रश्न व समस्यांना वाचा फोडण्यासाठी आपली भूमिका बजावलेली आहे.

या संस्थेत दरवर्षी निवडणूक होऊन अध्यक्षांसह पाच पदाधिकारी आणि सोळाजणांची व्यवस्थापन समिती यांची निवड केली जाते.

या संस्थेचा कारभार गेली अनेक वर्षे लोकशाहीवादी, प्रगतीशील व उदारमतवादी विचाराच्या पत्रकारांमधील मोठ्या गटातर्फे पाहिला जातो.

पत्रकारांच्या या शिखर संस्थेचा कारभार आपल्या पुठ्ठ्यातील पाळीव






पत्रकारांच्या हाती का नाही याची केवळ खंतच नव्हे तर पराकोटीचा मत्सर, आकस, आसूया सत्तापक्ष व त्यांच्या परिवारातील मंडळींना आहे. त्यासाठी अप्रत्यक्षपणे त्यांचा या निवडणुकांमध्ये हस्तक्षेप होत असतो. पण त्यांचे दुर्दैव की अद्याप त्यांना यश मिळालेले नाही.




२०२२ची निवडणूक नुकतीच पार पडली.

या निवडणुकीत प्रगतीशील, उदारमतवादी व लोकशाहीवादी पॅनेलला पाडण्यासाठी अतोनात प्रयत्न केले गेले मिळत असलेल्या माहितीनुसार सत्तापक्षाने पैशाची मदतही प्रतिस्पर्धी पाळीव पॅनेलला केली. या पॅनेलच्या एका सदस्याने आपल्या क्रेडिट कार्डाने अनेक सदस्यांची वार्षिक वर्गणी भरली. कारण ज्यांची वर्गणी आणि हिशोब पूर्ण अद्ययावत असतात अशा शून्य थकबाकीदारांनाच मतदान करता येते. परंतु पैशाचे पाठबळ पुरवून थकबाकीदारांच्या हजारो रुपयांच्या थकबाक्या भरुन पाळीव पॅनेलने या निवडणुकीला बट्टा लावण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या युक्त्या यशस्वी झाल्या नाहीत.

प्रेस क्लबवर उदारमतवादी पॅनेलनेच विजय मिळवला.

वर्तमान सरकारने प्रेस क्लबकडून सुमारे पाच ते सहा कोटि रुपयांची रक्कम नवीन जागेसाठी घेतली आहे.

नवीन जागा ताब्यात देण्याचे पत्र दिल्यानंतरही आयत्या वेळी ताबा न देता हे सरकार हे पैसे दडपून बसले आहे. त्यापोटी व्याज देखील दिलेले नाही.

हे सूडबुध्दीचे कारण एका मंत्र्याच्या मळमळीतून बाहेर आले. त्याने सांगितले, की, प्रेस क्लबवर 'आमचे पॅनेल' येईल तेव्हाच मी तेथे पाय ठेवीन!

पत्रकारांची वाटेल तशी गळचेपी करणे, त्यांना संसदेत प्रवेश न देणे असले प्रकार सरकार करीत आहे. पत्रकारांविरुध्द देशद्रोहासारखे गुन्हे दाखल केले जात आहेत. प्रेस क्लबने पत्रकारांच्या या प्रश्नांना वाचा फोडणारे व्यासपीठ किंवा मंच म्हणून आपली जबाबदारी बजावल्यावर सरकारच्या सूडबुध्दीला त्यांना तोंड द्यावे लागत आहे. मेरा भारत महान!

## पंतप्रधान आणि मुख्यमंत्री ..............बिघडते संबंध!

पंतप्रधान हे देशाचे असतात. पक्षाचे नसतात. त्यांची बांधिलकी जनतेला असते.

परंतु मुळातच संकुचित प्रवृत्ती आणि प्रतिस्पर्धी म्हणजे शत्रु व म्हणूनच



त्याचा नायनाट केला पाहिजे ही खुनशी वृत्ती ठेवून हे पद सांभाळणे ही शुध्द प्रतारणा असते.

परंतु गेल्या सत्तर वर्षात जे घडले नाही ते गेल्या काही वर्षांपासून घडत आहे. विरोधी पक्षांचे मुख्यमंत्री जेथे आहेत त्या राज्यांना सावत्र वागणूक देण्याचा जणू विडाच उचलण्यात आला आहे. भाजपचे मुख्यमंत्री सद्गुणांचे पुतळे आणि विरोधी पक्षांचे मुख्यमंत्री दुर्गुणांनी बरबटलेले असा प्रचार करण्यासही मागेपुढे पाहिले जात नाही.

अशा भेदभावाने भरलेल्या आणि पक्षपाताच्या तीव्र रोगाने ग्रस्त अशी राजवट आणि त्या राजवटीचे प्रमुख यांच्याकडून वेगळी अपेक्षा काय करणार?

झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी नुकतीच काही पत्रकारांजवळ ही खंत बोलून दाखवली.

आपल्याला काही प्रकरणांमध्ये चक्क गोवण्यात येऊन चौकशीचा ससेमिरा लावण्यात आला आहे असे त्यांनी सांगितले.

एवढेच नव्हे तर आपण राज्यांची कामे घेऊन दिल्लीत गेलो तर मंत्री भेटतही नाहीत असा धक्कादायक गौप्यस्फोट त्यांनी केला.

पण असे असूनही विरोधी पक्षांच्या मुख्यमंत्र्यांबद्दल नाराजी व रागराग करण्याचे प्रकार सुरुच आहेत.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या तर सदोदित व कायमस्वरुपी भाजप व भाजप नेतृत्वाच्या हिटलिस्टवर आहेतच.

शिवसेना प्रमुख व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना छळण्याचा विडाच सुमारबुध्दीच्या नेत्यांनी उचललेला आहे.

त्याच मालिकेत आता तेलंगणाचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव आणि तमीळनाडूचे मुख्यमंत्री एम.के.स्टॅलिन यांचा समावेश झालेला दिसतो कारण भाजपच्या प्रचारकी टोळ्यांनी सोशल मीडियावरुन त्यांच्यावर शरसंधान करण्यास सुरुवात केली आहे.

अलीकडेच विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी तमीळनाडूला भेट दिली. त्यावेळी स्टॅलिन यांनी त्यांच्या स्वागतात कुठेही कमतरता ठेवली नाही. परंतु अधिकृत किंवा सरकारी कार्यक्रमात त्यांनी तमीळनाडूची काही गाऱ्हाणी सभ्य शब्दात पंतप्रधानांसमोर मांडली. यामध्ये काहीच गैर नव्हते. परंतु भाजपच्या अहंकारी व दादागिरीच्या स्वभावाला ते मानवले नाही आणि त्यांच्या प्रचारकी टोळ्यांनी स्टॅलिन यांचे वर्तन व आचरण मुख्यमंत्र्याला शोभेसे नसल्याची टीका सुरु केली. पंतप्रधानांचा अवमान करण्यात आला अशी हाकाटी देखील करण्यात आली.

स्टॅलिन यांनी तीन मुद्दे मांडले. जीएसटीची थकबाकी लवकर देण्यात यावी, हिंदी भाषा लादण्याचे प्रयत्न केले जाऊ नयेत आणि 'नीट' परीक्षेची सक्ती समाप्त व्हावी. या मागण्या मांडणे हा पंतप्रधानांचा अपमान?

चंद्रशेखर राव यांच्यावर जेव्हा भ्रष्टाचार, घराणेशाहीवरुन जहरी टीका करण्यात आली व त्यांचे उच्चाटन करण्यासाठी कारवाया सुरु करण्यात आल्या तेव्हा ते बिथरले. त्यांनी पंतप्रधानांच्या आगमनप्रसंगी स्वागताचा शिष्टाचार पाळला नाहीच पण त्यांच्या कोणत्याही कार्यक्रमातही सहभाग घेतला नाही. त्यामुळे तेही भाजपच्या प्रचारकी टोळ्यांच्या टार्गेटवर आहेत.



जे पंतप्रधान करोना साथीच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्र्यांना शब्दही बोलू देत नाहीत, त्यांना उपदेशाचे डोस पाजत राहतात आणि विषय बदलून त्यांच्यावर अन्य मुद्यांवरुन टीका करु लागतात व साधा शिष्टाचार व किमान सभ्यता पाळत नाहीत त्यांनी इतरांकडून शिष्टाचार व सभ्यतेची अपेक्षा न ठेवलेलीच बरी! ■■



# संस्कृती अभ्यासक आणि इतिहासकार डी.डी. कोसंबी

- प्रा.डॉ. गणेश राऊत

> **इतिहासाचे गाढे अभ्यासक व विद्वान प्रा. दामोदर धर्मानंद उर्फ डी.डी. कोसंबी यांचा जन्म ३१ जुलै १९०७ रोजी झाला. २८ जून १९६६ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अवघ्या ५९ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी जो कामाचा प्रचंड डोंगर उभा केला तो अजोड होय. २०२२ च्या जून मध्ये त्यांच्या मृत्यूस ५६ वर्षे होत आहेत तर २०२२च्या जुलै मध्ये त्यांच्या जन्मास ११५ वर्षे होत आहेत. हा दुहेरी योग साधणे, कोसंबी यांच्या कार्याची कृतज्ञ आठवण ठेवणे या उद्देशाने या लेखाचा प्रपंच केला आहे.**

संस्कृतीचे भाष्यकार आणि इतिहासाचे अभ्यासक डी.डी. कोसंबी यांच्या जीवनाचे मर्म सांगताना अभ्यासक डॉ. अशोक चौसाळकर लिहितात – "आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गणितज्ञ, संख्याशास्त्रज्ञ तसेच भारतविद्येचे गाढे अभ्यासक म्हणून विद्वन्मान्य पावलेले डॉक्टर दामोदर धर्मानंद कोसंबी म्हणजे बहुआयामी, बुद्धिमत्तेचे लेणे लाभलेले अव्वल संशोधक, अभ्यासक, गणित आणि संख्याशास्त्रात सैद्धांतिक संशोधन केलेल्या डॉक्टर कोसंबी यांनी इतिहास, पुरातत्व, अर्थशास्त्र, नाणकशास्त्र, संस्कृत साहित्य व तत्वज्ञान, जीवशास्त्र, भारतीय संस्कृती यांसारख्या बहुविध ज्ञानशाखात मूलभूत स्वरूपाचे संशोधन केले. बहुभाषाकोविद असणाऱ्या डॉक्टर कोसंबी यांना फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, हिब्रू या सारख्या परकीय भाषा उत्तम अवगत होत्या. भारतीय संस्कृतीच्या आंतरविद्याशाखीय अध्ययनसंशोधनाची पद्धती अंगीकारणाऱ्या डॉक्टर कोसंबी यांनी भारतीय इतिहासाचे मार्क्सप्रणित विचारव्यूहाच्या आधारे विश्लेषण करण्याच्या संशोधन पद्धतीची पायाभरणी केली. वैज्ञानिक दृष्टिकोन, विद्वता आणि व्यासंग यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्वात पुरेपूर आढळतो... मानवी स्वातंत्र्याच्या कक्षा रुंद करण्यासाठी आणि लोकांचे दैन्य आणि दारिद्रय नष्ट करण्यासाठी विज्ञानाचा व तत्वज्ञानाचा उपयोग व्हावा, असे

त्यांचे सांगणे होते. त्यांच्या या अपूर्व योगदानामुळेच त्यांना महाराष्ट्राचे कर्ते पुरुष मानले पाहिजे."

**चरित्र –** प्रा. दामोदर धर्मानंद उर्फ डी.डी. कोसंबी यांचा जन्म ३१ जुलै १९०७ रोजी झाला. २८ जून १९६६ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अवघ्या ५९ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी जो कामाचा प्रचंड डोंगर उभा केला तो अजोड होय. २०२२ च्या जून मध्ये त्यांच्या मृत्यूस ५६ वर्षे होत आहेत तर २०२२च्या जुलै मध्ये त्यांच्या जन्मास ११५ वर्षे होत आहेत. हा दुहेरी योग साधणे, कोसंबी यांच्या कार्याची कृतज्ञ आठवण ठेवणे या उद्देशाने या लेखाचा प्रपंच केला आहे.

कोसंबी यांचे घराणे मूळचे गोव्याचे. दामोदर यांचे आईवडिल म्हणजे बाळाबाई आणि धर्मानंद कोसंबी होत. बाळाबाई या इतिहास प्रसिद्ध अशा लाड घराण्यातील होत. महादजी शिंदे यांचे दोन प्रसिद्ध आणि शूर सेनापती म्हणजे लखबादादा आणि जिवबादादा लाड. या दोघांनी लाड घराण्यास मराठेशाहीत महत्व प्राप्त करून दिले. त्यांच्या घराण्यातील बाळाबाई यांचे बंधू डॉ. सखाराम लाड हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील प्रसिद्ध नाव आहे. याचे कारण म्हणजे पोर्तुगाल या देशात जाऊन त्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील पदवी प्राप्त केली होती.

अशा प्रकारे पदवी प्राप्त करून परत येऊन वैद्यकीय व्यवसाय सुरू करणारे लाड हे पहिलेच डॉक्टर. अशा या दोन्ही कडून उत्तम वारसा लाभलेल्या घराण्यात दामोदर यांचा जन्म झाला. तत्कालिन रीतीप्रमाणे आजोबांचे नाव नातवास ठेवायचे या पद्धती प्रमाणे धर्मानंद यांचे वडिलांचे नाव दामोदर होते तेच नाव ठेवण्यात आले. दामोदर धर्मानंद कोसंबी आणि धर्मानंद दामोदर कोसंबी हे दोघेही जगभर डी.डी. कोसंबी म्हणून प्रसिद्ध आहेत.




**वडिलांचा वारसा –** दामोदर यांना वडिलांचा जो वारसा मिळाला तो समजून घेतल्याशिवाय आपणास पुढे जाता येणार नाही. ख्यातनाम अभ्यासक, फर्गसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य मो.गो. धडफळे यांनी 'बौद्धधर्म– भाष्यकार धर्मानंद कोसंबी' या शीर्षकाचे चरित्र लिहिले आहे. या चरित्रात धर्मानंदांचे मोठेपण सांगताना ते लिहतात, "बौद्ध धर्म आणि पाली भाषा यांचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अभ्यासक–संशोधक. आधुनिक पद्धतीने चिकित्सक दृष्टिने बौद्ध विचार व धर्म आणि पाली भाषा यांच्या अध्ययन चक्राचे प्रवर्तन हा कोसंबी यांच्या जीवनकार्याचा विशेष. बौद्ध धर्माबाबतच्या तीव्र जिज्ञासेपोटी गृहत्याग करुन संस्कृत–प्राकृत–पाली या भाषांच्या अध्ययनासाठी ते गोव्यातील 'साखवाळ' या गावाहून पुण्यास आले. त्यानंतर काशीस व तेथून नेपाळ येथे गेले. बौद्ध धर्माला आलेली अवकळा पाहून गयेस प्रस्थान. तेथे एका बौद्ध भिक्षूच्या मार्गदर्शनाखाली पालीचा अभ्यास आणि त्या भिक्षुच्या प्रेरणेने पुढे श्रीलंका व ब्रम्हदेशातील विहारांमधून बौद्ध धर्म व पाली भाषेतील ग्रंथांचा प्रचंड व्यासंग धर्मानंदांनी केला भिक्षुकधर्माची दीक्षाही त्यांनी घेतली. हॉर्वर्ड विद्यापिठातील प्राध्यापक जे. एच. वूडस् यांच्या निमंत्रणावरून ते एकंदर चार वेळा अमेरिकेस गेले. तेथील वास्तव्यात त्यांनी बुध्दघोषाच्या ज्ञानकोशात्मक 'विसुद्धीमग्ग' या ग्रंथाचे संपादन केले. कलकत्ता विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, पुण्याचे फर्गसन महाविद्यालय तसेच लेनिनग्राड येथे पाली भाषेचे अध्यापन केले. पुढे महात्माजींच्या सत्याग्रहातही ते सहभागी झाले."

एवढया कर्तृत्ववान पित्याचा वारसा दामोदर यांस मिळाला होता. अशा वेळी 'बापसे बेटा सवाई' ठरण्यासाठी मुलाला अपार परिश्रम घ्यावे लागले. तुलना अपरिहार्य असते परंतु दामोदर यांनी काळावर आणि संशोधनाच्या कामावर आपला ठसा उमटविला. दामोदर हे धर्मानंदांचे एकुलते एक पुत्र होत. दामोदर यांनी वडिलांकडून संशोधक वृत्ती, अफाट परिश्रम करण्याची चिकाटी, गणित विज्ञानात रस, संस्कृत–भारतविद्या आणि बौद्ध धर्माचा अभ्यास या गोष्टी घेतल्या. धर्मानंदांवर म. गांधी युगाचा प्रभाव होता. दामोदर हे नेहरू युगातील अपत्य होत. धर्मानंद यांनी अखेरचा श्वांस गांधीच्या आश्रमात घेतला.धर्मानंद यांचे लिखाण मराठीत तर दामोदर यांचे लिखाण इंग्रजीत आहे.

**वाटचाल –** गोव्यात जन्मलेले दामोदर वडिलांच्या नोकरीनिमित्ताने पुण्यास आले. वडिल, मुलगा आणि नात (डॉ. मीरा कोसंबी) अशा तीन पिढ्या फर्गसनमध्ये प्राध्यापक झाल्या. हा एक विलक्षण योगायोग



बनारस हिंदू विद्यापीठ आणि दामोदर धर्मानंद कोसंबी



आहे. गोव्यातील बालपणामुळे कोकणी, पुण्यात आल्यावर मराठी-इंग्रजी भाषांचा अभ्यास झाला. १९१८ मध्ये धर्मानंद यांस अमेरिकेस जाण्याची संधी मिळाली तेव्हा दामोदर ११ वर्षांचे होते. मॅसेच्युसेट्स राज्यात ते स्थायिक झाले होते, येथे दामोदर यांचे शिक्षण रिंज टेक्निकल हायस्कूल, हार्वर्ड ग्रामर स्कूल, केंब्रिज हाय व लॅटिन शाळा येथे झाले. यामुळे कोकणी, मराठी, इंग्रजी, ग्रीक, लॅटिन, फ्रेंच या भाषांचा त्यांचा अभ्यास झाला. ट्रेकिंग, बर्फावरील स्केटिंग, बॉय स्काऊट यात त्यांचा सहभाग होता. येथेच त्यांची नॉबर्ट विनर या अत्यंत हुशार व्यक्तिशी मैत्री झाली. १९२० मध्ये धर्मानंद यांचे अमेरिकेतील काम संपले तरी दामोदर मात्र अमेरिकेतच राहिले, वसतिगृहात राहून त्यांनी शिक्षण चालू ठेवले. याच काळात त्यांनी अफाट आणि औरस-चौरस वाचन केले. इंग्लंडपेक्षा अमेरिकेतील वास्तव्य अधिक मोकळेपणाचे, विचारांना वाव देणारे, स्वतंत्र मते मांडायला प्रवृत्त करणारे होते. त्यामुळे दामोदर अधिक वैचारिक स्वातंत्र्यप्रिय अभ्यासक झाले. १९२४ मध्ये ते शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले आणि आई वडिलांच्या भेटीसाठी भारतात परतले भारतात आल्यावर ते म. गांधीजींना भेटले. गांधीजींनंतर आचार्य जिनविजय यांच्या संपर्कात ते आले.

अमेरिका, भारतीय विद्यापिठे आणि अमेरिकन गुणपत्रिका यांचा ताळमेळ बसणे अवघड झाले. धर्मानंद वशिला लावून प्रवेश घेण्याच्या विरोधात होते. अशातच धर्मानंद यांना पुन्हा एकदा अमेरिकेत जाण्याची संधी मिळाली. पुन्हा एकदा दामोदर पश्चिमेकडे निघाले. १९२६ मध्ये पुन्हा एकदा 'स्वातंत्र्यदेवतेच्या देशात (हार्वर्ड विद्यापीठ) शिक्षण सुरू झाले . वर्षभर वडिलांना त्यांच्या कामात दामोदर यांनी मदत केली. धर्मानंद भारतात परतले, 'कमवा आणि शिका' या धोरणाचा, त्यांनी वापर करून दामोदर शिक्षणात मग्न झाले. इटालियन भाषा, पदवीच्या वर्गात सर्वोत्तम गुण मिळवले. पुढील शिक्षणासाठी स्कॉलरशिप न मिळाल्याने ते भारतात परतले.

**प्राध्यापकी-** भारतात आल्यावर बनारस हिंदू विद्यापिठात ३०० रुपये पगारावर त्यांनी प्राध्यापकीय कारकीर्द सुरू केली. पुढे अलिगढ विद्यापीठात गणित शिकवायला

त्यांनी सुरुवात केली. याच दरम्यान त्यांचा विवाह नलिनी माडगावकर यांच्याशी झाला. पुढे अलिगढ सोडून पुणे शहरात फर्गसन महाविद्यालयात गणिताचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. यामुळे त्यांचा पगार ३०० रुपया वरून १३० रुपये झाला. फर्गसन मध्ये त्यांच्या वैयक्तिक ज्ञानसाधनेस बहर आला. संशोधन पत्रिकांमध्ये लेख लिहिणे, इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटीच्या कामात लक्ष घालणे, भारतीय इतिहासाचा मार्क्सवादी दृष्टीकोणातून विचार करणे या गोष्टी त्यांनी मोठ्या प्रमाणात केल्या. भारतविद्येवरती संशोधन, शतत्रीयेचे काम, नाणकशास्त्र संशोधन, महाभारत व गीता यावरील संशोधन, संस्कृतग्रंथ पाठचिकित्सा या गोष्टींना त्यांनी प्राधान्य दिले. यातूनच १९३४ मध्ये त्यांना 'रामानुजन स्मृती पारितोषिक ' मिळाले.

भारतातील 'विज्ञान अकादमीचे संस्थापक सभासद' म्हणून त्यांची निवड झाली. १९४७ मध्ये 'स्पेशल भाभा प्राईस' ने या कामगिरीवर कळस चढविला. त्यापूर्वीच १९४५-४६ च्या दरम्यान फर्गसन कॉलेज आणि, डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांचा संबंध कायमचा सुटला, ते मुंबईत दाखल झाले.

**मुंबईपर्व –** डॉ. होमी भाभा यांनी मुंबईत 'इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेटल रिसर्च' संस्था सुरू केली. कोसंबी येथे दाखल झाले. हे दिवस भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे होते. स्वातंत्र्य जवळ दिसू लागले होते. १९४६ मध्ये मुंबईत नौ सैनिकांनी ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्य संग्राम छेडला. त्यातील सैनिकांची शुश्रूषा करण्याचे काम कोसंबी यांनी केले. पुढे त्यांचे गाजलेले पुस्तक 'इन्ट्रोडक्शन टू स्टडी ऑफ इंडियन हिस्ट्री' प्रकाशित झाले .

अखिल भारतीय शांतता परिषदेचे ते उपाध्यक्ष झाले. अणुबॉम्ब, अणुउर्जा यांना त्यांनी विरोध सुरू केला. यामुळे भाभांबरोबर मतभेद सुरू झाले. या काळात त्यांनी इंग्लंड, अमेरिका, पूर्व युरोप, चीन, रशिया, जपान या देशांच्या दौरा केला. १९५४ मध्ये हेलिसिंकी येथे जागतिक शांतता परिषदेत भारतातून ९० विद्वानांचे पथक गेले होते; त्याचे प्रमुख कोसंबी होते. रशियात त्यांनी अणुशक्तीचा शांततेसाठी वापर आणि मॉस्को विद्यापीठात 'भारतीय इतिहास' विषयावर ६ भाषणे दिली.


१९६०-६१ मध्ये चीन पंतप्रधान चौ एन लाय यांच्या बरोबर त्यांची प्रदीर्घ चर्चा झाली. चीनच्या शेतकी सांखिकिच्या संदर्भात त्यांनी सल्ला दिला. १५ जून १९६० पासून ते पुणे शहरातील 'महाराष्ट्र विज्ञान प्रबोधिनी' या संस्थेत वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेच्या (सी.एस.आय.आर) फेलोशिप अंतर्गत रुजू झाले. या दरम्यान त्यांचे 'भारतीय इतिहास आणि संस्कृती' पुस्तक तयार झाले. संस्कृत नाटककार 'भास' याच्या 'अविमारक' या नाटकाचे संपादन त्यांनी अभ्यासक जे.एस. मॅसॉन यांच्या सहकार्याने केले. 'तिसऱ्या जगातील विज्ञान व तंत्रज्ञान' या विषयावर त्यांनी दिल्लीत भाषण दिले. 'डॉ. होमी भाभा









यांचे योगदान' या विषयावर एका आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांनी व्याख्यान दिले.


**वैचारिक योगदान –** कोसंबी यांनी आतापावेतो १२७ संशोधनपर लेख लिहिले. विज्ञान, गणित, भारतविद्या, भारतीय इतिहास या विषयावर हे लेख प्रामुख्याने आहेत. भारताच्या इतिहासाची प्रस्तावना, भारतीय संस्कृती व सभ्यता, मिथक आणि वास्तवता ही त्यांची तीन गाजलेली पुस्तके होत. त्यांचा लेखसंग्रह मुंबई विद्यापिठाच्या इतिहास विभागाने प्रकाशित केला. ऑक्सफर्ड विद्यापिठाने बृजदूलाल चट्टोपाध्याय यांच्या संपादकत्वाखाली 'कम्बाईंड मेथड्स इन इंडॉलॉजी अँड अदर एसेज' हे पुस्तक प्रकाशित केले. नाणकशास्त्रावरील लेख ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले. मराठी विश्वकोश खंड ४ मध्ये सु.र.देशपांडे यांनी कोसंबी यांच्यावर टिपण लिहिले आहे. त्यानुसार आनुवंशिकीतील गुणसूत्रांमधील अंतराचे महत्व त्यांनी विशद केले. नाणकशास्त्र हे एक शास्त्र आहे, हे त्यांनी असंख्य नाण्यांच्या अभ्यासावरून सिद्ध करण्याच्या प्रयत्न केला. त्यांच्याकडे सूक्ष्म पाषाण आयुधांचा मोठा संग्रह होता. कार्ले येथील ब्राह्मी लिपीचा शोध व पूर्वाश्म संस्कृतीचे अनेक अवशेष व तत्संबंधीची तार्किक अनुमाने यांवरून पुरातत्त्वविद्या विषयातील त्यांच्या सखोल















अभ्यासाची कल्पना येते. भर्तृहरिची शतके आणि विद्याकराचा सुभाषित रत्नकोश हे ग्रंथ त्यांनी सटीप संपादिले. कौटिल्यलिखित अर्थशास्त्राचा समग्र अनुवाद ते करीत होते. आईनस्टाईन आणि व्हेवल्लेन यांच्याशी त्यांनी शास्त्रीय विषयांवर चर्चा केली होती.

१९४२-४६ मध्ये भारतीय क्रांतिकारकांना मदत करणे, दुष्काळाच्या काळात पुणे शहरातील चतुःश्रृंगी परिसरातील दुष्काळग्रस्त लोकांना मदत करणे, भूमिगत क्रांतिकारकांना आश्रय देणे, विद्यार्थ्यांना सढळ हाताने मदत करणे, पानशेत धरण फुटल्यावर लोकांना आश्रय देऊन मदत करणे, अन्न - वस्त्र पुरवठा करणे यात त्यांनी पुढाकार घेतला . २९ जून रोजी पहाटे त्यांचे निधन झाले. त्यांचे अकाली निधन भारतीय इतिहासासाठी हानिकारक ठरले. विश्वकोशात नमूद केल्याप्रमाणे 'कोसंबी यांचे लेखन संकलित करण्याकरिता उपराष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन झाली' असे विश्वकोशात नमूद केले आहे. मला त्याचे संदर्भ सापडले नाहीत. परंतु, उपराष्ट्रपती पदावरील व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली अशा प्रकारची समिती स्थापन होणे हाच एक मोठा सन्मान होय. यावर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाही.

▪▪



**।अभंग वारसा।**

**लेख-४**

**समाजाने हलकी ठरवलेली सगळी कामं आमच्या विठ्ठलाने केली. त्याने शेणी थापल्या. मेलेली गुरं ओढली. चामडं कमावलं आणि मांसही विकलं. हे करताना त्याने वर्णव्यवस्थेने उभा केलेला समाजाचा पिरॅमिडही उलटा केला.**

# उंच निंच कांही नेणे भगवंत

**सचिन परब**

**उंच निंच कांहीं नेणे भगवंत। तिष्ठे भाव भक्त देखोनियां॥**
**दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी। दैत्या धरी रक्षी प्रल्हादासी॥**
**चर्म रंगूं लागे रोहिदासा संगीं। कबिराचे मागी विणी शेले॥**
**सजन कसाया विकूं लागे मांस। मळा सांवत्यास खुरपूं लागे॥**
**नरहरी सोनारा घडों फुंकूं लागे। चोख्या मेळ्या संगे ढोरें ओढी॥**
**नामयाची जनी सवें वेची शेणी। धर्मा घरी पाणी वाहे झाडी॥**
**नाम्यासवे जेवी नव्हे संकोचित। ज्ञानियाची भिंत अंगी ओढी॥**
**अर्जुनाची घोडी हाकी हा सारथी। भक्षी पोहे प्रीती सुदाम्याचे॥**
**गौळियाचे घरी गाई अंगे वळी। द्वारपाल बळी द्वारीं जाला॥**
**यंकोबाचे ऋण फेडी हृषीकेशी। आंबऋषीचे सोशी गर्भवास॥**
**मिराबाई साटी घेतो विषप्याला। दामाजीचा जाला पाडेवार॥**
**घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची॥ हुंडी मेहत्याची अंगे भरी॥**
**पुंडलिकासाटीं अजूनि तिष्ठत। तुका म्हणे मात धन्या त्याची॥**


टेपरेकॉर्डर आणि कॅसेटच्या जमान्यात १९८५ साली 'देवाचिये द्वारी' नावाची कॅसेट आली. तोवर नाट्यसंगीत, शास्त्रीय संगीतासाठी ओळख

असलेल्या अजित कडकडेंचा हा पहिला स्वतंत्र अल्बम होता. या कॅसेटने त्या काळात विक्रीचे नवे विक्रम साजरे केले. अजित कडकडेंचा मोकळा आवाज. आठ रसाळ अभंगांची नेमकी निवड. ज्येष्ठ संगीतकार प्रभाकर पंडित यांनी दिलेल्या पारंपरिक वळणाच्या चाली. आणि या कविवर्य वसंत बापटांच्या निरुपणाचा सोनेरी वर्ख. विशेषतः संत तुकोबारायांचा 'उंच निंच कांही नेणे भगवंत' या अभंगावरचं त्यांचं छोटंसंच निरुपण आवर्जून ऐकायला हवं असं आहे.

वसंत बापट त्यांच्या गंभीर आवाजात सांगतात, 'स्त्री, वैश्य आणि शूद्रांना मोक्षाचा मार्ग खुला आहे, हे गीतेनं स्पष्ट बजावलं होतं. पण उच्चवर्णांनी तरीसुद्धा देवाला आपल्या देव्हाऱ्यातच कोंडलं. पोथ्या पुस्तकं पेटीत बंद करून ठेवली. किल्ली आपल्या जानव्याला बांधून ठेवली. तरी खऱ्या भक्तीला अडसर कोण करू शकणार? नामा शिंपी, चोखा महार, रोहिदास चांभार, जनी दासी, कबीर मोमीन आणि तुकोबा शूद्र कुणबीवाणी, या लोकांना धर्म सांगण्याचा अधिकार नाही असं बरळणाऱ्या तुकोबांनी खणखणीत शब्दांत बजावलं, वेदांचा तो अर्थ आम्हांसिच ठावा, येरांनी वहावा भार माथा. पण हेच सत्य आपल्या भावभोळ्या वारकऱ्यांना सांगताना तुकयाचे शब्द नवनीताहून मृदू झाले. त्यांनी समतेची शिकवण कोमल सुरामध्ये दिली. उंच निंच काही नेणे भगवंत...'

तुकोबारायांचे सगळेच अभंग अद्भूत आहेत. पण हा अभंग अद्भुतात अद्भूत आहे. त्या अद्भुततेचं सार वसंत बापटांनी या निरुपणात सांगितलं आहे. या अभंगात इतिहास आहे, भूगोल आहे. तत्त्वज्ञान आहे, समाजशास्त्र आहे. काव्य तर आहेच, व्यवस्थापन शास्त्रही आहे. तुकोबारायांनी आपली सगळी वैचारिक परंपराच या तेरा चरणांमध्ये सांगितली आहे. ही परंपरा दशावतारासाठी कारण ठरलेल्या अंबऋषीपासून सुरू होते. पुराणातल्या काळानुसार त्यात वामनाने पाताळात धाडलेला बळीराजा आणि त्याच्याच राक्षस वंशातला प्रल्हाद आहे. त्यानंतर महाभारतातले विदुर, गोपाळ, सुदामा, युधिष्ठिर आणि अर्जुन हे भक्तीचे आदर्श आहेत. पुढे पुंडलिकानंतर सांगितलेली सगळी वारकरी संतपरंपरा आहे. त्यात संत नामदेवांपासून संत एकनाथांपर्यंतची महाराष्ट्रातली मांदियाळी आहे. शिवाय संत कबीर, संत रोहिदास, संत मीराबाई आणि संत नरसी मेहता ही महाराष्ट्राबाहेरचीही परंपरा आहे. या परंपरेला जातीचा विटाळ नाहीच, पण प्रदेश आणि धर्माचंही कुंपण नाही. कारण मुळात भगवंताला उच्च नीच असे कोणतेही भेद मान्यच नाही आणि तो फक्त मनीची भावभक्ती बघतो, असा सिद्धांत मांडून तो सिद्ध करण्यासाठी उदाहरणं दिली आहेत.

वारकरी परंपरेत सनक, नारद, सुदामा असे पुराणकथांमधले संत पूर्वपंक्तीत धरले जातात. आणि उत्तरपंक्तीचा मान संत नामदेवरायांपासून निळोबारायांपर्यंतच्या संतांना दिला जातो. हे उत्तरपंक्तीचे संत आणि त्यांची प्रमाणं कीर्तनांत जास्त महत्त्वाची मानली जातात. कारण ही संतपरंपरा हाडामासांच्या माणसांची आहे. त्यांनी कष्टाने कमावलेल्या संतत्त्वाची आहे. इतिहासाच्या दृष्टीने ती मध्ययुगीन काळात



घडून गेलेली आहे, याविषयी कुणाला शंका नाही. त्यामुळे ती जास्त मोलाची आहे. तुम्ही ज्यांना थोर मानता त्या अंबऋषी, प्रल्हाद, अर्जुन अशा भक्तांच्या तोलामोलाचीच आमची संतमंडळी आहे, असं सगळ्या संतांनीच ठणकावून सांगितलंय. ते सांगण्याची सुरवात नामदेवरायांपासून होते. ते पहिले संतचरित्रकार आहेत. संतसाहित्याचे महान अभ्यासक डॉ. म. वा. धोंड सांगतात, त्यानुसार नामदेवरायांनी नवं पुराण रचलं. ते मिथमेकर होते. त्यांनी आपल्या सोबतच्या प्रत्येक संताविषयी काही ना काही लिहून ठेवलंय. आमची परंपरा गोष्ट सांगणं फार महत्त्वाचं मानते. कारण ज्ञान आणि




ध्यानातूनही जे भेटत नाही, ते गोष्टींतून सापडतं, असं ज्ञानेश्वरीतही सांगितलेलं आहे.

**जें ज्ञानासि न चोजवे। ध्यानासिही जें नागवे।**
**ते अगोचर फावे। गोठीमाजी॥**

या गोष्टींमधल्या आमच्या विठूरायाने काय काय केलं, याची यादीच तुकोबारायांनी दिली आहे. तो नामदेवरायांबरोबर निःसंकोच जेवला. ज्ञानदेवांसाठी त्याने निर्जीव भिंत चालवली. सावतोबा माळींसोबत शेती केली. गोरोबा कुंभारांसोबत मडकी बनवली. नरहरी सोनारांसोबत दागिने घडवले. कबीरांसोबत शेले विणले. मीराबाईंसाठी विष प्याला. यंकोबा म्हणजे एकनाथरायांचे विठ्ठलावर इतके उपकार होते की त्याने त्याच्याकडे घरगड्याचं काम केलं. दामाजीपंतांसाठी तो विठू महार बनला. त्याने जनाबाईंसाठी बायकी मानली जाणारी कामंही केली. अगदी शेणीही थापल्या. त्याच्याही पुढे जाऊन त्याने चोखोबारायांबरोबर मेलेली गुरंही ओढण्याचं जातव्यवस्थेने दलितांवर लादलेलं कामही केलं. तिथे न थांबता संत रोहिदासांबरोबर चपला बनवण्यासाठी चामडं कमावण्याचं तिरस्कृत मानलं गेलेलं कामही केलं. हे सगळं ठीक होतं, पण आमच्या सावळ्या विठूरायाने सजन कसाई यांना मांस विकण्यातही मदत केली. ही सगळी छोटी मानली गेलेली कामं करण्यात विठ्ठलाचं मोठेपण होतं, असं तुकोबाराय सांगतात.

तुकोबाराय इथे सगळ्या गृहितकांना धुडकावून लावतात. एका शाकाहाराचा आग्रह करणाऱ्या संप्रदायाला कळसस्थानी असणारे तुकोबाराय त्याचं आराध्यदैवत विठ्ठल मांस विकत असण्यात मोठेपण मानतात, हे विशेष. मांसाहाराला नाक मुरडण्यात आणि मांस विकणाऱ्यांना मारण्यात, हटवण्यात धर्म आहे, असं मानणाऱ्यांना आहाराच्या पुढचं अध्यात्म इथे सांगितलेलं आहे. त्यात सहिष्णुता आणि परस्पर आदरपूर्वक सहजीवनाचं महत्त्व आहे. कांदा लसणीत विठाई असल्याचं सावतोबांनी सांगितलं तरी आपण अजून त्याला नाकारण्यात प्रतिष्ठा मानत आहोत. मुळात प्रतिष्ठा असलेल्या कामांनाच ही परंपरा फारसं महत्त्व देत नाही. इथे सेवेला महत्त्व आहे. सेवा ही वर्णव्यवस्थेने शूद्रांना सोपवलेलं काम आहे. इथे तुकोबारायांनी मोजून दाखवलेली कामं सगळी एकजात शूद्रांची आहेत. बहुजनांच्या कामाला थोरपणा देऊन समाजव्यवस्थेचा पिरॅमिड उलटा करण्याचं काम संतपरंपरेने केलं. संतांच्या विठ्ठलाने केलं. ते महत्त्वाचं आहे.

अर्थातच या गोष्टींत चमत्कारही आहेत. पण या चमत्कारांच्या गोष्टी पुराणांमधल्या चमत्कारांपेक्षा वेगळ्या



आहेत. खरं तर त्या अनाचार आणि अंधश्रद्धांना खतपाणी घालणाऱ्या पुराणांतल्या चमत्कारांना पर्याय म्हणून उभ्या राहिल्या आहेत. जातीभेदांचं वर्चस्व मोडण्यासाठी हे चमत्कार आलेत. वर्णभेदांचा फोलपणा सिद्ध करण्यासाठी हे चमत्कार आलेत. खऱ्याची पाठराखण करण्यासाठी हे चमत्कार आलेत. आणि ते खरंही आहेच कारण संतांना आपापल्या कामातच देव सापडला होता. 'कर्मे इशू भजावा' हे संतांच्या जगण्याचं तत्त्वज्ञान आहे. देवापेक्षा आपलं काम महत्त्वाचं आहे, हे सांगणाऱ्या पुंडलिकरायांचा आदर्श आहे. एकदा कामात देव सापडला की मग सगळंच सोपं होत जातं. सगळं देव होऊन जातं. हे संतांनी त्यांच्या अनुभवांचं सार सांगितलंय.

**(लेखक हे रिंगण या संतविचारांचा सामाजिक सांस्कृतिक मागोवा घेणाऱ्या वार्षिक अंकाचे संपादक आहेत. संपर्कः ९९८७०३६८०५)**

■■


# राष्ट्रवादीच्या मंत्र्यांनी मागील ३ वर्षांत केलेली कामगिरी

**महाराष्ट्रात मुख्यमंत्री मा. उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर मागील तीन वर्षांत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंत्र्यांनी घेतलेले निर्णय व केलेल्या कामाचा हा संक्षिप्त व धावता आढावा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २३ व्या वर्धापनदिनानिमित्त येथे देत आहोत.**

## छगन भुजबळ, अन्न व नागरी पुरवठामंत्री, महाराष्ट्र राज्य

### शिवभोजन योजना

राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात भोजन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने दिनांक ०१.०१.२०२० च्या शासन निर्णयान्वये शिवभोजन योजना" दिनांक २६.०१.२०२० पासून सुरू केली आहे. शिवभोजन योजनेअंतर्गत रू.१०/- प्रती थाळी याप्रमाणे भोजन उपलब्ध करून देण्यात येते. यामध्ये २ चपात्या, १ वाटी भाजी, १ वाटी वरण व १ मूद भात याचा समावेश असतो. शिवभोजन योजना कार्यान्वित करण्यासाठी शिवभोजन ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. त्याचा वापर करूनच शिवभोजन थाळी वितरीत करणे बंधनकारक आहे. शिवभोजन थाळ्या वितरीत करण्यापुर्वी लाभार्थ्यांचे नाव व फोटो घेणे बंधनकारक आहे. तर फोन नंबर वैकल्पिक आहे. या ॲपवर शिवभोजन केंद्र चालकास रोजचा मेन्यू प्रसिध्द करता येतो. " शिवभोजन थाळीची किंमत शहरी भागामध्ये प्रती थाळी रू.५०/- व ग्रामीण भागामध्ये रू.३५/- एवढी असून प्रती ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या रू. १०/- एवढ्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रक्कम अनुदान म्हणून शासनाकडून शिवभोजन चालकास देण्यात येते. दिनांक ०१.०१.२०२० च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्ह्यास शिवभोजन थाळीचा ठराविक इष्टांक देण्यात आला होता. त्यामध्ये वेळोवेळी वाढ करण्यात आली असून सद्यस्थितीत शिवभोजन योजनेचा इष्टांक प्रतीदिन २.०० लक्ष एवढा आहे. कोरोना काळात एकूण ९१३ नवीन शिवभोजन केंद्रांना मंजूरी देण्यात आली असून ३८ कार्यरत शिवभोजन केंद्राच्या थाळीसंख्येत वाढ करण्यात आली आहे. सद्यस्थितीत राज्यात १,५६५ शिवभोजन केंद्र कार्यान्वित आहेत. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मजूर, स्थलांतरीत, बेघर तसेच बाहेरगावचे विद्यार्थी इ. च्या जेवणाअभावी हालअपेष्टा होत असल्यामुळे दिनांक २९.०३.२०२० च्या परिपत्रकान्वये दिनांक १४.०४.२०२१ पर्यंत शिवभोजन थाळी लाभार्थ्यांना रू.५/- मध्ये उपलब्ध करून देण्यात आली. या कालावधीत एकूण ३,६८,१०,७७९ शिवभोजन थाळ्या वितरीत करण्यात आल्या आहेत. तदनंतर शासनाने ब्रेक द चेन अंतर्गत कडक निर्बंध लागु केल्याने गरीब व गरजू जनतेचे जेवणाअभावी हाल होऊ नये म्हणून दिनांक १५.०४.२०२१ पासून दिनांक ३०.०९.२०२१ पर्यंत लाभार्थ्यांना शिवभोजन थाळी नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात आली. दि. १५.०४.२०२१ पासून दि. ३०.०९.२०२१ पर्यंत एकूण २,७०,५१,४७२ एवढ्या शिवभोजन थाळ्या लाभार्थ्यांना नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दि. ०१ ऑक्टोबर, २०२१ पासून







शिवभोजन थाळीचा दर पूर्वीप्रमाणे रू. १०/- प्रतीथाळी असा करण्यात आला आहे. शिवभोजन योजना चालू झाल्यापासून दि. २९.०५.२०२२ पर्यंत ९,८६,१४,९४० एवढ्या शिवभोजन थाळ्या वितरीत करण्यात आल्या आहेत. राज्यात शिवभोजन योजनेची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच कार्यरत शिवभोजन केंद्रावर परिणामकारक नियंत्रण ठेवण्याकरीता शासन निर्णय दि. २७.१२.२०२१ अन्वये राज्यातील सर्व शिवभोजन केंद्रामध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. शिवभोजन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व शिवभोजन केंद्राच्या १०० मीटर परिघामध्ये जिओ फेंन्सिंग सुविधा दि. २२.१२.२०२१ पासून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे शिवभोजन केंद्रचालकांना शिवभोजन केंद्राच्या १०० मीटर परिघामध्येच शिवभोजन योजनेचे व्यवहार (Transactions) करता येतात. शिवभोजन योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत या योजनेवर रू. ३३४.७१ कोटी एवढा खर्च झाला आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात या योजनेसाठी रू. २२०.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे.




## " शिधापत्रिका धोरण व अन्नसुरक्षा योजना

तिहेरी शिधापत्रिका धोरण- "महाराष्ट्र शासनाने दिनांक ०१ मे, १९९९ पासून राज्यामध्ये तिहेरी शिधापत्रिका योजना लागू केली आहे.



## तिहेरी शिधापत्रिकांसाठी निकष

**अ) पिवळया शिधापत्रिकांसाठी निकष :** ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रूपये १५०००/- आहे, अशा कुटुंबाना पिवळया शिधापत्रिका देण्यात येतात.

**अंत्योदय शिधापत्रिका-** या शिधापत्रिका बी.पी.एल लाभार्थ्यामधून अत्यल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबास देण्यात येतात. सदरील शिधापत्रिका विधवा/परित्यक्त्या स्त्रिया अथवा दुर्धर आजाराने ग्रस्त वा अपंग, ६० वर्षावरील वृद्ध, बेघर, कुष्ठरोगी, आदिम आदिवासी कुटुंबे, हातगाडीवरून मालाची ने आण करणारे फळे व फुल विक्रेते, गारुडी, कच-यातील वस्तू गोळा करणारे, निराधार इत्यादी विशिष्ट कुटुंबाना ही शिधापत्रिका दिली जाते.

**ब) केशरी शिधापत्रिकसांठी निकष :** खालील अटींची पूर्तता करणाऱ्या कुटुंबांना केशरी शिधापत्रिका देण्यात येतात :

कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रूपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त नसावे. कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चार चाकी यांत्रिक वाहन नसावे. (टॅक्सी चालक वगळून) कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नावे मिळून चार हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असू नये. प्राधान्य गटातील लाभार्थ्यांकरिता निकष : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अतंर्गत सध्याच्या एपीएल (केशरी) गटातून कमाल वार्षिक उत्पन्न रूपये ५९,०००/पर्यंत उत्पन्न असलेल्या शिधापत्रिकांची प्राधान्य गटातील लाभार्थी म्हणून निवड करण्यात येते.

**क) शुभ्र शिधापत्रिकांसाठी निकष :** ज्या कुटुंबातील सर्व व्यक्तीचे मिळून एकत्रित वार्षिक उत्पन्न रूपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त असेल किंवा त्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चार चाकी यांत्रिक वाहन असेल किंवा कुटुंबातील सर्व व्यक्तीच्या नांवे मिळून चार हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असेल अशा कुटुंबांना शुभ्र शिधापत्रिका देण्यात येतात.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेची अंमलबजावणी-** राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीस दिनांक १ फेब्रुवारी २०१४ पासुन राज्यात सुरुवात झाली आहे. या कायद्यानुसार




प्राधान्य गटातील लाभार्थ्यांना विहित परिमाणानुसार धान्य उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. त्यादृष्टीने अन्नधान्याची साठवणूक व हाताळणी प्रभावीरित्या करण्यासाठी पुरेशी गोदामे उपलब्ध असणे अनिवार्य आहे. गोदामांची साठवणुक क्षमता गरजेच्या तीनपट असावी, अशी केंद्र शासनाची सुचना आहे. त्यानुसार राज्य शासनाने नाबार्डच्या ग्रामीण पायाभुत विकास निधी अंतर्गत कर्जस्वरुपातील अर्थसहाय्याने नविन गोदाम बांधकामांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. - राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदया अंतर्गत एकुण १,६३,०३,८०८ शिधापत्रिका असून लाभार्थी संख्या ७,००,१६,३९२ इतकी आहे.

## शिधापत्रिका धोरण

१.अनाथ मुलांना शिधापत्रिका वितरीत करण्याबाबत. २८ वर्षावरील अनाथांना स्वयंघोषित उत्पन्नाच्या आधारे तात्पुरती पिवळी (बी.पी.एल) शिधापत्रिका वितरीत करून प्राधान्य कुटुंब योजनेतंर्गत लाभ देण्याबाबत तसेच २८ वर्षावरील अनाथांना उत्पन्नाप्रमाणे अनुज्ञेय शिधापत्रिका व त्यावरील लाभ देण्याबाबत शासन निर्णय दिनांक २३.०६.२०२१ अन्वये घेण्यात आला आहे व दिनांक ०१.०९.२०२१ च्या पत्राद्वारे शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबतच्या सुचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. एप्रिल २०२२ पर्यंत राज्यातील एकुण १२९९ अनाथांना शिधापत्रिका वितरीत करण्यात आल्या आहेत.

**२. अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या पिडीत महिलांना तसेच वेश्या व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना शिधापत्रिका देण्याबाबत.**

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था व राज्य एड्स नियंत्रण संस्था यांचेकडील यादीतील स्वयंसेवी संस्थाकडुन अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या पिडीत व वेश्या व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना ओळखीचा पुरावा (Identification Proof) व वास्तव्याचा पुरावा (Residental Proof) सादर करण्यापासुन सुट देऊन अनुज्ञेय शिधापत्रिका वितरीत करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. क्षेत्रीय कार्यालयांनी राज्य एडस नियंत्रण सोसायटीच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्याकडुन देहविक्री करणाऱ्या महिलांची जिल्हानिहाय यादी पत्यासह तात्काळ प्राप्त करून घ्यावी व सदर यादीमधील उर्वरीत सर्व देहविक्री करणाऱ्या महिलांना महिला व बालविकास विभागाचे क्षेत्रीय अधिकारी, संबंधित स्वयंसेवी संस्था व राज्य एड्स सोसायटीचे क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांच्या सहकार्याने विशेष मोहिमेतंर्गत शिधापत्रिका व त्यावर कोरडे अन्नधान्य तातडीने उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच सद्यस्थितीत ज्या देहविक्री करणाऱ्या महिलांकडे शिधापत्रिका नाही, अशा महिलांना कोरडे धान्य वितरीत करण्याची कार्यवाही तातडीने करण्याबाबत दिनांक २९.०३.२०२२ रोजीच्या शासनपत्रान्वये क्षेत्रीय कार्यालयांना सुचना देण्यात आल्या आहेत. आतापर्यंत देहविक्री करणाऱ्या ७४,१०६ महिलांपैकी २५,०९३ महिलांना शिधापत्रिका वितरीत करण्यात आल्या आहेत.



## नवीन गोदामे

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीस दिनांक १ फेब्रुवारी २०१४ पासुन राज्यात सुरुवात झाली आहे. या कायद्यानुसार प्राधान्य गटातील लाभार्थ्यांना विहित परिमाणानुसार धान्य उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. त्यादृष्टीने अन्नधान्याची साठवणुक व हाताळणी प्रभावीरित्या करण्यासाठी पुरेशी गोदामे उपलब्ध असणे अनिवार्य आहे. गोदामांची साठवणुक क्षमता गरजेच्या तीनपट असावी, अशी केंद्र शासनाची सुचना आहे. त्यानुसार राज्य शासनातर्फे नाबार्डच्या ग्रामीण पायाभुत विकास निधी अंतर्गत कर्जस्वरुपातील अर्थसहाय्याने नविन गोदाम बांधकामांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. " डिसेंबर २०२१ अखेर राज्यात अन्नधान्य साठवण्याच्या गोदामांची संख्या ९०३ आणि साठवणूक क्षमता ६९९५९२.४ मे.टन इतकी होती. गोदामांची

क्षमता गरजेच्या तिप्पट असावी अशी केंद्र शासनाची सुचना आहे. नोव्हेंबर २०१९ ते आजपर्यंत ८३,४०० मे.टन क्षमतेच्या ५७ नवीन गोदामांच्या बांधकामांना मान्यता देण्यात आली व यासाठी १८७.२१ कोटी रुपयांचा निधीही वितरीत करण्यात आला आहे.



**धान खरेदी–** १) पणन हंगाम २०१९-२० (खरीप+ रब्बी) मध्ये ४,०४,६८४ शेतक-यांकडून २७२.१४ कोटी क्विंटल धान/भरडधान्याची खरेदी करण्यात आली असून सदर धान्याचे रुपये ३३९३.१३ कोटी व प्रोत्साहनपर राशीची रुपये ८६० कोटी अशी एकूण रुपये ४२५३.२३ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांना ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यात आली आहे. पणन हंगाम २०२०-२१ (खरीप + रब्बी) मध्ये ६,४८,३३८ शेतक-यांकडून २०३.५१ कोटी क्विंटल धान/ भरडधान्याची खरेदी करण्यात आली असून सदर धान्याचे रुपये ३८२८.४१ कोटी व प्रोत्साहनपर राशीची रुपये ९४१.५९ कोटी अशी एकूण रुपये ४७७०.०० कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांना ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यात आली आहे. पणन हंगाम २०२१-२२ (खरीप) मध्ये ४,८६,७०५ शेतक-यांकडून १३७.८३७ कोटी क्विंटल धान/ भरडधान्याची खरेदी करण्यात आली असून सदर धान्याची रुपये एकूण रुपये २६८८.९५ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांना ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यात आली आहे.

**भरडधान्य खरेदी–** राज्यामध्ये ज्वारी, बाजरी, मका, रागी या भरडधान्यास किमान आधारभूत किमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदीस मान्यता देण्यात आली आहे. " सन २०१९-२०२० मध्ये ८६,१३४ क्विंटल ज्वारी खरेदी करण्यात आली आहे. सन २०१९-२०२० मध्ये मक्याची विक्रमी ११,५१,१५६ क्विंटल खरेदी झाली आहे. सन २०२०-२१ पासून राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत गहू खरेदीस मान्यता देण्यात आलेली आहे.

## अन्नधान्य वितरण

**अ. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना : १ व २–** लॉकडाऊन काळातील मोफत अन्नधान्य वितरणासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची" अंमलबजावणी एप्रिल, २०२० पासून सुरु केली. इा योजनेंतर्गत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अन्नधान्याव्यतिरिक्त प्रतीमाह प्रती सदस्य ५ किलो अन्नधान्य व प्रतीमाह प्रती कुटुंब १ किलो डाळ याप्रमाणे अन्नधान्य वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. योजनेंतर्गत माहे एप्रिल २०२० ते नोव्हेंबर २०२० या कालावधीकरिता राज्यातील ७ कोटी लाभार्थ्यांना प्रतीमाह ३ लाख ५० हजार मे. टन अन्नधान्य व १५ हजार ३४० मे. टन डाळ मोफत वितरीत करण्यात आली आहे. प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेतील राज्यामधील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना जुलै ते नोव्हेंबर, २०२०



या कालावधीकरिता अखख्या चण्याऐवजी दरमहा प्रत्येक शिधापत्रिकाधारकास एक किलो मोफत चणाडाळ वितरीत करण्याचा निर्णय घेतला आहे.

**ब) APL केशरी धान्य वितरण–** कोरोना लॉकडाऊन काळातील सवलतीच्या दराने अन्नधान्य राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना व शेतकरी योजनेअंतर्गत समाविष्ट न झालेल्या परंतु ज्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न १ लाखापर्यंत आहे अशा ३ कोटी ०८ लाख ४४ हजार ०७६ एवढ्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना माहे मे ते ऑगस्ट,२०२० या कालावधीकरिता सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात आला. या योजनेचा आर्थिक भार शासनाने स्वत: स्विकारुन अडचणीच्या काळात गरीब जनतेला मदत करण्याची भूमिका स्विकारली आणि अंमलात आणली. या निर्णयानुसार प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक महिन्याला ३ किलो गहू (रु.८/- प्रती किलो) व २ किलो तांदूळ (रु. १२/- प्रती किलो) याप्रमाणे अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सन २०२१ मध्ये कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील वर्षीच्या) APL केशरी योजनेअंतर्गत शिल्ल्क असलेल्या २५००० मेट्रिक टन अन्नधान्य वितरणास परवानगी देण्यात आली. या योजनेनुसार माहे जून २०२१ या एक महिन्यासाठी


प्रति व्यक्ती ०१ किलो गहू व०१ किलो तांदुळ APL केशरी शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्यात आला.

**क) आत्मनिर्भर योजना–** आत्मनिर्भर योजनेअंतर्गत रेशनकार्ड नसलेल्या गरजू नागरिकांना माहे मे पासून ऑगस्ट पर्यंत प्रतिव्यक्ती प्रतीमाह ५ किलो मोफत तांदुळ व प्रती कुटुंब प्रतीमाह १ किलो अख्खा चना वितरण केले. आत्मनिर्भर योजनेअंतर्गत माहे मे २०२० ते जुलै–२०२० दरम्यान लाभार्थ्यांना २४,१२९ मे.टन धान्य वितरण करण्यात आले. लॉकडाऊन काळात अनेक स्वयंसेवी संस्था गरजू लोकांना अन्नधान्य वितरण व अन्नछत्र चालवित होत्या त्यांना ओएमएसएस (open market sale scheme) अंतर्गत एफसीआय मधून रू. २१/– प्रतिकिलो गहू व रू. २२/– प्रतिकिलो तांदुळ उपलब्ध करून देण्यात आले.

**माहे नोव्हेंबर, २०१९ ते मे, २०२२ या कालावधीत घेतलेल्या लोकाभिमुख व लोक उपयुक्त महत्वाच्या निर्णयाची माहिती**

माहे जुलै २०२१ मध्ये विशेषत: दि. २२ व २३ जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसह कोल्हापूर, सातारा व सांगली या जिल्हयांमध्ये बाधित कुटुंबांना प्रतिकुटुंब १० किलो गहू व १० किलो तांदूळ व ५ लिटर केरोसीन तसेच ५ किलो तूरडाळ मोफत उपलब्ध करुन देण्याबाबतचा शासन निर्णय दि. २४ जुलै, २०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. झ शासन निर्णय दिनांक ६ जुलै, २०१९ अन्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये सवलतीच्या दराने अन्नधान्य मिळण्याकरिता नवीन पात्र लाभार्थ्यांची निवड करताना दिनांक ३०.०६.२०१९ पर्यंतच्या योग्य व गरजू असलेल्या पात्र शिधापत्रिकाधारकांचा समावेश करण्यात आला होता. परंतु शासन निर्णय क्र. असुका२०२१/प्र.क्र. ६५/नापु–२२ दि. १५.०९.२०२१ च्या शासन निर्णयान्वयेcutoff Date बाबतचे दि. १३.१०.२०१६ व दि. २१.०५.२०१८ (हमीपत्रासह), ६.७.२०१९ चा शासन निर्णय रद्द करण्यात आला असून क्षेत्रीय कार्यालयाकडे वेळोवेळी उपलब्ध असलेल्या शिधापत्रिकाधारकांमधून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. झ राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाने ७ कोटी एवढया लाभार्थ्यांचा इष्टांक दिला आहे. राज्यातील शिधापत्रिकाधारकांचे आधार क्रमांक शिधापत्रिकांशी संलग्न करुन RCMS प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर प्रणालीवरील सद्यस्थितीत सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांची संख्या विचारात घेऊन दि. १८.०२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत जिल्हानिहाय इष्टांकात सुधारणा करण्यात आली आहे.


**अन्नधान्य वितरण :**



राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी १ फेब्रुवारी २०१४ पासून करण्यात आली. यामध्ये शहरी क्षेत्रामध्ये ज्या कुटुंबांचे सर्व मार्गाने मिळणारे एकत्रित उत्पन्न रुपये ५९,०००/- च्या आत आहे अशा कुटुंबातील प्रत्येक सदस्यास रास्त दरात ५ किलो धान्य पुरवठा केला जातो. यामध्ये गहू ३ किलो (प्रती किलो रुपये २/–या दराने) व तांदूळ २ किलो (प्रती किलो रुपये ३/–या दराने) या प्रमाणे पुरवठा केला जातो. ही उत्पन्न मर्यादा ठरवून देताना शहरी लोकसंख्येच्या ४५.३४% व्यक्तींना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये लाभार्थी म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. ग्रामीण भागात, ज्या कुटुंबाचे एकत्रित उत्पन्न रु.४४,०००/– च्या आत आहे अशा कुटुंबीयांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ देण्यात येत आहे. ही उत्पन्न मर्यादा ठरवून देताना ग्रामीण लोकसंख्येच्या ७६.३२% व्यक्तींना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये लाभार्थी म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे.

**बायोमॅट्रीक ओळख पटवून धान्य वितरण :**

अंत्योदय व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना त्यांचा ePOS मशीनवर अंगठा लावून बायोमॅट्रीक ओळख पटवून धान्य पुरवठा केला जातो. शिधापत्रिकाधारकांना त्यांच्या शिधापत्रिकेवर किती धान्य देय आहे व त्यापोटी किती रक्कम दयावयाची आहे याची माहिती ई–पॉस मशीन मधून निघणाऱ्या पावतीव्दारे शिधापत्रिकाधारकांना सहज मिळत आहे. त्यामुळे शिधापत्रिकाधारकांच्या फसवणूकीस आळा बसलेला आहे.



**सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्नधान्याच्या वाहतूकी दरम्यान आलेली पारदर्शकता :**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गहू व तांदूळाची उचल भारतीय खाद्य निगमच्या गोदामामधून केली जाते.

अन्नधान्याची वाहतूक करणा-या वाहनांची ओळख व्हावी म्हणून सर्व वाहनांना हिरव्या रंगाचे कलर कोडींग बंधनकारक करण्यात आलेले आहे. व त्यावर सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरण करावयाचे धान्य अशा स्वरुपाचे फलक देखील लावण्यात आले आहेत. अन्नधान्याची भारतीय खाद्य निगमच्या गोदामातून उचल झाल्यापासून ते अधिकृत शिधावाटपदुकानापर्यंत पोहोच होईपर्यंत अन्नधान्याचे अपवहन होऊ नये यासाठी अन्नधान्याची वाहतुक करणाऱ्या प्रत्येक वाहनांवर जीपीएस यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

## बायो डिझेल धोरण




केंद्र शासनाच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायुमंत्रालयाने परिवहन उद्देशाकरिता हायस्पिड डिझेल सोबत मिश्रणाकरिता बायोडिझेल विक्रीबाबत दि. ३०.०४.२०१९ रोजी निर्गमित केलेल्या "Guidelines for sale of Biodiesel for blending with high speed diesel for transportation purpose- २०१९" अधिसूचना निर्गमित केली आहे. त्यास अनुसरुन राज्यात बायोडिझेल उत्पादन, साठवणूक, पुरवठा व विक्री यासंदर्भात सर्वंकष धोरण दि. ११ मे, २०२१ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहे.

**बनावट डिझेल/बायोडिझेल अवैध विक्रीस प्रतिबंध करण्यासाठी विभागाची विशेष मोहिम :**

**बायोडिझेल धोरण–** २०२१ नुसार कोणतेही परवाने राज्य शासनाकडून देण्यात आलेले नसतानाही बायोडिझेल, बनावट डिझेल, डिझेल सदृश्य पदार्थ व सॉल्वंट सदृश्य पदार्थांची अवैधरित्या साठवणूक, व्यापार, वाहतूक, उत्पादन, पुरवठा व विक्री होत असल्याचे आढळून येत आहे. राज्यात अनेक ठिकाणी बनावट डिझेल/बायोडिझेलची अवैध विक्री होत असून त्यातून करचुकवेगीरी होत असल्याने राज्याचा प्रतिदिन अंदाजे रु. २.०८ कोटी इतका कर बुडत असल्याने तपासणी मोहिमेमध्ये बनावट डिझेल अथवा अवैध बायोडिझेलची विक्री करणाऱ्यांविरुध्द तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दि. १८.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आले. यासंदर्भात मा. मंत्री (अनापुवग्रास) यांचे स्तरावर बैठका घेण्यात येऊन सर्व संबंधित यंत्रणांना आवश्यक ते निर्देश देण्यात आले. यासंदर्भात दिनांक १२.११.२०२१ रोजी केंद्र शासनाच्या नियंत्रण आदेशांच्या तरतूदींचे संकलन करून अवैध बायोडिझेल/डिझेल/पेट्रोलियम पदार्थ यांच्या विक्रीस आळा घालण्यासंदर्भातील सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या. तसेच याबाबत सर्व संबंधित विभागांचा/यंत्रणांचा समन्वय आवश्यक असल्याने मा. मुख्य सचिव यांच्याकडे दि. १६.११.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत यांसदर्भातील कारवाईच्या अनुषंगाने निर्देश देण्यात आले. त्यानुसार बायोडिझेल धोरणात आवश्यक ते बदल करण्याबाबत विभागस्तर व मा. मंत्री महोदयांचे स्तरावर केंद्र शासनाच्या नैसर्गिक गॅस व पेट्रोलियम मंत्रालय तसेच वित्त विभागास विनंती करण्यात आली आहे.



## नवीन रेशन दुकाने :

नवीन शिधावाटप/रास्त भाव दुकान परवाना मंजुर करण्यासाठी वर्षातून दोन वेळा अनुक्रमे जानेवारी व जुलै महिन्यामध्ये जाहीरनामे प्रसिध्द करून रास्त भाव दुकाने मंजूर करता येऊ शकतील असा कालबध्द कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. महिलांचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने नवीन रास्तभाव दुकाने ही स्वयंसहायता महिला बचत गटांना मंजुर करावयाची आहेत.

## नवीन उपक्रम:

१. कोरोना काळात झालेल्या रक्ताच्या तुटवड्यामुळे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात रक्तदान शिबिराचे आयोजन.. २. पुरवठा भवन येथील उपसंचालक व गोदाम वाहतुक येथील शासकीय इमारतीवर वीजेच्या बचतीसाठी सौरउर्जा यंत्रणा ३. सर्व कर्मचारी/अधिकारी यांना वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाविषयी पुरेपुर माहिती असावी या दृष्टीकोनातून दर सोमवारी सकाळी ११.०० वाजता शासन निर्णय वाचन करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे.

■■

## धनंजय मुंडे, सामाजिक न्यायमंत्री, महाराष्ट्र राज्य

# सामाजिक न्याय विभागाचे ठळक निर्णय

इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक उभारणीच्या कामाचे संनियंत्रण सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग करण्यात आले. या स्मारकाची उंची १०० फुटाने वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, विभागामार्फत दर आठवड्याला अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून कामाचा आढावा घेतला जातो. सदर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. येथे बसवण्यात येणाऱ्या ३५० फुटी पुतळ्याची २५ फुटी प्रतिकृती शिल्पकार राम सुतार यांनी तयार केली असून, त्यात काही त्रुटी दुरुस्त करण्यास सांगितल्या आहेत. त्या पूर्ण झाल्यानंतर मूळ पुतळ्याच्या निर्माणाचे काम हाती घेतले जाईल. नुकतीच या प्रतिकृतीची गाजीयाबाद येथे जाऊन पाहणी केली. स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी मोठ्या शहरापासून महाविद्यालयाचे अंतर ५ किमी वरून वाढवून १० किमी पर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर आता तालुका स्तरावर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना देखील स्वाधार योजनेचा लाभ घेता येणार आहे. या योजनेतील लाभार्थी विद्यार्थी संख्या २५ हजार वरून वाढवून ३० हजार करण्यात आली आहे. योजनेतील सन २०१८-१९ पासून थकीत असलेली देयके पूर्ण अदा करण्यात आली आहेत.

ग्रामीण व शहरी भागातील गाव-वाड्या-वस्त्यांची जातीवाचक नावे रद्द करून त्यांना समताधिष्ठित किंवा महापुरुषांची नावे देण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामविकास, नगरविकास, महसूल आदी विभागांशी समन्वय साधून गाव-वस्त्यांची जातीवाचक नावे कायमची हद्दपार व्हावीत, यादृष्टीने विभागीय स्तरावर कार्यपद्धती अंतिम करण्यात येत आहे.

राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या निकषात बदल करून आता वेटिंग लिस्टमधील विद्यार्थ्यांचा देखील विचार केला जात आहे. प्रथमच या योजनेचा कोटा १००% पुर्ण झाला आहे. या योजनेचा लाभ घेऊन परदेशात शिक्षण पूर्ण केल्यानंतर देशात परत येऊन काम करावे लागेल, ही अट रद्द करून विद्यार्थ्यांना परदेशात कामाचा अनुभव घेता यावा, यासाठी 'पोस्ट स्टडी वर्क व्हिसा' मिळवून देण्यासाठी राज्य सरकार नाहरकत प्रमाणपत्र देणार आहे. एका एसएमएस वर यादीतील विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवले जात आहेत.



परदेश शिष्यवृत्ती २०२०-२१ साठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना लॉकडाऊन काळात देशात किंवा परदेशात अडचण येऊ नये, यासाठी विद्यपीठे बंद असताना देखील ऑनलाईन शिक्षण व उपस्थिती ग्राह्य धरून परदेश शिष्यवृत्ती देयकांचा लाभ देण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक जयस्तंभाला दि. ०१ जानेवारी, शौर्यदिनानिमित्त दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन करण्याची जबाबदारी सामाजिक न्याय विभागाने घेतली आहे. त्याचबरोबर येथे आयोजित केल्या जाणाऱ्या सर्व अल्प व दीर्घकालीन उपक्रमांचे तसेच जयस्तंभ परिसराचा विकास व सुशोभिकरण करण्याची जबाबदारीही सामाजिक न्याय विभागाने घेतली आहे. या विकासकामांचा १०० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीत एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. मुंबई येथील पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सिद्धार्थ महाविद्यालयास १२.७९ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला. महाविद्यालय इमारत, ग्रंथालय आदींच्या विकासासाठी हा निधी उपयोगात आणला जात आहे.

राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या आहेत. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक समाजकार्य महाविद्यालय उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

महाआवास अभियान २०२०-२१ अंतर्गत दीड लाख घरकुलांना रमाई आवास योजनेचा प्रत्यक्ष निधी देऊन विहित वेळेत बांधकाम पूर्ण केले. यावर्षीच्या महाआवास अभियानात देखील सामाजिक न्याय विभाग सहयोग देणार आहे. रमाई आवास योजनेचे यावर्षी सव्वा लाख घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी इयत्ता सहावीपासून प्रत्येक जिल्ह्यातील एका निवासी शाळेत सीबीएसई शाळा सुरू करून पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार आहे. औरंगाबाद येथे सामाजिक न्याय विभागाच्या ११ एकर जागेत एक पंचतारांकित शाळा उभारून पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या कोल्हापूर येथील स्मृतिस्थळी विविध विकासकामे व सुशोभिकरण करण्यासाठी १२ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या १०० व्या स्मृतिदिनी कोल्हापूर जिल्ह्यात विशेष स्मृतीशताब्दी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, यासाठी स्वतंत्र ५ कोटी रुपये निधी देण्यात आला.

मातंग समाजाचे मागासलेपण दूर व्हावे, यासाठी समाजाचा बारकाईने अभ्यास होऊन सद्यस्थिती समोर यावी, यासाठी क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोगाचे पुनर्गठन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित वसतिगृहातील स्वयंपाकी, चौकीदार, मदतनीस व सफाई कामगार आदी कर्मचाऱ्यांच्या मानधनात १५ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. ८१०४ कर्मचाऱ्यांना या निर्णयाचा थेट लाभ होणार आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे, या योजनेंतर्गत ५०० पेक्षा अधिक अनुसूचित जातीतील लोकवस्ती असलेल्या ठिकाणी ४० लाख रुपये खर्चुन 'संविधान सभागृह' बांधण्यास निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. संविधान सभागृहात सभागृह, अभ्यासिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील साहित्य, ग्रंथालय, इंटरनेट आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या कामांना कोविडविषयक निबंधांच्या अनुषंगाने टप्याटप्प्याने निधी उपलब्ध करून दिला जात आहे. या योजनेच्या निधी वितरण प्रक्रियेत, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटक लोकवस्तीतील लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रमाई आवास योजनेंतर्गत राज्यातील ग्रामीण भागात १ लाख १३ हजार ५७१ तर शहरी भागात २२ हजार ६७६ घरकुल बांधणीच्या उद्दिष्टास मंजुरी देण्यात आली आहे.

मागील दोन वर्षांच्या काळात दोन्ही लॉकडाऊनमध्ये विभागाने संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, विधवा निवृत्तिवेतन योजना व दिव्यांग निवृत्तिवेतन योजना या पाचही योजनांतील सुमारे ३५ लाख लाभार्थ्यांना तीन महिन्यांचे मानधन एकत्रित ॲडव्हान्स (आगाऊ) दिले.

दिव्यांग व्यक्तींना कोविडचा धोका अधिक असतो, याचा विचार करून दिव्यांग व्यक्तींना रेशन, बँकिंग आदी ठिकाणी रांगेत उभे न राहता थेट सेवा मिळावी, यासाठी राज्यव्यापी निर्णय घेण्यात आला.

कोविडच्या दोन्ही लाटांमध्ये सर्व महापालिका व जिल्हा समाजकल्याण कार्यालयांमध्ये २४ तास कार्यरत असलेल्या मदत कक्षांच्या माध्यमातून दिव्यांग व एकटे राहणारे ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी मदतकार्य करण्यात आले.

दिव्यांग व्यक्तींचे प्राधान्याने लसीकरण केले जावे, यासाठी स्वतंत्र लसीकरण केंद्र उभारणे किंवा आठवड्यातील एक दिवस केवळ दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यासाठी आरोग्य विभागाच्या मदतीने निर्णय घेण्यात आला.



दिव्यांगांच्या सर्व शाळांमध्ये 'दिव्यांगत्वाचे शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्र' व्हाव्यात, यासाठी दिव्यांग शाळेतील शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांना यासाठीचे ५ दिवसीय विशेष प्रशिक्षण देण्यात आले. अनुदानित संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांग शाळा व विशेष शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर शिफारशी लागू करण्यातील त्रुटी दूर करण्यासाठी विशेष उपसमिती स्थापन करण्यात आली. दिव्यांग व्यक्तींना विशेष सहाय्यक उपकरणे मोफत मिळावीत, यासाठी दानशूर व्यक्ती/संस्था व गरजू दिव्यांग यांची एकत्र सांगड घालणारे 'महाशरद' हे पोर्टल सुरू करण्यात आले. या पोर्टल वर देण्यात येणाऱ्या देणग्या/मदत करमुक्त आहेत.

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील कर्ता व्यक्ती मरण पावल्यास राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेंतर्गत २० हजार रुपये एकरकमी मदत केली जाते. कर्ता व्यक्ती मरण पावल्यापासून एक वर्षाच्या आत अर्ज केला जावा, हा पूर्वीचा नियम बदलून आता अर्ज करण्याची मुदत तीन वर्षांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

कोविडच्या दोन्ही लाटेत शासकीय सेवेत असणाऱ्या अदिव्यांग अधिकारी-कर्मचाऱ्यांना दळणवळण सुविधा सामान्य होईपर्यंत कार्यालयीन उपस्थितीतून सूट देण्याचा

निर्णय घेण्यात आला.

सफाई कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी राज्य शासन स्तरावर स्वतंत्र कार्यासन (स्वतंत्र कक्ष) निर्माण करण्यात आले. हाताने गटार साफ करणे (manual scavenging) आता बंद करून लाड-पागे समितीच्या शिफारशी व कालानुरूप बदल लक्षात घेऊन सुधारित शासन निर्णय करण्यात येईल.

दूषित गटारांमध्ये काम करताना मृत्यू पावलेल्या हाताने



मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आला. मागील तीन वर्षात हाताने मैला उचलणाऱ्या कामगारांच्या कुटुंबियांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मॅन्युअल स्कॅव्हेंजर कायद्यांतर्गत १० लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, यासाठी सक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे.

समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर व सामाजिक न्याय विभागाच्या प्रयत्नातून देशातील पहिले मोफत ऑटिझम सेंटर व सेंसरी पार्क लातूरमध्ये उभे करण्यात आले. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक ऑटिझम सेंटर व बाल मानसोपचार केंद्र उभारण्याचे प्रस्तावित केले आहे.

दिव्यांगत्वाच्या २१ प्रकारानुसार, दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना एका क्लिकवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी अद्ययावत वेब मोबाईल ॲपची निर्मिती करण्यात येत आहे.

जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रक्रिया पासपोर्टच्या धर्तीवर ऑनलाईन पूर्ण व्हावी व नागरिकांना कार्यालयात माराव्या लागणाऱ्या चकरा कमी व्हाव्यात, यासाठी बार्टीमार्फत नियोजन करून जिल्हानिहाय जात पडताळणी समित्या स्थापन केल्या आहेत. प्रत्येक महिन्याला प्रलंबित प्रकरणांची तपासणी करून महिना अखेरच्या आत त्या महिन्यातील प्रकरणे निकाली काढण्यात येतात.

बार्टीमार्फत यूपीएससी व एमपीएससी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लॉकडाऊन काळात विशेष ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. सन २०२० मध्ये बार्टीचे ९ तर २०२१ मध्ये १४ विद्यार्थी यूपीएससी परीक्षेत यशस्वी झाले. सन २०२०-२१ मध्ये ८० हजार विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले.

बार्टी मार्फत पोलीस भरती व अन्य रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले. सन २०२०-२१ मध्ये ३.२० लाख विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले.



एमफिल व पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी BANRF (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन अधिछात्रवृत्ती) २०२०-२१ मध्ये अर्ज करून पात्र ठरलेल्या सर्व ४०८ विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला. दरवर्षी ही अधिछात्रवृत्ती १०५ विद्यार्थ्यांना दिली जाते. मात्र कोविड काळात पैशामुळे कोणाचेही शिक्षण बंद पडू नये, यासाठी विशेष बाब म्हणून हा निर्णय घेण्यात आला.

कोविडच्या काळात बार्टीच्या ऑनलाइन यूट्यूब चॅनलवरून एमपीएससी पूर्व व मुख्य परीक्षेचे ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन दिले गेले. या प्रशिक्षणाचा १४.६८ लाख विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

बार्टीमार्फत बँकिंग, रेल्वे, पोलीस भरती तसेच कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकऱ्यांच्या दृष्टीने राज्यातील ३० केंद्रांवर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रतिमहिना ६ हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. तसेच पोलीस भरती करणाऱ्या विद्यार्थ्यांना बूट व अन्य साहित्य खरेदीसाठी प्रत्येकी ३ हजार रुपये देण्यात येतील. ३० केंद्रावरून दोन सत्रात ६०० प्रमाणे दरवर्षी एकूण १८ हजार विद्यार्थ्यांना अशा रितीने पाच वर्षात ९० हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचा कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे.

'बार्टी' च्या सर्व योजना एका क्लिकवर मिळाव्यात,

यासाठी ई-बार्टी हे मोबाईल ॲप सुरू करण्यात आले.

ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने असलेल्या ऊसतोड कामगारांची आजपर्यंत शासन दरबारी नोंदही नव्हती. महामंडळाच्या माध्यमातून त्यांच्या कल्याणासाठी विविध





योजना व उपक्रम राबविण्यात येत आहेत.

लॉकडाऊन काळात राज्यभरात अडकलेल्या सुमारे दीड लाख ऊसतोड कामगारांना कोविडविषयक आरोग्य तपासणी करून सुखरूप घरी पाठविण्यासाठी दि. १७ एप्रिल २०२० रोजी विशेष शासन निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार, एसटी बस, कारखान्याने दिलेले वाहन आदींचा वापर करून एप्रिल २०२० मधील कडक लॉकडाऊनच्या काळातील राज्यातील सर्वात मोठे व यशस्वी स्थलांतर करण्यात आले. दीड लाख ऊसतोड कामगारांच्या स्थलांतरादरम्यान एकही जण कोविड बाधित झाल्याची घटना किंवा अन्य कोणतीही दुर्घटना घडली नाही.

महामंडळाला इतर कोणत्याही योजनेचा निधी कपात न करता कायम निधी उपलब्ध व्हावा यासाठी ऊस खरेदीवर प्रतिटन १० रुपये अधिभार लावण्यात येईल व यातून जितकी रक्कम जमा होईल, तितकीच रक्कम राज्य सरकार देणार आहे. याद्वारे महामंडळाचे कामकाज चालणार आहे. पुणे येथे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचे कार्यालय स्थापन करण्यात आले आहे.

ऊसतोड कामगार कल्याण महामंडळांतर्गत संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेला मंजुरी देण्यात आली. राज्यातील १० जिल्ह्यात ४१ तालुक्यात ८२ वसतिगृहे उभारण्यात येणार असून १०० मुले किंवा १०० मुली अशी वसतिगृहाची क्षमता असणार आहे. यातील २० वसतीगृहे पहिल्या टप्प्यात उभी करण्यात आली आहेत. ऊसतोड कामगारांची गाव स्तरावर नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. ऊसतोड कामगारांची ग्रामसेवक किंवा तत्सम यंत्रणेकडून नोंदणी करून त्यांना ओळखपत्र दिले जाईल. ही प्रक्रिया गतिमान करण्यासाठी आता डिजिटल यंत्रणेचा वापर होणार आहे. ऑनलाईन पोर्टल/ॲपच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांची नोंदणी करण्यास सुरुवात झाली आहे.

संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेच्या पहिल्या टप्प्यात १० तालुक्यातील २० वसतिगृहे सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात उभारण्यास मान्यता देण्यात आली असून, नामांकित शाळा/महाविद्यालयांच्या जवळ भाडे तत्त्वावरील इमारतीमध्ये ही वसतिगृहे उभारण्यात येतील. यासाठी आवश्यक मनुष्यबळ भरती करण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे. भाडेतत्त्वावर इमारती अधिग्रहित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून येत्या शैक्षणिक वर्षात ही वस्तीगृहे उपलब्ध असणार आहेत.

महामंडळाचे राज्यस्तरीय मुख्य कार्यालय पुण्यातील सामाजिक न्याय भवनात सुरू करण्यात आले आहे. नुकतेच याचे उद्घाटन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.

तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यात आली. विभागीय स्तरावर तृतीयपंथीयांसाठी



काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांचा समावेश करून तृतीयपंथीयांची नोंदणी करणे सुरू आहे. तृतीयपंथीयांसाठी बीज भांडवल योजना, निवासी वसतिगृह सुरू करणे प्रस्तावित केले आहे.

संत रोहिदास चर्मकार महामंडळांतर्गत 'मेगा लेदर फुटवेअर अँड एक्सेसरीज' हा विशेष प्रकल्प राबविण्याची



कार्यवाही सुरू आहे. रत्नागिरी जिल्ह्यात ५० एकर जागेत महाराष्ट्रातील हा पहिला प्रकल्प साकारला जात आहे. यासाठी केंद्र सरकार ५०% व राज्य सरकार ५०% निधी देणार आहे. राज्यात हा प्रकल्प जास्तीत जास्त ठिकाणी राबवून रोजगार निर्मिती कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. या महामंडळाचे भागभांडवल ७३ कोटीवरून वाढवून यावर्षीपासून १ हजार कोटी करण्यात आले आहे.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व महाप्रीत कंपनीच्या वतीने ग्रामीण भागात कृषि उत्पादने, सौर उर्जा



आदी नाविन्यपूर्ण उद्योगांमधून रोजगार निर्मिती व्हावी, यासाठी महामंडळाच्या सर्व प्राधिकृत अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मागासवर्ग विकास महामंडळाच्या माध्यमातून रोजगारासाठी संधी निर्माण करणे व अर्थसहाय्य या बाबी हाती घेतल्या जात असून, महामंडळाचे भागभांडवल देखील वाढवून १ हजार कोटी करण्यात आले आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे भागभांडवल ३०० कोटी वरून वाढवून १ हजार कोटी करण्यात आले आहे.

दिव्यांग वित्त व कल्याण महामंडळाचे भांडवल ५० कोटी वरून वाढवून ५०० कोटी करण्यात आले आहे.

मेहतर समाजाच्या मागण्या व समस्या दूर करण्यासाठी अभ्यास आयोग नेमण्यात आला आहे. याअंतर्गत बार्टीमार्फत सर्वेक्षण सुरू करण्यात आले.

केंद्राची मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक कृती योजना राज्यात राबविण्यात येणार आहे. अंमली पदार्थ तस्करी बंद व्हावी, या दृष्टीने मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृती योजना ही योजना राबविण्यासाठी १३ कोटी ७० लाख रुपये निधी खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

राज्यातील कैकाडी समाजावर असलेल्या क्षेत्र बंधनामुळे



त्यांना राज्यातील काही भागात अनुसूचित जाती घटकांसाठी असलेले लाभ मिळत नव्हते. त्यामुळे क्षेत्र बंधन उठवण्याचा प्रस्ताव शिफारसीसह केंद्राकडे पाठविण्यात आला आहे.

कोविड काळात ऑनलाईन पद्धतीने MITCON, MCED या संस्थांच्या तज्ञ मार्गदर्शकांकडून वेबिनार द्वारे विविध उद्योगांसाठी मार्गदर्शन उपक्रम आयोजित करण्यात आले. अनेक नवउद्योजकांनी याचा लाभ घेतला.

दिव्यांग व्यक्तींना राज्य व केंद्र सरकारच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली नोंदणी करून वैश्विक ओळखपत्र (UDID Card) सहजरीतीने उपलब्ध व्हावे, यासाठी आरोग्य विभागाच्या समन्वयाने दि. १२ डिसेंबर २०२१ पासून राज्यव्यापी मोहीम हाती घेतली, याद्वारे सुमारे एक लाख दिव्यांग व्यक्तींची नोंदणी पूर्ण झाली असून हे अभियान आणखी तीन महिन्यांसाठी सुरूच राहणार आहे.

■■

# भाजप व मोदींनीच महागाई वाढविली

**विद्याताई चव्हाण**
**प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी महिला काँग्रेस**

महंगाई मार गई...! Inflation...!महागाई...! प्रचंड प्रमाणात वाढ झाल्यानंतर सुद्धा महागाईने होरपळणारे लोक गप्प बसून महागाईच्या झळा सोसत आहेत ! मध्यमवर्गीय, कष्टकरी, गरीब कधीतरी वाढलेले भाव कमी होतील या अपेक्षेने महागाईचा मारा सहन करत आहेत! पण, वाढलेली महागाई कमी व्हायचं नाव घेत नाही,२०१३ ड़ २०१४ ला मोदींनी महागाईच्या मुद्द्यावरून संपूर्ण देशातील वातावरण ढवळून काढले, मनमोहन सिंग सरकारमध्ये भ्रष्टाचाराचा भस्मासुर आणि महागाईची हवा निर्माण करण्यात आला. टीव्हीवरील जाहिरातीतून मनमोहन सिंग सरकारला बदनाम करण्यात आलं, मोदीच्या भाषणातून भ्रष्टाचार व महागाई, त्याला अण्णा हजारेच्या आंदोलनाने भडकवत ठेवले.मिडियाने त्यांची प्रतिमा दुसरे गांधी असल्याचे भासवून भाजपा, आरएसएस + सोशल मीडियाने चहुबाजुनी हल्ला चढवत 'यूपीएला' बदनाम केलं. हे आरोप खोटे आहेत, हे खोडून काढण्यात युपीए कमी पडले. कदाचित खोटे आरोप खरे वाटायला लागले व कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा....? जाहिराती अधिक मारक व प्रभावी ठरल्या, स्मृती इराणी, जेटली, सुषमा स्वराज, प्रकाश जावडेकर आमचे सरकार आले तर डिझेल-पेट्रोल ३० ते ३५ रुपये करू !२ कोटी रोजगार देऊ अनेक भूलथापा ! सोशल मीडियातून मोठ्या प्रमाणात युवक युवतींना मोदींवर विश्वास वाटायला लागला कान आणि डोळे बंद करून अंधविश्वास ठेवून मोठ्या प्रमाणात मतदार भाजपाकडे वळवण्यात यशस्वी झाले. भाजपा सत्तेत आल्यावर रोज नवीन नाटक करून मोदींची भुलभुलैया करणारी भाषण सुरूच होती. संसदेच्या पायावर डोके ठेवून सुरुवात केली खरी, आज तेच संसद भवन उद्ध्वस्त केले जात आहे. मेरा क्या, मैं फकीर झोला लेकर चल पडँगा...! म्हणत १५ एकरात १५ हजार कोटीचा राजमहल अंडरग्राउंड बंकर्स, सह डायरेक्ट एअरपोर्टवर जाण्याची व्यवस्था,स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास नष्ट करून,'अमर जवान ज्योती' मिटवून हलवण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

मोगलांपासून आज पर्यंत अनेक बादशहा, राजे झाले,अनेक वास्तू उभ्या राहिल्या, इतिहासाच्या साक्षीदार असलेल्या हेरिटेज वास्तू तोडण्यात आल्या. नॅशनल म्युझियम, कृषी भवन, नेहरू भवन तोडून आपण काहीतरी नवीन करतो आहोत असं म्हणत, देशभरातील स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या हेरिटेज वास्तू. जगातील उत्कृष्ट म्हणून प्रसिद्ध असलेला राजपथ, हेरिटेज वास्तुच,मोकळा हवेशीर परिसर संसदभवनाचे महत्त्व संपविण्यासाठी, जास्त संख्या वाढलेल्या खासदारांना संसद भवन अपुरी आहे. त्या देखण्या ऐतिहासिक महत्त्व असलेल्या पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, राजेंद्रप्रसाद, मौलाना आजाद, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बरोबरच असंख्य विद्वान, अभ्यासू लढाऊ नेत्यांच्या स्मृति मिटवण्याचा घाट घातला गेला. कालांतराने हा इतिहास मिटवून फक्त मोदी आणि मोदीच तरूण पिढीला माहीत असावा, असे कटकारस्थान राबविण्यात आले. दिल्ली राजधानीतील अनेक ऐतिहासिक नाव बदलून, जाणीवपूर्वक वर्तमानातून भविष्य घडविण्यासाठी ऐतिहासिक वास्तूचं बलिदान दिले गेल. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी मूग गिळून गप्प बसणं पसंत केलं, नवीन सुखसोयी खासदारांना मिळतील असं स्वप्न दाखवून उठलेला आवाज मिटवून टाकला. आपल्या विरोधात कोणताही आवाज समूहातून येणार नाही याची खबरदारी घेत अनेकांना ED, CBI, NCB सारख्या यंत्रणाच्या धाडीत व्यस्त ठेवून गप्प करण्यात आले. महाराष्ट्रात गृहमंत्र्यांनाच जेलमध्ये टाकले. नवाब मलिक यांनी यांचे भांडाफोड करायला रोज प्रेस कॉन्फरन्स घेऊन पोल खोल करून सळो की पळो करून सोडलं. कीरिट सह अनेकांची बोलती बंद झाली, याला कोणीतरी आवरा दिल्लीला खेटे घालून नवाब भाईंना चौकशीसाठी घेऊन अटक करण्यात आली. पुन्हा फडणवीसांच्या फ टीमने उसळी मारली, सर्वसामान्यांमध्ये घबराट निर्माण झाली, हे लोक सत्तेचा दुरुपयोग कोणतेही थराला जाऊन करू शकतात. यांना कुठलीही पातळी राहिलेली नाही, हे




तर पाताळयंत्री थेट पाताळात पोहोचले. दिवस-रात्र खोटे आरोप जोशात मोठमोठ्याने करत राहिले, ते ऐकून-ऐकून सर्वसामान्यत त्यांचे विषयी भीतीचे वातावरण निर्माण झाले, त्यात हिंदुत्व, राम मंदिर, हनुमान चालीसा, भोंगे सगळ्याच गोंधळात महागाईच्या झळा आपल्या बेरोजगारी ने त्रासलेल्या दैनंदिन जीवनात लोक दारिद्र्य रेषेखाली ढकलेले गेले. त्या गदारोळात सर्वसामान्य गरीब यांच्या महागाईने त्रस्त जीवनाकडे दुर्लक्ष झाले, याच्या दहशतीच्या वातावरणात महागाईचा आगडोंब सवयीचा झाला, त्यात फ कंपनीने राज्य सरकारने पेट्रोल-डिझेल कपात न केल्याने महागाई वाढली. खोटे बोल पण रेटून बोल व तेच मीडियाने वारंवार 'हॅमर' केल्याने महागाई चा विरोध ताकदीने करून ढोंगी हिंदुत्वाचे लक्ष, मी मराठी मला महागाई, मी हिंदू मला महागाई, मी मुस्लिम मला महागाई, मैं सीख मुझे महंगाई ! हम सबको महंगाई ! महंगाई कम करो ! गॅस सिलेंडर ४१० रुपये लाच मिळाले पाहिजे, डिझेल पेट्रोल साठ-सत्तर रुपये लाच मिळाले पाहिजे, शेतमालाला भाव न देता दलालांचे किसे भरणाऱ्या भाजपा मुर्दाबाद ! करत जनजागृती करून, आली आली ग कमळाबाई ! हिने महागाई वाढवली बाई ! गाणी व्हिडिओ वारंवार लोकांमध्ये जाऊन, महागाई की मार बार बार लगातार बढाने वाले मोदी सरकार हटाव ! देश बचाव ! नारा देत, महाराष्ट्र व इतर राज्यांत इतर पक्षाच्या मदतीने दणाणून सोडण आवश्यक,दिल्लीत संसदेबाहेर मोठा लाटणे मोर्चा नेऊन मोदी सरकारला हादरवले पाहिजे. कोणीतरी काहीतरी करेल महागाई कमी होईल याकडे महिलावर्ग आस लावून बसला आहे. आज मृणालताई, अहिल्याताई, कमल देसाई व त्यांची महागाई विरोधी कृती समिती असती तर, मुंबई ढवळून काढली असती, आपण ही काढू शकतो, फक्त ही महागाई केंद्राने, भाजपाने, मोदींनीच वाढवली हा आत्मविश्वास आम्हांला असायला हवा. आम्ही अनेक महिला महागाईचा आगडोंब मोदी व फ टीमवर उलटवू शकतो, आपल्याकडे यंत्रणाही आहे, पण एकमत होणे आवश्यक आहे, ते लवकरात लवकर व्हावे ही अपेक्षा. अनेक महिला अनेक संघटना महागाईच्या मुद्द्यावर रस्त्यावर उतरायला तयार आहेत.

■■

## महाराष्ट्रात जातीनिहाय जनगणना करावीच लागेल

# कोरोनाची संख्या वाढत राहिली तर मास्क सक्तीचा करु अजित पवार

मुंबई- कोरोनाच्या केसेस सध्या वाढायला लागल्या आहेत. रुग्ण वाढणे हे काळजीचं कारण आहे. जर रुग्णसंख्या अशीच वाढत राहिली तर पुन्हा एकदा मास्क वापरण्याचा निर्णय घ्यावा लागेल अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी  दिली. मुंबईतील राष्ट्रवादी भवनात जनता दरबार उपक्रमास उपस्थित राहिले असता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला.

कोरोनाच्या तिन्ही लाटेत राज्यातील जनतेने कोरोनाचा अनुभव घेतला आहे. त्यामुळे सध्या वाढत असलेल्या संख्येवर राज्यसरकार व सर्व यंत्रणा लक्ष ठेवून आहेत असेही अजित पवार म्हणाले.

मार्च २०२२ पर्यंत महाराष्ट्र सरकारकडे येणारी जीएसटीची रक्कम ही २९ हजार ६४७ कोटी रुपये होती. केंद्रसरकारने दोन दिवसांपुर्वी संपुर्ण देशातील २१ वेगवेगळ्या राज्यांना ८६ हजार ९१२ कोटी रुपये दिले. त्यापैकी १४ हजार १४५ कोटी एवढी रक्कम राज्यसरकारला मिळाली. अद्याप आपल्याकडे येणारी रक्कम १५ हजार ५०२ कोटी रुपये आहे. २०१९-२० पासून ज्यावेळी जीएसटी कायदा अस्तित्वात आला. राज्यसरकारांनी ठराव करुन त्याला मान्यता दिली. २०१९-२० सालामधील



महाराष्ट्राच्या वाट्याचे १ हजार २९ कोटी, २०२०-२१ मधील ६ हजार ४७० कोटी बाकी आहेत. २०२१-२२ मधील ८ हजार ३ कोटी रुपये बाकी आहेत. ही रक्कम देखील लवकर मिळावी, यासाठी राज्यसरकारकडून प्रयत्न केले जातील. याचा फायदा अर्थसंकल्पातील उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ घालण्यासाठी आणि विविध विकासकामांसाठी होईल असे सांगतानाच पेट्रोल-डिझेल आणि गॅसवरील कर कमी करुन राज्यसरकारने साडे तीन हजार कोटी महसूल सोडून दिला आहे. त्यामुळे विरोधकांकडून सातत्याने होत असलेले आरोप बिनबुडाचे असल्याचे अजित पवार म्हणाले.

माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना अजित पवार यांनी पत्रकारांनी राज्याचे जीएसटीचे किती पैसे बाकी आहेत, हे विचारल्यानंतर ते सांगणे रडगाणे असते का? वस्तुस्थिती लक्षात आणून देणे चूक आहे का? असा थेट सवाल उपस्थित केला.ओबीसींना प्रतिनिधीत्व मिळायला हवे यावर आम्ही ठाम आहोत. सुप्रीम कोर्टाचा आदेश आहे तो मानावाच लागतो परंतु मध्यप्रदेशच्या धर्तीवर ओबीसींना आरक्षण मिळायला हवे याप्रकारची काळजी राज्यसरकार घेत आहे असेही अजित पवार म्हणाले.

आजच महाराष्ट्रात नामांतर होते आहे का? राज्यात वेगवेगळ्या प्रकारच्या मागण्या आहेत. औरंगाबादचे नामकरण असेल किंवा उस्मानाबाद यांच्याही नामांतराचा प्रश्न सुरु आहे. लोकशाहीत सर्वांना मागणी करण्याचा अधिकार आहे. या जशा मागण्या करणाऱ्याला महत्त्वाच्या वाटतात. त्या सगळ्या वंदनीय, महनीय व्यक्ती आहेत त्यांच्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु सध्या प्रश्न कुठले महत्त्वाचे आहे. हाही महत्त्वाचा आहे परंतु इतरही महत्त्वाचे त्यालाही महत्त्व दिले गेले पाहिजे. मध्यंतरी बघितले की नाशिकला महंत चर्चेला बसले आणि एकमेकांना माईक उचलून मारण्याचा प्रयत्न केला. त्याचे प्रात्यक्षिक भुजबळसाहेबांनी दाखवले मी ते दाखवणार नाही. परंतु याच्यातून आपण काय मिळवणार आहोत आणि लोकांना काय मेसेज देणार आहोत याचा विचार सगळ्याच राजकीय पक्षाच्या लोकांनी करायला हवा असेही अजित पवार म्हणाले.

कुणी काय आरोप करावा, कुणी काय पत्र द्यावे हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. नेहमीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त वेगवेगळे मान्यवर जात असतात अभिवादन करुन दर्शन घेत असतात. आजही नाही तर मागच्या काळात फडणवीस सरकारच्या काळात कार्यक्रम होत होते. आता पवारसाहेब जाऊन आले. हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, रोहित पवार गेले  याठिकाणी कुणीही जात- येत असतात

त्यामुळे इथे राजकारणाचा संबंध येतो कुठे असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. भाजपचे दोन, दोन्ही कॉंग्रेसचे दोन आणि सेनेचा एक असे पाच सदस्य राज्यसभेवर निवडून येणारच आहे. आता सहावा उमेदवार सेनेने दिला आहे. आमची मतेही शिवसेनेलाच देणार आहोत असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. राज्यसभेची निवडणूक ही मते दाखवून मतदान केले जाते त्यामुळे घोडेबाजार होणार नाही. राहिला प्रश्न अपक्ष मतदान दाखवत नाही. त्यामुळे ही चर्चा सुरू आहे. कमी पडणारी मते सेना आणि भाजपला लागणार आहेत. काही अपक्ष सेनेशी संलग्न आहेत तर काही आमच्याकडे आहेत. काही भाजपकडेही आहेत. त्यामुळे घोडेबाजारच्या अशा चर्चा सुरू असल्याचे अजित पवार म्हणाले.

मंत्री नवाब मलिक आणि माजी मंत्री अनिल देशमुख यांना राज्यसभा निवडणूकीत मतदान करण्याची परवानगी मिळावी यासाठी राष्ट्रवादी कामाला लागली आहे. न्यायालयात जात आहोत. मतदान करण्याचा त्यांना अधिकार आहे त्यासंबंधाची परवानगी न्यायालयाकडे मागणार आहोत. प्रयत्न कसोशीने करत आहोत असेही अजित पवार यांनी सांगितले.

बुलेट ट्रेनसारखे प्रकल्प पूर्णत्वास गेले पाहिजे हे माझे वैयक्तिक मत आहे असे स्पष्ट करतानाच मात्र अंतिम निर्णय हा मुख्यमंत्री घेतील असेही अजित पवार यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

सध्या ओबीसींचा प्रश्न आहे. त्यांना प्रतिनिधीत्व मिळायला हवे.जातीनिहाय जनगणना ही चर्चा होते आहे. देशामध्ये नेमक्या किती जाती आहेत हे कळू द्या. म्हणजे जातींचा हा विषय थांबेल. राज्याची साडेबारा कोटी लोकसंख्या आहे. मात्र जातींबाबत जी ओरड लोकं करतात त्यांच्या आकडेवारीनुसार बेरीज केली तर ४० कोटींच्यावर जाते मात्र तेवढी संख्या नाही. त्यामुळे जातीनिहाय जनगणना झाली तर किती जाती आहेत हे स्पष्ट होईल असेही अजित पवार म्हणाले.

# वाशिममधील भाजपच्या पदाधिकाऱ्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश



**मुंबई** – उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच वाशिम जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांच्या पुढाकाराने भाजप पक्षातील अनेक मान्यवरांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

राष्ट्रवादी भवन, मुंबई येथे घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात भाजपचे माजी नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर, किरण क्षीरसागर, तालुकाध्यक्ष गजानन दहातोडे, कपिल नकवाल, अनिल अग्रवाल यांनी पक्षात प्रवेश केला. या पक्षप्रवेश कार्यक्रमाला वाशिम जिल्ह्यातील पक्षाचे वरिष्ठ नेते अंकुश देशमुख, बाबाराव खडसे, सोनाली ठाकूर, युसुफ पुंजाणी, दत्ता डहाके, अशोक परळीकर उपस्थित होते.

याच दरम्यान नवी मुंबईतील जिल्हाध्यक्ष अशोक गावडे यांच्या पुढाकाराने आप पक्षातील दत्तात्रय नागरे (माजी सहा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका ) यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घड्याळ हाती बांधले. त्यांच्यासमवेत सचिन सावंत, चंद्रकांत पाटील यांनीही पक्षात प्रवेश केला. यावेळी प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, महिला प्रदेशाध्यक्षा विद्याताई चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, युवक कार्याध्यक्ष सूरज चव्हाण आदी उपस्थित होते.

■■

# गुरुग्राम प्रकरणातून सीऐंनी घ्यायचा धडा




# सरकारी धोरणांबाबत चार्टर्ड अकौन्टंटनी व्यक्त व्हायलाच हवे

डॉ. अजित जोशी
चार्टर्ड अकौंटंट

**'लगेगी आग तो आएंगे घर कई जद में**
**यहां पे सिर्फ हमारा मकान थोड़ी है।**

या राहत इंदोरींच्या सुप्रसिद्ध ओळींचा 'चटका' कदाचित सीए समुदायाला दोन-तीन दिवसांपूर्वी बसला असेल. गुरगावमध्ये जीएसटी अधिकाऱ्यांनी उद्योजकाची बाजू मांडायला गेलेल्या दोन सीएंना अटक केली. यावरून संतप्त झालेल्या सीए व्यावसायिकांनी तिथे आंदोलन केलं. त्यांचा राग एव्हढा अनावर झाला, कि त्यांनी चक्क जीएसटी कार्यालयालाच बाहेरून टाळ ठोकलं . सीए इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळाने (कौन्सिल) अर्थमंत्र्यांना भेटून या विषयावर आपलं गा-हाणं मांडलं. आमच्या व्यावसायिकांच्या संदर्भात इतर मुद्द्यांकडे वळण्याआधी हा तात्कालिक मुद्दा नीट पाहायला हवा.

वेगवेगळ्या कर-अधिकाऱ्यांपुढे जेव्हा सीए जात असतो, तेव्हा त्याला क्लायंटने केलेल्या करचोरीची खात्रीपूर्वक माहिती असतेच असं नाही. पण त्याचबरोबर तो संपूर्णतः निरागस आणि अनभिज्ञ असतो, असाही दावा करणं भाबडेपणाचं आहे. सत्य नेहमीच या दोन टोकांच्या मध्ये असतं. त्याचबरोबर क्लायंटची भूमिका अधिका-यांना योग्य त्या भाषेत 'समजावून' सांगणे. हीही त्याची जबाबदारी असते. सर्वच व्यवसायात जशी काही सडकी फळं असतात, तसे काही सदस्य अश्या भ्रष्टाचारात सक्रिय सहभागापासून ते निष्क्रिय साक्षीदारापर्यन्त वेगवेगळ्या भूमिकेत असूही शकतात, हे मान्य करायला हवं. मात्र गुरगावच्या प्रकरणात सीएनी प्रश्न हा उपस्थित केलेला आहे कि गैर मार्गाने रिफंड मिळवणारा उद्योजक आणि

कागदपत्रांची छाननी करून त्याला तो देणारा अधिकारी या दोघांनाही सोडून आधी सीएला अटक कशी झाली? आणि हा अत्यंत रास्त मुद्दा आहे... अर्थमंत्र्यांनी यासंदर्भात काही अधिकाऱ्यांना निलंबित केलं, पण अटक मात्र अजूनही झालेली नाही. दरम्यान, आजही हे दोन सीए न्यायालयीन कोठडीतच आहेत. दुसरीकडे अधिकाऱ्यांच्या बाजूलाही अशी चर्चा आहे, कि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कर वसुलीकरता असह्य असा दबाव आणला जातोय. ऐकिवात असलेली अनधिकृत चर्चा अशी आहे, कि जीएसटी अधिकाऱ्यांमध्ये हा दबाव सहन न होऊन व्हीआरएस घेण्याचं प्रमाणही वाढलेलं आहे. हा दबाव येतो, कारण सरकारचं करसंकलन जीएसटी आणल्यानंतर घसरलेलं आहे. पण ते मान्य करायची सरकारची तयारी नाही आणि ती आकडेवारी शोधून काढायची माध्यमांची! मधल्यामध्ये प्रामाणिक काम करणाऱ्या असंख्य सीए व्यावसायिकांना प्रश्न असा पडलाय, कि अश्या प्रकारे आपण जेव्हा आपल्या क्लायंटचा प्रतिनिधी म्हणून जाऊ तेव्हा आपल्यावरही अशी कारवाई होणार का? की या विशिष्ट केसमध्ये सीएंनी काही खरोखर गैर-वर्तणूक केली, म्हणून त्यांना अटक झाली?

मात्र या निमित्ताने सीए हा व्यवसाय आणि त्यातल्या व्यावसायिकांची सद्यस्थिती यावर काही व्यापक चर्चा व्हायला हवी. या चर्चेत दोन मुद्दे महत्त्वाचे आहेत. आधी आपण हे समजून घेऊ कि इस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) ही कायद्याने प्रस्थापित संस्था आहे. काही परीक्षा पास करून तुम्ही याचे सदस्य होऊ शकता. ICAI स्वतःच या परीक्षा घेते. तुम्ही सदस्य झालात कि जर व्यवसायाचा मार्ग निवडलात, तर तुम्हाला सनद मिळते. तिच्या आधारे देशातल्या जवळपास सर्व मुख्य व्यावसायिक कायद्याअंतर्गत तुम्ही लेखापालाचे, अर्थात ऑडिटरचे काम करू शकता. या शिवाय उद्योग-धंद्याच्या मालकांना/व्यवस्थापनाला करविषयक सल्लाही सीए देत असतात. आपल्या व्यवसायाचं नियमन करण्यासाठी, सदस्यांना वेळोवेळी तात्कालिक महत्त्वाची माहिती देण्यासाठी, परीक्षा घेऊन नवे सदस्य दाखल करण्यासाठी आयसीएआय दर ३ वर्षांनी निवडणुका घेते आणि त्यातून देशातल्या चार विभागांसाठी प्रत्येकी एका (पश्चिम, पूर्व, उत्तर आणि दक्षिण) आणि संपूर्ण देशासाठी एक केंद्रीय) कार्यकारिणी किंवा कौन्सिल निवडलं जातं. या प्रत्येक विभागाला कार्यकारिणीतूनच एक अध्यक्ष निवडला



जातो, ज्याची मुदत एक वर्षाची असते आणि कोणतीही व्यक्ती ते पद एकाहून अधिक वेळेला भूषवू शकत नाही. हे विस्तृत सांगायचं कारण म्हणजे इतर अनेक व्यावसायिक शाखांपेक्षा सीए खूपच जास्त व्यवस्थितपणे संघटीत आहेत. त्यामुळे इतर व्यवसायांमध्ये होणाऱ्या कित्येक गैर गोष्टी, उदा. शिक्षणातले घोळ, बेसुमार जाहिरातबाजी, वगैरे या व्यवसायात होत नाहीत.

मात्र गेली काही वर्ष या व्यवसायाला खूपच अडचणींचा सामना करायला लागलेला आहे. यातली एक म्हणजे वेगवेगळ्या सरकारी वेब-साईट्स. आज जीएसटी, आरओसी आणि इन्कम टॅक्स, या तीनही वेब साईट्सवर असंख्य समस्या गेल्या चार ते पाच वर्षात आलेल्या आहेत. वापरणाऱ्यांना अजिबात सोयीचा नसलेल्या या साईटस सीएच्या ऑफिसचे असंख्य तास अक्षरशः वाया घालवतात. याचा सर्वात मोठा फटका तुलनेत छोट्या पातळीवर काम करणाऱ्या सीएंना सर्वाधिक बसतो. आधीच त्यांना कुशल मनुष्यबळाचा अभाव असतो. त्यात या 'डिजिटल इंडियाच्या'च्या समस्यांना गेलेल्या वेळेबद्दल कोणताही ग्राहक अधिक मोबदला देत नाही. परिणामतः खर्च वाढत राहतात, पण उत्पन्न नाही.

पण या वेबसाईटच्या समस्या तुलनेत छोट्या म्हणायला हव्या. त्याहून मोठ्या समस्या आहेत, व्यावसायिक कायदे बनवण्यातल्या. यात एक दोन उदाहरणं खूप बोलकी आहेत. गेल्या वर्षांपासून इन्कम टॅक्सने दुहेरी करप्रणालीची पद्धत आणली. खरंतर ती का आणली आणि त्याने काय फरक पडलाय, हे गूढच आहे. म्हणजे काही प्रकरणात करदात्यांचा पैसा वाचला हे खरंच, पण अशी अजून एक पर्यायी पद्धत आणून तीन-तीन पर्याय दिले, तर अजून पैसा वाचेल!! म्हणून तसं करणार का? अश्या दोन-दोन पद्धती ठेवल्यामुळे करदात्यांचा (पुन्हा एकदा, छोटे व्यावसायिक किंवा नोकरदार!) गोंधळ वाढला. आणि त्यामुळे पुन्हा एकदा व्यावसायिकांना द्याव्या लागणाऱ्या वेळात वाढ झाली. गव्हर्नन्स, अर्थात प्रशासन सोपं करायचं आहे, कि अजून जटील? त्यापेक्षा असलेल्या प्रणालीला सुटसुटीत करायचा प्रयत्न झाला असता तर करदाते आणि व्यावसायिक, दोघांनी दुवा दिले असते. दुसरं उदाहरण अर्थात जीएसटी! हा कायदा आल्यापासून असंख्य व्यावसायिकांनी व्यक्तिशः, वेगवेगळ्या संघटनांच्या माध्यमांतून अनेक सूचना दिल्या. त्यातल्या बहुतांश सरकारने आधी धुडकावून लावल्या. मग मान्य केल्या. त्याचा परिणाम म्हणजे जीएसटी कायद्यात अवघ्या ५ वर्षांच्या काळात १००० हून अधिक बदल केले गेलेले आहेत. आता 'आम्ही फ्लेक्सिबल' आहोत वगैरे त्याचं राजकीय समर्थन कोणी करेल, पण सतत बदलत असलेले दर, रिटर्न फाईल करण्याच्या पद्धती, वेळा, यातूनही सीएच्या अडचणी वाढल्या, यात शंका नाही. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे कोणत्याही व्यावसायिक कायद्यात नसलेली अधिकाऱ्यांना अटक करण्याचा अधिकार देणारी तरतूद. गुरुग्रामची घटना याच अधिकारातून घडली. कायद्याच्या तरतुदींच्या संदर्भात अशी अनेक उदाहरणं देता येतील.

हे सगळं होत असताना सीएंची सार्वजनिक प्रतिमाही मालिन होत राहीली. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या सोहोळ्यात पाहुणे म्हणून आमंत्रित केलेल्या पंतप्रधानांनीच खुद्द




यजमानांच्या व्यावसायिक नीतिमत्तेवर प्रश्न उपस्थित केले. वाढत्या एनपीएच्या पार्श्वभूमीवर कर्जाच्या वेळेला सर्टिफिकेट देणाऱ्या सीएवर सवाल उठले. सीएंचे अधिकार कमी व्हावे, त्यांच्यावर सरकारी नियंत्रण आणता यावं, साह्य स्वरूपाचे कायदेही येत आहेत, आले आहेत. अडचण अशी आहे, कि वर म्हटल्या प्रमाणे या व्यवसायात काही सडके आंबे आहेतच, यावर कोणाचंच दुमत नाही. पण पंतप्रधानांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करूनही असे किती भ्रष्ट सीए पकडले गेले? कितीजणांवर गुन्हेगारी कारवाई झाली? किती जणांचे गैरव्यवहार उघडकीला आले? हे झालं, तर इतर कोणापेक्षाही जास्त आनंद प्रामाणिक सीएंना होईल, कारण

त्यांचा व्यवसाय तेव्हढा वाढू शकेल. पण दुर्दैवाने सीएच्या तथाकथित भ्रष्टाचारावर टीका करणारे, प्रत्यक्ष भ्रष्टाचार थांबावा म्हणून काही ठोस प्रयत्न करत नाहीत! दुसरा हाही मुद्दा आहे, कि ज्याच्या हिशेबांचा तपास करायचा तोच आपली निवड करणार असेल आणि आपल्याला फीही देणार असेल, तर असे व्यावसायिक किती काळ निष्पक्ष राहतील? नीतिमत्तेशी काडीचीही तडजोड न करता, कर्मठ मार्गाने जाऊन त्यांचा व्यवसाय कसा वाढावा? याचं उत्तरही कोणी देत नाही. सीएंना कश्या प्रकारे काम मिळतं आणि मिळावं, याविषयी सरकारी आणि कौन्सिलच्या पातळीवर काही गंभीर चर्चा आवश्यक आहे आणि ती तितकीशी




घडताना दिसत नाही.

हे सगळं सविस्तरपणे सांगायचं कारण म्हणजे या समस्यांच्या पार्श्वभूमीवर आमच्या निवडणुका कोणत्या मुद्द्यांवर लढल्या जातात? तिथे या गोष्टींची चर्चा होते का? जातीपातीच्या आधारे, दारू आणि बिर्याणीवर गरीब मतदान करतो, अशी टीका या देशातला शिक्षित वर्ग अनेकदा उद्दाम उपहासातून करतो. नुकत्याच पार पडलेल्या कौन्सिल निवडणुकात मतदानाचे मुद्दे काय काय होते आणि प्रचार कसा आणि कुठे झाला, हे कठोर आणि अप्रिय प्रश्न आपण स्वतःला विचारायला हवे. 'व्होट-बँक'ची गणितं कोणत्या आधाराने बांधली गेली, यावर आत्मपरीक्षण करायला हवं आणि त्यात काही चूक असेल, तर उमेदवारांना दोष देऊन उपयोग नाही. शेवटी मतदारांची अपेक्षा असल्याशिवाय उमेदवार असं वागत नसतात. आपल्या सदस्यांना आणि खासकरून छोट्या पातळीवर काम करणाऱ्या सदस्यांना, कारण त्यांचा कोणी वाली नसतो!) कामात येणाऱ्या अडचणी, त्याअनुषंगाने केल्या जाणाऱ्या कायद्यांवर टिप्पणी, गरज पडल्यास सरकारी कार्यपद्धतीची जाहीर चिकित्सा आणि गरज असल्यास कायदेशीर मार्गाने प्रतिकार,या सगळ्या गोष्टी सीएंना संस्थात्मक पातळीवर स्वीकाराव्या लागतील.

आणि यातल्या शेवटच्या मुद्द्यात खरी ग्यानबाची मेख आहे. पारंपारिकदृष्ट्या सीए व्यावसायिक हे तसे थंड स्वभावाचे आहेत. सामाजिक संघर्षात सहभागी होणं, किंवा सरकारी धोरणांवर टीका करणं, हे त्यांच्या व्यावसायिक डीएनएमध्ये नाही. आंदोलनं करणारे डॉक्टर्स, वकील आपण पाहतो, पण सीएंनी आंदोलन केलंय, असं जवळपास कधीच घडत नाही. अपवाद परवाच्या गुरुग्रामच्या घटनेचा. पण तेही अगदी पाणी थेट गळ्यापर्यंत आलं तेव्हा झालं. ही प्रवृत्ती आधुनिक काळात स्वीकारार्ह नाही! आपली वैचारिक बांधिलकी काहीही असो, किंवा नसो, पण किमान आपल्या व्यवसायाशी निगडित घटना, सरकारी धोरणं, त्याचे होणारे दुष्परिणाम,यावर सीएनी व्यक्तिशः आणि समूह म्हणून व्यक्त व्हायलाच हवं. नोट-बदल असेल किंवा जीएसटी अंमलबजावणी, प्रतिवर्षी येणारं बजेट असेल, किंवा व्यावसायिक कायद्यांच्या संदर्भातले बदल, सीए व्यक्त होतच नाहीत. आणि बरेचदा त्यांचे प्रतिनिधी सरकारी बाजूशी कायम सहमत आहेत, असं दिसतं. पण आपल्याला योग्य वाटत नाही, त्यावर जाहीर आणि सकारात्मक टीका, हा कोणत्याही व्यवसायाचा भाग आहे आणि नागरिकाचं कर्तव्यही! यापासून सीए समुदाय संपूर्णपणे वेगळा राहू शकत नाही. अन्यथा कधी न कधी ते आपल्या स्वतःच्याही गळ्याशी येतंच...! गुरुग्राम प्रकरणातून हा धडा शिकणं आपल्यासाठी अत्यंत आवश्यक आहे....

▪▪



# वाढती विषवल्ली आक्रमकतेने ठेचून काढावी

गेल्या काही महिन्यातील विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी एकमेकांच्या विरोधात जी वक्तव्ये केली आहेत ती बघितल्यावर एकूणच किती खालच्या पातळीवरचे सूर उमटतायत ते बघून खूप अस्वस्थता वाटते. गलिच्छ आरोपांची राळ उडविणे, धमक्या देणे, शारीरिक व्यंगावर कोट्या करणे अशा गोष्टींना सुमारच राहिला नाही. हे सगळ कमी पडाव की काय म्हणून नव्या पिढीतले तरुण, तरुणी अत्यंत बेजबाबदारपणे सर्वांना आदरणीय असणाऱ्या लोकमान्य नेत्यांबद्दल समाज माध्यमातून (Social Media)मधुन गरळ ओकण्याचे काम करत आहेत. आदर करणे दूरच पण जुन्या संत वाड:मयातील ओळींना विकृत रूप देऊन त्याचा वेगाने प्रसार करतात. ह्या विरोधात कायदेशीर कारवाई झाली तर लगेच अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी ह्या गोंडस नावाखाली लपायचा प्रयत्न करतात. खर तर प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या ह्या कर्तबगार नेत्यांना आणि नेटकरण्यांना एक Code of Conduct तयार करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्या पुढचे पाऊल म्हणजे सर्वच राजकीय पक्षांनी एक असे व्यासपीठ निर्माण करावे की ज्या माध्यमातून ह्या बेबंद वागण्याला थोडातरी अंकुश लावता येऊ शकेल.




मध्यंतरी भाजपाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत पाटलांनी तर कहरच केला. महाराष्ट्र विकास आघाडीच्या विरोधात आंदोलन करतांना प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी बाईट (चावा) घेण्यासाठी आले असता त्यांनी खासदार सुप्रिया सुळेंच्या बाबतीत धक्कादायक विधान केले. प्रश्न केवळ सुप्रियाताईंबद्दल नव्हता तर समस्त महिला वर्गाबद्दल अनादर करणारी, त्यांना अपमानित करणारी भाषा त्यांनी वापरली. मग चहू बाजुंनी त्यांच्यावर टीका झाल्यावर सारवासारव करण्याचा केविलवाणा प्रयत्न त्यांनी केला. उगाचच ग्रामीण भागातल्या म्हणींचा वापर केल्याचा खुलासा केला. अर्थातच तो अजिबात पटण्यासारखा नव्हता. पण लाजेखातर का होईना महिला आयोगाची नोटिस मिळाल्यावर माफी आली. ती सुध्दा मनापासून होती का हा प्रश्न शिल्लक राहतोच. कारण त्यांनी म्हंटले जर माझ्या वक्तव्यामुळे भावना दुखावल्या गेल्या असतील.... ह्या वरुन पुन्हा आपण चूक केली हे चंद्रकांत पाटील कबूल करत नाहीत. त्यामागचे कारण ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून ते पुढे आले तो विचार सगळ्याच महिलांबद्दल बुरसट आणि मागासलेले विचार जपणारी आहे. त्यामुळे त्यांच्या खुलाशानंतर स्वत: सुप्रियाताईंनी हा विषय संपवावा असे सगळ्यांना विनंतीपूर्वक सांगितले. कुठे हा ताईंचा पुरोगामी दृष्टिकोन आणि त्याविरुद्ध असणारे चंद्रकांत पाटलांसारखे नेते. खर तर केलेल्या चुकीचे प्रायश्चित्त घेतल्या शिवाय हा विषय संपवू नये अशीच सामान्य जनतेची अपेक्षा असते. अशी अनेक प्रकरणे ह्या बेजबाबदार नेत्यांची आपल्या समोर आली आहेत. आता वेळ अशी आली आहे की असे विकृत विषारी वक्तव्य करणाऱ्या सगळ्या बोलबच्चनांना जनतेने सार्वजनिक रित्या रोखायला हवे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ह्या बाबतीत अतिशय संयमी पण कणखर भूमिका बजावली आहे. कारण आपला पक्ष हा पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय पवार साहेबांच्या मूल्याधिष्ठेत तत्वावर वाटचाल करीत आहे. पण वेळ आली आहे की प्रसंगी आक्रमकताही धारण करून ही पसरत चाललेली विषवल्ली वेळीच ठेचून काढायला हवी.